१०२ म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक गो. वि.

सन

१०२

(विषय) क्रमांक

पुस्तकाचें नांव

902

# सुंदरी अथवा गर्वनिरसन

लिटनसाहेबांच्या लेडी ऑफ् लियन्स् या नाटकाच्या आधारें

**गोविंद विठ्ठल काळे बी. ए.**

हेडमास्तर इंग्लिश स्कूल पंढरपूर.

यांणीं रचिलें.

तें

पुणें येथें "आर्यभूषण" छापखान्याचे म्यानेजर

यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

(प्रकाशकांनीं सर्व हक्क आपलेकडे ठेविले आहेत.)

इसवी सन १८९१

... ग्रंथ संग्रहालय
नं.........
ता.........

# प्रस्तावना.

यत्न पहिलाच, भाषेचें ज्ञानही अल्प, यामुळें फलनिष्पत्ति सदोष असावी हें साहाजिक आहे. सुज्ञ वाचकांना, नीरक्षीरन्यायाचें अवलंबन करावें अशी विज्ञप्ति करणें ह्मणजे द्विरुक्तिदोषाचें अर्जन करणेंच होईल.

पंढरपूर, आगस्ट १८९१. } ग्रंथकर्ता.

# पात्रें.

— ✱ —

दादासाहेब .........नायिकेचा बाप.

विसाजीराव.........श्रीमान् सावकार.

शिवाजी............नायक.

धनाजीराव.........नायिकेचा मामा.

गुणाजीराव.........श्रीमान् गृहस्थ.

संतु ................चाकर.

म्हाळसाबाई.........नायिकेची आई.

सुंदरी...............नायिका..

गजी ................दासी.

शिवाजीची आई, लष्करी अधिकारी, कारकून, शिपाई ...वगैरे.

---

स्थल ...............लवणपूर वगैरे.

वा - ना
[library stamp] ठाणे

# सुंदरी अथवा गर्वनिरसन.

## अंक १ ला—प्रवेश पहिला.

दादासाहेबांचे वाड्यांतील दिवाणखाना.

सुंदरी, म्हाळसाबाई व गजी बसलेल्या प्रवेश करितात.

**म्हाळसा**—गजे, अग ती वेणी अमळ डाव्या बाजूस पाहिजे, नाहीं का बरें? तुला तर अलीकडे वेणी कशी घालावी तें देखील कळत नाहींसें झालें. मेलीचें लक्ष कधीं ठिकाणावर असेल तर!

**गजी**—अतातात! इतका कशाला राग आईसाहेब? ही पहा आतां नीट बसली कीं नाहीं? [ फुलांची वेणी डाव्या अंगास बांधिते. ]

**म्हाळसा**—लक्ष लावून नीट केल्यावर मग न बसायला काय झालें? तूंच पहा बरें, आतां तीच वेणी कशी शोभते ती! किती तरी बाई पोर सुरेख दिसते ही! सुंदरे, तुला तरी ही देवाचीच देणगी बरें! रूप तरी नशिबीं असल्यावांचून मिळत नाहीं. पोरगी पण थेट माझीच प्रतिमा आहे. हे डोळे, हें नाक, हें तोंड, हें रुंद कपाळ, कांहीं तिकडचें नव्हे.

**सुंदरी**—[ आळसल्यासारखें करून ] हें कायग आई तुझें! तूं कांहीं म्हटलेंस तरी मी कांहीं इतकी सुरेख नाहीं; तूं आपली उगीच मला हरभऱ्याच्या झाडावर चढवितेस. [ एकीकडे ] पण नेहमीं हा फुलांचा गजरा पाठवितें तरी कोण?

**म्हाळसा**—अग तसें नव्हे. तूं खरोखरच फार सुरेख आहेस; पण मी तुला वारंवार सुरेख सुरेख म्हणतें त्याचें कारण-

तुला माहित आहे का? इकडे पहा, बायकांची किंमत ही केवळ त्यांच्या स्वरूपावर असते; ज्यांना रूप त्यांनाच सुख. मुली सुंदर असल्या ह्मणजे त्यांना पाहून कोणी नाक मुरडीत नाहीं; आणि लग्न झाल्यावर देखील बायको देखणी असली कीं बहुशः नवरा तिच्या अर्ध्या वचनांत असावयाचाच. मी खास सांगतें, तुझ्या नशिबीं सुख आहे. तूं एखाद्या राजारजवाड्याच्या कुटुंबांत जाऊन पडणार. व्यापारांत जसा पैसा तसेंच लग्नाच्या कामांत रूप. तुझ्या मनांत हें चांगलें ठसावें ह्मणून मी हें वरचेवर बोलतें, समजलीस! [दरवाजावर थाप बसते.] गजे, जाग पहा बाहेर कोण आलें आहे तें.

**सुंदरी**—[गजऱ्याचा वास घेऊन] आई, कोणग नेहेमीं अशीं सुरेख, शेलकीं फुलें मला पाठवून देतें? कसें बाई तरी एकएक बचकेएवढें फूल हें! यांच्या वासाची तरी कांहीं कमालच आहे. किती किती गोड!

**गजी**—[प्रवेश करून] आईसाहेब, विसाजीरावांचे कारकून आले आहेत.

**म्हाळसा**—त्यांना आंत येऊन त्या चादरीवर बसायला सांग,—म्हणावें बहुतकरून आतांच घरीं येणें होईल, काम असेल तर आंत येऊन बसा. [गजी बाहेर जाते.] या विसाजीरावानें तर पिच्छा पुरविला आहे; मेला आग्रह करावा तरी किती? आग्रह करून का कोणी मुलगी देतें?

**सुंदरी**—आई, कोणग हे विसाजीराव? नांव तरी कसें तें पहा! शिवाजीराव असें चांगलें थोर नांव टाकून ह्यांचें आपलें उलट—म्हणे विसाजीराव!

**म्हाळसा**—सुंदरे, अग नांवावर काय असतें? हा विसाजीराव मोठा श्रीमान् आहे; पण आतां घरीं येणें झाल्यावर मी साफ सांगणार—आमची मुलगी सावकाराच्या घरीं द्यायची

नाहीं. त्यांचाच हेका चालता तर त्यांनीं तुझें लग्न एखादा कवडीचुंबक सावकार पाहून त्याशीं केव्हांच लावून टाकलें असतें. पण माझा मागें लकडा आहे ह्मणून निभावलें आहे! सावकार व व्यापारी या मेल्यांचें मला नांव सुद्धां नको. मेल्यांना रात्रंदिवस पैशाचा लोभ-एकसारखा पैसा मोजीत बसायाचें, पण त्या पैशाचें बायकांना सुख मिळेल तर राम! नुसत्या नादावर खुष.

**सुंदरी**—खरेंच आई, माझें देखील कोणाई त्यांचें नांव ऐकिलें कीं कपाळ उठतें. आमचेच बाबा नाहीं का पहात कसे ते? दहा रुपडया मागितल्या तर एक हातांतून सुटायची मारामार!

**म्हाळसा**—ह्मणूनच बाई तिकडे रात्रंदिवस कानींकपाळीं ओरडत असतें कीं आमच्या सुंदरीला कोठें तरी राजेरजवाडयांपैकीं स्थळ पहावें ह्मणून. तूं पोर आहेस, तुला ह्या गोष्टी काय माहीत? पण तुला सांगतें—राजाच्या बायकांना मात्र खरें सुख मिळतें; नाहीं तर इतर ठिकाणीं सुखच! आपल्याच घरीं पहाना? मेला एक दिवस तरी सुखानें जातो आहे का?

( गजी व कारकुनाच्या वेषानें **विसाजीराव** प्रवेश करितात.)

**गजी**—[ विसाजीरावांकडे बोट करून ] विसाजीरावांकडून ताईसाहेबांस पहावयास हे आले आहेत वाटतें?

**म्हाळसा**—या बसा. आपण विसाजीरावांच्याच पेढीवर असतां वाटतें? [ **विसाजीराव** बसतो. ]

**विसाजी**—होय, मी त्यांच्याच पेढीवर असतों. [ अभिमानानें ] दादासाहेबांकडे विसाजीरावांची मागणी येऊन पुष्कळ दिवस झाले, तीबद्दल अजून कांहींच निकाल समजला नाहीं, ह्मणून त्यांस स्मरण करण्याकरितां मला पाठविलें आहे. [ सुंदरीकडे टक लावून पहातो. ]

**सुंदरी**—[ आपल्याशीं ] मेल्याला कुठें पांचसात रुप-ड्या मिळत असतील, तरी पाय पहा कुणीकडे ते !

**म्हाळसा**—स्मरण काय करावयाचें ? पण आतांच घरीं येणें होईल, आणि तुह्मांला जबाब मिळेल.

**विसाजी**—बरें तर थोडा वेळ वाट पहातों; होय किंवा नाहीं तें एकदां कळलें ह्मणजे बरें. यांचेंच वाटतें लग्न व्हायचें तें ? ताईसाहेबांचें रूप हजारांत सांपडायचें नाहीं. दादासाहेब व आपण मोठीं नशीबवान खरीं. पहावें आमच्या यजमानांचा भाग्योदय कसा काय आहे तो ! ताईसाहेबांचें नांव काय ? [ सुंदरीकडे पहातो. ]

**म्हाळसा**—तिला सुंदराबाई ह्मणतात.

**सुंदरी**—[ आपल्याशीं ] कोण हा लघळपणा ! या मेल्या-ला माझें नांव घेऊन काय करायचें ? हा कोणी लुच्चा दिसतो !

**विसाजी**—वाहवा ! नांव अगदीं योग्य आहे ! कसें काय सुंदराबाई, तुम्हीं विसाजीरावांना कधीं पाहिलें आहे का ? आमचे विसाजीराव देखील तुमच्यासारखेच सुंदर, शोकदार आहेत बरें !

**सुंदरी**—[ आपल्याशीं ] खचीत, याच्या उर्मटपणाला कांहीं सीमा नाहीं ! मेला माझ्याशींच एकदम बोलूं पाहतो !—[ उघड ] इश्श बाई, मी कशाला विसाजीरावाला पाहूं ? त्या-च्याशीं मला काय करावयाचें आहे ? आह्मी अशीं पुरुषांचीं तोंडें पहात नसतों.

**विसाजी**—असें कां ह्मणतां ? तुह्मांला सुंदर, शोकदार, श्रीमंत नवरा आवडत नाहीं ? आमचे विसाजीराव कांहीं कमी असामी नाहींत. त्यांच्यासारखा जाडा सावकार या सर्व शहरांत मिळणार नाहीं.

**म्हाळसा**—आमची सुंदरी तर सावकार किंवा व्यापारी

नी ९०२



यांच्या घरीं द्यायचीच नाहीं. एखाद्या भिकारड्याला देणें नू सावकाराला देणें हीं सारखींच.

**विसाजी**—काय ह्मणतां? भिकारी आणि सावकार हे सारखेच! वाः! माझी थट्टा करता झालें. [आपल्याशीं] काय ताठा पहा! तरी हलकें कुळ बरें!

**सुंदरी**—[आपल्याशीं] पुटपुटतो पहा कसा तो आपल्याशींच! हा कारकून आहे असें मला तर वाटत नाहीं. येथें कांहीं तरी लबाडी आहे.

**म्हाळसा**—सारखेंच नाहीं तर काय? पण मी ह्मणतें, तुमचा विसाजीराव जरी मोठा असला तरी आमची मुलगी अशा ठिकाणीं साफ द्यायची नाहीं. आमची सुंदराबाई मोठी झाली आहे तरी दुसरें लायकीचें व खानदानीचें स्थळ मिळत नाहींसें झालें नाहीं. आज नाहीं उद्यां, मिळून आमच्या सुंदरीला केव्हां तरी चांगलें मनाजोगें स्थळ मिळाल्यावांचून राहयचें नाहीं.

**विसाजी**—तें खरेंच; असल्या रत्नाकरितां कोणीही मागणी घालील. पण मनाजोगें स्थळ तरी आणखी कसें पाहिजे? राजेरजवाड्यांत तें तुह्मांला अधिक काय मिळणार? आमच्या विसाजीरावांचेंच कर्ज या आसपासच्या बहुतेक रजवाड्यांवर आहे. अशा कर्जबाजारी लोकांच्या येथें का हें असलें रत्न तुह्मी टाकणार? आमच्या पेढीवर ज्या दिवशीं रुप्याचा नाद निघत नाहीं असा दुर्दीन वर्षाचीं वर्षें येत नाहीं. समजलां. नुसत्या कोरड्या भिकारड्या खानदानीला घेऊन काय जाळावयाचें आहे. बाईसाहेब, मी खचीत खचीत तुह्मांला सांगतों कीं द्रव्य आहे तर सर्व कांहीं आहे. द्रव्याच्या घरीं सद्गुणराशी पाणी भरी.

**म्हाळसा**—पुरे, पुरे तुमच्या विसाजीरावांची बढाई! ते

कितीही श्रीमंत असले तरी त्यांचा जन्म रुपये-आणे-पै करण्यांतच जावयाचा. खानदानीचे गुण त्यांच्यांत कधीं नसावयाचे. एखादा चांगला सरदार माझ्या छयकडीच्या योग्य कोठें नाहीं कोठें तरी सांपडेलच.

**विसाजी**—कोण तरी विलक्षण वेड आहे हें ! असा कुठचा तरी सरदार पाहण्यापेक्षां आमचे विसाजीराव काय वाईट ? अहो ज्यांची तुह्मांला सारी माहिती त्यांना टाकून उगीच कोणाच्या तरी गळीं हा नवरत्नहार घालून फसाल वरें.

**म्हाळसा**--तें कांहीं असो, पण माझी सुंदरी अशालाच द्यायची. तुमच्या भिकारड्या विसाजीरावाला देण्यापेक्षां विहिरींत लोटून दिली तर काय वाईट ?

**सुंदरी**—[ आपल्याशीं ] ह्या विसाजीरावाचें नांव ऐकून मला तर आतां ओकारी येते; मेलें एकसारखें विसाजीराव, विसाजीराव, हें काय ?

**विसाजी**—शाबास ! तुह्मी आपल्या मुलीला विहिरींत लोटून द्याल, पण विसाजीरावाला देणार नाहीं काय ? विसाजीराव इतके वाईट ना ? एखादें राजा ह्मणवून घेणारें मेणाचें बाहुलें देसील विसाजीरावांपेक्षां चांगलें ! ठीक.

**ह्माळसा**—किती तरी मेला लुब्रेपणा ! एकदां सांगितलें, दोनदां सांगितलें, तरी आपलें आहेच.—हो मेणाचें बाहुलेंच तुमच्या विसाजीरावापेक्षां अधिक चांगलें; पुढें काय आपलें ह्मणणें ?

**विसाजी**—माझें कांहींच ह्मणणें नाहीं. कां, सुंदराबाई, बाईसाहेब म्हणतात हें आपल्याला कबूल आहेना ? ज्याच्याशीं तुम्हांला सारा जन्म घालवायचा तो खानदानीचा टोणगा असला तरी चालेल ना ?

**सुंदरी**—हो, तसेंच. तुम्हाला का त्याची पंचाईत ? अलीकडे ज्याची त्याला पायरी कळत नाहींशी झाली आहे.

**विसाजी**—मला कसची पंचाईत ह्मणा ! असो; आतां निकाल झालाच म्हणावयाचा; मी आलों होतों ह्मणून दादासाहेबांस सांगा ह्मणजे झालें. [ जाण्यासाठीं उठतो. ]

**ह्मालसा**—बरें तर, तुमची मर्जी. तुम्हांला उगीच तसदी पडली.

**सुंदरी**--हळू जा बरें !

**विसाजी** —तसदी कसची ! [ आपल्याशीं ] अस्सं, अस्सं ! यांची खोड मोडीन व या पोरीला माझ्यापुढें नाक घासावयाला लावीन तरच मी विसाजीराव ! विसाजीराव भिकारडा आं ! माझ्या इतका श्रीमान गृहस्थ या सर्व शहरांत तरी सांपडेल ? कोण हा अपमान ! आणि तो अशा या हलक्या कुळांतल्या व्यापाऱ्याच्या पोरीकडून ! बरें आहे, पाहून घेईन ! कोण तें नाक चढविणें आणि कपाळाला आंठ्या तरी किती शेंकडों ! जणू कांहीं विसाजीरावाला किडे पडले वाटतें ! पण त्या आंठ्या घातलेल्या, तें नाक चढविलेलें, तो ओंठ चावलेला पाहतांच माझ्या मनाची पण काय चलबिचल झाली होती ! वाटे कीं जाऊन या पोरीचें— छेः ! तो नाहीं विचार, आतां उपयोगी—नाक ठेंचीन तरच मी विसाजीराव. ( जातो. )

**ह्मालसा**—हे लोक तरी कसे दांडगे, फाजील असतात पहा ! पण तूं याच्या डोक्यांत चांगलें अंजन घातलेंस ! या गुलामांची अशीच खोड मोडली पाहिजे. मेल्यांना वाटतें कीं मुलगी मोठी झाली आहे तेव्हां तिला पाहिजे त्याच्या गळ्यांत बांधतील.

**सुंदरी**—पण आई, त्याला राग फार आला असावा; रागानें जळफळत गेला. मला वाटतें हा विसाजीरावच असावा. कार-

कून अशा डौलानें कधीं आलाही नसता किंवा बोलतांना असे नानाप्रकारचे थेर त्यानें केलेही नसते. अग गजे, गजे, इकडे ये. [ गजी येते तिला ] तूं पाहिला आहेस काग तो विसाजीराव?

**गजी**—नाहीं, ताईसाहेब.

**म्हाळसा**—मेला कुणी कां असेना; आमचें काय करणार विसाजीरावच असला म्हणून.

**सुंदरी**—तरी पण मी सांगतें हाच विसाजीराव असावा. [ हातांतील गजरा खेळविते. ] आई, या गजऱ्याचा वास तूं एकदां तरी घेच. [ म्हाळसाबाईकडे गजरा करिते. ] याला कांहीं फार मजेचा वास येतो. [ आपल्याशीं ] प्रत्येक दिवशीं अशीं फुलें पाठवितें तरी कोण बरें? जो कोणी असेल त्याच्या मनाजोगतें बक्षीस देईन. नाहीं पण या गजऱ्यांवर फिरफिरून माझें मन जातें. [ मोठ्यानें ] आई, आले वाटतें मामा.

[ धनाजीराव प्रवेश करितो. ]

**धनाजी**—[ जवळ येऊन ] कसें काय ताई, बरें आहे-ना? आणि ही कोण? सुंदरी वाटतें! अबबब, किती तरी वाढली ही! ये बेटा ये! [ सुंदरीजवळ बसून, तिला प्रेमानें जवळ ओढतो. ]

**म्हाळसा**.—सर्व ठीक. केव्हां आलास? घरचीं माणसें सर्व खुशाल आहेतना?

**धनाजी**—सर्व सुखरूप. दादासाहेब बाहेर गेले आहेत वाटतें? व्यापारधंदा यथास्थित चालला आहेना?

**म्हाळसा**—होय, सर्व यथास्थित आहे. पण तात्या, या चार महिन्यांत तुजकडून एक तरी पत्र आलें कारे? मेली बोटभर चिट्ठी लिहायला देखील तुला फुरसत झाली नाहींना?

**धनाजी**—ताई, तुला काय सांगूं ? या चार महिन्यांत जी कांहीं धांदल उडाली तशी पूर्वी कधींच उडाली नव्हती. लढतां लढतां जीव नकोसा झाला. आज या गांवास जा, उद्यां तिकडे जा, आज ह्या किल्ल्यास वेढा दे, उद्यां तो किल्ला सर कर, हाच एकसारखा गोंधळ. पत्र कसचें अन् काय कसचें !

**म्हाळसा**—पण इकडून तुला पत्र पाठविणें झालें होतें तें तरी वाचायाला तुला वेळ मिळाला कीं नाहीं ?

**धनाजी**—विसाजीरावाची मागणी कशी आली तर ? माझ्या सुंदरीला असाच फक्कड नवरा पाहिजे. [ सुंदरीच्या गालाला हात लावितो. ] विसाजीराव आतां इकडे कशाला आला होता ?

**सुंदरी**—आई, ऐक.

**म्हाळसा**—तर मग आतां विसाजीरावांचा कारकून ह्मणून आला होता तो विसाजीरावच कीं काय ? काय बाई आश्चर्य तरी ! आपण नव्हतें बाई असें कधीं ऐकिलें. काय ह्मणे मुलीच्या घरीं भलतेंच नांव घेऊन जायचें आणि लघळपणानें तिच्याकडे पाहायचें, तिच्याशीं बोलायचें, आपल्याच तोंडावरून दिवा ओंवाळून घ्यायचा ! ' विसाजीराव कांहीं कमी असामी नाहीं ! ' अहाहाहा, हींच का शिष्टाईची रीत ?

**सुंदरी**—तरीच ! मी तुला तेव्हांच सांगितलें, कारकून कोठचा नी कोण कोठचा ! मेल्याचे डोळे नाहीं का पाहिलेस कसे फुटले ते ?

**धनाजी**—का, तुजकडेच पहात होता कीं काय ? तर तोच विसाजीराव. अरे हरामखोरा ! [ तिचें तोंड वर करून ] बाकी त्यांत कांहीं त्याचा दोष नाहीं. सुंदरी पण सुंदरी खरी.

**सुंदरी**—हें रे काय मामा ?

**म्हाळसा**—खरेंच, मला देखील असेंच वाटतें. म्हणूनच मेल्याला असा राग आला!

**धनाजी**—पण राग यायला तुम्ही त्याला कांहीं बोललां कीं काय?

**सुंदरी**—मेल्याला राग आला म्हणून तो माझें काय करणार?

**धनाजी**—वेडी मुलगी! उगाच असें बोलूं नये; त्याचीच बायको झालीस तर कसें करशील? या तुझ्या बोलण्याची आठवण केली म्हणजे कशी वसकन अंगावर येशील?

**म्हाळसा**—इश्श्‌ बाई, अशा या हलकटाला का मी आपली पोर देईन! त्याला देण्यापेक्षां विहिरींत लोटून दिली तर काय वाईट!

**सुंदरी**—पण आई, तूं उगीच बस कशी. मामाची मुळीं चालच अशी दुसऱ्याला हिणवायची.

**धनाजी**—शाबास! सुंदरे तूं देखील मोठी चुरचुरीत बोलतेस. वाहवा! तूं आतां मोठी शहाणी झालीस! [ सुंदरीला अधिक जवळ ओढतो. ] आणि ताई, तूं तरी काय म्हातारीच होत चाललीस, तुला काय म्हणायचें?

**म्हाळसा**—हो, मी म्हातारी झालें तर. आतां तुकती कोठें चाळीशी उलटली असेल नसेल. आणि मीं असें तें काय बोललें तो तूं माझें शहाणपण बाहेर काढतोस? तुझ्या विसाजीरावापेक्षां तुला वाटतें या पृथ्वीवर दुसरा कोणीच चांगला नाहीं.

**धनाजी**—नाहींच; विसाजीराव कसा गब्रू आहे तें माहीत आहे? विसाजीराव म्हणजे नऊकोटी नारायण बरें! त्याचा तोडीचा दुसरा सावकार नाहीं! [ **सुंदरीला** ] त्याच्या घरीं आपण पडलां म्हणजे काय रात्रंदिवस हिरेमाणकांत आणि सोन्यामोत्यांत लोळाल. मग होईल का या मामाची आठवण?

**सुंदरी**—मामा, किती तरी मेली थट्टा करायची! मी निघून जाईन अं अशानें! त्या मेल्याचें नांव ऐकून ऐकून माझें तर बाई कपाळ दुखूं लागलें!

**म्हाळसा**—असेल मेला, मोठा असला तर आपल्या घरचा; पण माझी पोर सावकाराच्या घरीं मुळींच द्यायची नाहीं. पैसा घेऊन काय चाटायचा? पैसा असला म्हणून पोरीला कसचें सुख? या मेल्या सावकारांचें तर नांवच ऐकून मला चीड येते.

**धनाजी**—अबबब! हें प्रकरण इतकें वाढलें आहे का? मला काय ठाऊक? मरो तो विसाजीराव! तर मग गुणाजीराव तुमच्या मनांत भरला आहे की काय? दादासाहेबांनीं गुणाजीरावाबद्दलही मला लिहिलें होतें.

**म्हाळसा**—कोण, गुणाजीरावाला का मी आपली पोर देणार? त्या मेल्याला पोटभर अन्न मिळायची सुद्धां मारामार!

**धनाजी**—मग तुला आवडतो तरी कोण? विसाजीराव सावकार म्हणून तो वाईट; गुणाजीराव सरदार, पण त्याला पोटभर अन्न सुद्धां मिळत नाहीं म्हणतेस; तर तुमची मुलगी द्यायची तरी कोणाला? कोणी एखादा राजा किंवा बादशहा पाहिजे वाटतें? सुंदरे, तूं बादशाहाची पट्टराणी होणार तर मग? [ तिच्या तोंडाकडे पहातो. ]

**म्हाळसा**—हो, आमच्या मुलीला राजाच पाहिजे. मग पुढें काय तुझें म्हणणें? माझी पोर राजालाच द्यायची. आता तर झालें?

**धनाजी**—पण तुमच्या मुलीकरितां राजा आणायचा कोठून? एखादा शेणामातीचा लिंपून तर तयार करायचा नाहीं? आमच्या राज्यांत काय तो एक राजा, तो तर आहे नि नाहीं सारखाच.

तात. असें असून तूं आपली मुलगी राजालाच द्यावयाची ह्मणतेस याचें मला नवल वाटतें. राजेराजवड्यांची तुह्मांला काय माहिती आहे ?

**ह्माळसा**—पण कांहीं असलें तरी माझी मुलगी राजालाच द्यावयाची.

**धनाजी**—दे बाई, आपली मुलगी राजालाच दे; तूं आपली गाढवाच्याच गळ्यांत माळ बांध; उगीच मला कशाला पाहिजे ती उठाठेव. पण तूं इतकी मोठी झालीस तरी अजून देखील ही वेडी समजूत जात नाहींना ?

**ह्माळसा**—होय, अजून देखील राजा ह्मणजे मला परमेश्वरच वाटतो; तूं कांहीं बोललास तरी माझी मुलगी राजालाच द्यावयाची, समजलास ?

**गजी**—[ प्रवेश करून ] बाईसाहेब, देवीला जावयाचें आहेना ? वेळ झाली.

**ह्माळसा**—खरेंच बाई बोलतां बोलतां केंव्हांच दुपार टळली, चल सुंदरे, तूं येणारना मजबरोबर देवीला ? [ दासीस. ] जा बाई तयारी कर. मी आलेंच. [ दासी-गजी-जाते. ]

**धनाजी**—बरें तर ताई, मीही येतों. छावणींत हजर असलें पाहिजे. दादासाहेब उद्यां सकाळीं भेटतील वाटतें; सकाळीं घरींच असतात ना ?

**ह्माळसा**—होय, सकाळीं प्रहर दिवसपर्यंत घरींच असायचें. आजच कांहीं काम होतें ह्मणून बाहेर जायचें.

**सुंदरी**—[ फडताळांतून हलवा काढून आणून ] मामा, संक्रांतीला गांठ पडली नाहीं. आतां तरी हा हलवा घे. "तीळगूळ घ्या, गोड बोलायला शिका."

**धनाजी**—वाहवा ! तूं अलीकडे फारच शेफारली आहेस.

**सुंदरी**—इश्श ! मामा, मातीचा कारे राजा असतो ? आणि त्या ह्मातान्याशीं का तूं माझें लग्न लावणार ?

**ह्माळसा**—शाबास ! तूं तरी बराच बोलतोस; हें बोलणें तुला शोभतें तरी का ? अरे, राजा न मिळायला झालें काय ?

**धनाजी**—रागावूं नको. तूंच विचार करून पहा. मी दुसरें काय बोलूं बरें ? तूं आपली मुलगी राजास द्यावयाची ह्मणतेस, पण तुझ्या मुलीला माळ घालणारा राजा आणायचा तरी कोठून ? राजे लोक पैशापासरीच आहेत नाहीं ?

**म्हाळसा**—कोठून येणार ह्मणजे ? असें रे काय विचारतोस तें ? पृथ्वीच्या पाठीवर दुसरे कोणी राजेच का नाहींत ? तिच्या नशिबीं असेल तर त्यांपैकींच कोणी तरी तयार होईल.

**धनाजी**—एकंदरींत तुमची मुलगी राजासच द्यावयाची. आमच्या सुंदराबाईसाहेब राजाधिराज, समस्तराजशेखर, राजराजेश्वर निर्गुणेश्वर महाराजांच्या पट्टराणी होणार. समजलों बरें.

**म्हाळसा**—तात्या ! अजूनही थट्टाच का ? माझ्या एकुलत्या एक पोरीची तुला कांहींच माया नाहींना ?

**धनाजी**—अग माया कशी नाहीं ? आमच्या सुंदराबाईकरितां राज्यलक्ष्मीनें वरलेला मूर्ख टोणपा कोठें सांपडेल याचाच मी आतां पासून विचार करायला लागणार. पण एक बारीक गोष्ट विचारूं का ? त्या राजानें आमच्या सुंदराबाईच्या कुळाची चौकशी केली म्हणजे कसें ?

**म्हाळसा**—तुला बाबा वाटेल तसें बोल. तोंड आहे ह्मणून बोलतोस झालें !

**धनाजी**—मी तरी काय वाईट बोललों बरें ? हल्लींचे राजे ह्मणजे अक्कलशून्य कळसूत्री बाहुल्यासारखे असतात; नाहीं तर नानाप्रकारच्या व्यसनांच्या तडाक्यांत सांपडलेले अस-

माझी थट्टा करितेस का? बरें, बरें. ताई, येतों आतां. लोभ असूं दे. राजा मिळालाच तर या गरिबाला विसरूं नका! [जातो.]

**म्हाळसा**—पाहिलेंस हा देखील कसें बोलायला शिकलातो? धन्य बाई या लोकांची, यांना दुसऱ्याचें चांगलें पहावतच नाहींका?

**सुंदरी**—पण, आई, कोणग नेहमीं अशीं सुरेख, शेलकीं फुलें पाठविते हें? कोणबाई, अशीं सुवासिक फुलें मला नेहमीं पाठवीत असेल कोण जाणे. [आपल्याशीं] मजवर कोणाचा इतका लोभ हा!

[ म्हाळसाबाई व सुंदरी जातात. ]

---

## प्रवेश दुसरा.

( विसाजीराव व गुणाजीराव येतात. )

**विसाजी**—तूं कांहीं म्हटलेंस तरी मी नाहीं खरें म्हणायचा. तूं उगीच येणार? छेः कध्धीं व्हायचें नाहीं तें!

**गुणाजी**—अरे, मी खरेंच सांगतों, तूं येथें येण्याविषयीं पुष्कळ दिवस आग्रह करीत होतास, म्हणून मुद्दाम आज इकडे आलों. नाहीं तर इतकें दूर येण्याचें दुसरें काय कारण होतें बरें? पण विसाजीराव, आज तुझें तोंड कांहींसें उतरलेलें दिसतें?

**विसाजी**—काय सांगूं? या जिवाला आजपर्यंत हिरमोड ठाऊक नव्हता. माझ्या पैशानें लागेल तें मी पैदा करीत होतों. पण एका कामांत माझी बेअब्रू झाली म्हणून माझ्या

अंगाचा संताप झाला आहे. काय करूं कसें करूं या मंत्राचा सारखा जप चालू आहे.

**गुणाजी**—अरे झालें तरी काय? व्यापारांत कोठें ठोकर लागली कीं काय? नाहींना? मग तुलारे कसला हृद्रोग? अजून तुझें लग्न देखील झालें नाहीं; बायकामुलांचा तुला मुळींच त्रास नाहीं.

**विसाजी**—अरे तेंच तेंच माझ्या दुःखाचें मूळ. या संसारांत सुख कायतें बायकामुलांपासून, पण माझें लग्नच होत नाहीं; तर मला कसचें सुख? गुजरींतील दादासाहेब तुला माहीत आहेतच. त्यांना एकुलती एक मुलगी आहे, तिचें नांव सुंदरी; ती तूं कधीं पाहिली आहेस?

**गुणाजी**—पाहिली आहेस? तिला पाहिल्यावांचून कोणाच्यानें राहवेल? सुंदरी पण सुंदरी खरी—रतीसारखी सुंदर; पण तिच्या अभिमानाचाही तसाच चढ आहे.

**विसाजी**—अभिमानाला तर उपमा नाहींच, आणि तिच्या शहाणपणाला तरी कांहीं उपमा असावी? तिची आई तर तिजपेक्षांही दीर्घ शहाणी. त्या दोघींनाही मी आवडलों नाहीं. त्या म्हातारडीला एक चळ लागला असेल, पण पोरीलाहीं येवढी अक्कल असूं नये? तिनें मला झिडकारिलें! मला साफ नाहीं म्हणून सांगितलें! मला—या विसाजीरावाला—साफ नाहीं म्हणून सांगितलें! काय करूंरे!

**गुणाजी**—काय म्हणतां? तिनें असा उर्मटपणा केला आं! फारच वाईट. [आपल्याशीं] मला देखील तिनें असेंच सांगितलें; आतां फार चांगलें झालें. निराशा झाल्यामुळें माझें कपाळ फार फिरून गेलें होतें, पण आतां माझा कपाळशूळ बरा झाला. ती मला मिळत नाहीं, तर याला तरी काय म्हणून मिळावी? [विसाजीरावास] पण काय हो, नाकारण्याचें कारण तरी?

**विसाजी**—मला तर कांहीं कारण दिसत नाहीं. तिच्या आईच्या मनांतून आपली मुलगी एखाद्या राजेरजवाड्याच्याच घरीं द्यावयाची; पण या पोरीला तरी कांहीं अक्कल असावी ? तिला देखील राजाच पाहिजे. आतां तूंच पहा, यांनीं काय पाहिजे तें केलें तरी ह्या पोरीला राजा कोठचा मिळणार ? आमचा राजा तर यांच्या उपयोगीं नाहीं ? "बस्स; राजा पाहिजे, राजा." मी नको. या विसाजीरावाला "इश्श मेला" ह्मणते ! बरें, पाहून घेईन; या पोरीची खोड मोडीन तरच मी विसाजीराव.

**विसाजी**—अरे पण त्यांत इतकें वाईट वाटण्याचें काय कारण ? तिची मर्जी; त्यांत, तुझाच असा अपमान झाला असें नाहीं. मलाही तिनें साफ नाहीं ह्मणून सांगितलें.

**विसाजी**—तुलाही नाहीं ह्मणून सांगितलें ? पण ती एक वेगळी गोष्ट. मी ह्मणतों तुला नाहीं ह्मणून सांगितलें तरी चालेल—पण मला, या विसाजीरावालाही साफ नाहीं ह्मणून सांगितलें ह्मणजे काय ? कांहीं तरी युक्ति काढून ह्या पोरीचें नाक ठेचीन, हिला फजीत करीन तरच मी विसाजीराव. या दिमाखखोर पोरीला राजा पाहिजे राजा ! पण एखाद्या नांगऱ्या राजाशीं लग्न लावून दिलें नाहीं तर मला विचार. कोण हा गर्व ! —द्रव्याचा धूर बरें हा धूर ! डोळे फिरून गेले आहेत. यांच्या मागची पिढी कशी होती, कोणतें काम करीत होती, तें आतां यांना आठवत नाहीं. नांगराची पुनः ओळख दिली पाहिजे.

**कारकून**—[ प्रवेश करून, ] महाराज, आपण सांगितल्या प्रमाणें व्यवस्था केली.

[ पडद्यापलीकडे "महाराजाजीकी जय"
असा मोठ्यानें ध्वनि होतो. ]

**विसाजी**—"महाराजाजीकी जय !" हे कोठचे कोण महाराज ?

**कारकून**—पोरें त्याला नेहमींच महाराज ह्मणतात. आतांच त्यानें निशाण मारून बक्षीस मिळविलें, ह्मणून हे त्याचे सोबती बहुशः त्यालाच मोठ्या थाटानें घरीं पोंचवीत असावेत. हा त्यांचा आनंदाचा गजर असावा.

**विसाजी**—त्यानें बक्षीस मिळविलें! त्याचे सोबती! पण तो कोण?

**कारकून**—हें आपणास अजून माहीत नाहीं? तो आपल्या या गांवांतील पोरांचा राजा, शिवाजी त्याचें नांव. आपणास हा शिवाजी माहीतच नाहीं कीं काय?

**विसाजी**—कोण? रुद्राजी बागवानाचा पोर शिवाजी का काय? तो मात्र मला माहीत आहे. तोच शिव्या बागवान कीं काय हा?

**कारकून**—तेच हे शिवाजी राजे; असा हुशार, दाणा आहे—

**विसाजी**—हुशार, दाणा ह्मणजे? हा इतका चांगला बागवान आहे?

**कारकून**—तो आतां बागेचें काम करीत नाहीं, व पेरू, डाळिंबेंही विकीत नाहीं. रुद्राजी मेला त्यावेळीं याच्या हातीं बराच पैसा लागला. पण मुलगा काय विचारितां? अगदीं दिवाच—

**विसाजी**—अगदीं दिवाच!—ह्मणजे त्यानें काय केलें?

**कारकून**—एखादें पोर मोठें हुशार असतें, पण चांगली गोष्ट जेवढी असेल तेवढी मात्र तें करावयाचें नाहीं. बाकी सर्व कामांत मोठें शूर व उमदें असतें, त्याला दिवा ह्मणतात; त्यांतलाच हा शिवाजी!

**विसाजी**--तूं तरी कांहीं चमत्कारिकच सांगतोस ; हें बागवानाचें पोर असें आहे ?

**कारकून**—नाहीं तर काय? रुद्राजी मरून चार वर्षें झालीं असतील; तो मेला त्यावेळीं त्याजवळ बराच पैसा होता; त्याला हा शिवाजी कायतो एकटाच मुलगा. बाप मरून पैसा हातीं लागतांच या शिवाजीचें रूप बदललें; तो लिहिणें, वाचणें शिकूं लागला. आपल्या घरीं त्यानें एक पंतोजी ठेविला; नंतर तो दांडपट्टा खेळावयास शिकला; कांहीं वेळानें चित्रें काढावयास लागला. पहिल्यानें त्याच्या बरोबरीचीं पोरें त्याची थट्टा करीत व त्याचे हे थेर पाहून त्याची टर उडवीत; त्याचें नांव शिवाजी ह्मणून त्याला त्यांनीं ' महाराज ' असें थट्टेनें ह्मणण्याची सुरूवात केली. मोठेपणा मिळण्याची त्याची हाव पाहून त्याला त्यांनीं हा नवा किताब दिला. पण तो असा वस्ताद, चिलंदर, कीं कोणी पोरानें त्याची थट्टा केली कीं लागलाच त्याला पलाखतीचा मार देई. अशा रीतीनें त्यानें त्या सान्यांवर आपला वचक बसविला व त्यांना आपल्या कह्यांत आणलें. शेवटीं त्याच्याशीं सामना करण्यास कोणी राहिला नाहीं आणि त्याच्याशीं वाकून राहण्यांत फायदा नाहीं असें जेव्हां त्यांना पूर्णपणें दिसलें तेव्हां ते त्याशीं मोठ्या सलगीनें वागूं लागले; आतां तर त्याच्या अंगच्या चांगल्या गुणांमुळें त्यांना तो इतका आवडतो कीं तो त्यांचा राजा बनला आहे; आणि ' महाराज ' हें नांव आतां थट्टेचें नसून तें सन्मानसूचक झालें आहे. एक सारखा त्याचाच शब्द खेळीत असतात. फार काय ? गावांतील बहुतेक पोरींनाही त्याचेंच वेड लागलें आहे.

**विसाजी**—वाहवा ! मुलगा तर दाणाच दिसतो खरा.

**कारकून**—गावांतील सर्व पोरांचा तोच नाईक आहे. शिवाय त्याचा पोशाखही असा ऐटबाज असतो कीं

त्याला कोणी राजाच ह्मणेल. खरेंच, महाराज, हा बागवाना-चा मुलगा खरा, पण त्यानें तो पोशाख केला ह्मणजे थेट राजाच दिसतो.

**विसाजी**—पण असा पोशाख करण्याचा अर्थ काय? हें वेड त्याच्या माथ्यांत भरण्याचें कारण?

**कारकून**—दुसरे लोक ज्याकरितां नाचतात तेंच--तो एकीच्या नादीं आहे.

**विसाजी**--शाबास! या बागवानाच्या पोऱ्याला देखील तेंच वेड ना? गावांतल्या कित्येक गरिबागुरिबांच्या पोरीं-च्या संसाराचें यानें मातेरें केलें असेल!

**कारकून**--रावसाहेब तो त्यांतला नाहीं.

**विसाजी**—काय ह्मणतां! हे बागवान महाराज मोठे पा-पभीरू अर्वाचीन शुकाचार्य आहेत तर!

**कारकून**—रावसाहेब, आपल्याला वाटेल तशी थट्टा करा. पण त्याचें आचरण तसेंच शुद्ध आहे खरें.

**विसाजी**—हो, तसें का नसेल? हल्लीं जगच सारें उलटें होत चाललें आहे. पण त्याची ती कोण?

**कारकून**—रावसाहेब, आग्रह करूं नका. तें मला सांगतां येत नाहीं.

**विसाजी**—वेडा तर नाहींस? अरे, आह्मी का तिला पळ-वून नेतों?

**कारकून**—रावसाहेब, तसें नव्हे—ही गोष्ट कोणाजवळ बोलायची नाहीं असें त्याच्या आईनेंच मला सांगितलें.—गरी-ब बिचारी! ती ह्मणाली, या वेडयाला असा नाद पाहिजे कशाला? दादासाहेब केवढा सावकार! त्याची मुलगी या वेडयाला कशी बरें वश होईल?

**विसा० व गुणा०**—वाहवा! वाहवा!

**कारकून**—रावसाहेब, मनाचा सवदा कांहीं विलक्षण आहे! आपण पाहिजे तर गरिबाची थट्टा करा, पण मीं सांगितलें हें अगदीं खरें आहे.

**विसाजी**—मग तुमची सुंदरी काय ह्मणते? त्यानें गोष्ट तर काढिली असेलच. तिचा रुकार मिळायला काय उशीर? असल्या स्वारीच्या गळयांत माळ घालायला ती काय एका पायावर तयार असेलच. का, गुणाजीराव, खरें की नाहीं?

**गुणाजी**—हें काय विचारतां! अलबत.

**कारकून**—ती याची गोष्ट ऐकून घेणार? ती तर गर्वानें अगदीं भरलेली, ती या बागवानाच्या पोराकडे पाहील तरी का? लहानपणीं हा आपल्या बापाबरोबर तिच्या बापाच्या बागेंत काम करीत असे; तेव्हांच याचें मन तिच्यावर बसलें. हसतां काय त्याला? त्याच्याप्रमाणेंच पुष्कळ मी मी ह्मणविणाऱ्यांना देखील तिनें वेडे करून सोडलें आहे! त्या वेळीं हा फुलें घेऊन तिच्या घरीं जात असे, पण तेव्हां हिची नजर या कस्पटाकडे जात नसे; आतां तरी ती याला का वश होईल?

**विसाजी**—नाहीं कशावरून? तिनें याकडे ढुंकून सुद्धां पाहिलें नाहीं असें तूं खातरीनें सांगतोस?

**कारकून**—रावसाहेब, त्याची आईच ह्मणत होती "माझा शिवाजी तिच्या नादास लागला आहे खरा, पण ती याकडे नुस्तें पहात सुद्धां नाहीं; हा कोण हें देखील तिला माहीत नाहीं." मग ती याला कशी बरें मिळणार?

**विसाजी**—तें तर खरेंच; बरें. तूं आतां आपल्या कामास जा.

**कारकून**—येतों, रावसाहेब. [ जातो. ]

**विसाजी**—कां गुणाजीराव, पाहिलीस कशी गंमत आहे ती? [ आपल्याशीं ] पण आतां युक्ति सुचली; कशी मौज करितों ती तर पहा. सुंदरे, हाच तुझा राजा बरें—आतां या बागवानाच्या पोरालाच आमच्या सुंदरी बाईसाहेबांकरितां राजा बनवायचा? तिला राजा पाहिजेना! घे ह्मणावें हा राजा!

**गुणाजी**—अहो स्वारी! काय, बेत कसले चालले आहेत?

**विसाजी**—तूं तर अगदीं दगडच आहेस; अरे येवढें तुला कळेना? याच बागवानाच्या पोराला आतां राजा करायचा; हा कोठचा राजा ह्मणून कोणीं विचारिलें, तर हा दूर-देशचा राजा येथें आला आहे, ह्मणून सांगायचें. त्याला राजाप्रमाणें सजवायचा; लागेल तेवढा पैसा कपडा, लत्ता, गाड्या, घोडीं, पाहिजेत तेवढीं द्यायचीं; सारांश, असा थाट उडवून द्यायचा कीं सर्व लोकांना हा कोणी राजा आहे असेंच वाटावें. तसें झालें ह्मणजे कांहीं तरी युक्ति योजून दादासाहेबांची व याची भेट करून द्यायची ह्मणजे मग हा आमचा राजा सुंदरी व सुंदरीची अई यांच्या मनांत खासच भरणार; नंतर लग्नाची गोष्ट काढून पहायचें. आमचा राजा तर लग्नाला तयार आहेच व सुंदरीलाही राजाच पाहिजे; आणि त्यांतून राजेपणाला साजण्यासारखा हा आहेच; तेव्हां सुंदरी त्याला कबूल होणारच!

**गुणाजी**—वाहवा! ही युक्ति तर फारच चांगली खरी; पण ह्या राजाला सजविण्यास पैसा पाहिजे तो कोठून आणायचा?

**विसाजी**—कोठून आणायचा! मूर्ख कोठचा! येवढी मोठी गंमत करायची; मग थोडेसे पैसे खर्च झाले ह्मणून काय हरकत आहे? फार फार तर पांच, सात हजार रुपये लागतील; तर अशा वेळीं पैशाकडे पहायचें? आह्मां दोघां-

चाही या पोरीनें अपमान केला, आह्मांला इश्श् ह्मणते इश्श्. आमच्या अंगाला किडे पडले काय ? हिला राजा पाहिजे राजा; हिचा पक्का सूड घेईन, ह्या सुंदरीची फटूफजिती उडवीन, साऱ्या गांवांत तिची नाचक्की होईल असें करीन तरच मी विसाजीराव !

**गुणाजी**—घे तर, हा हातावर हात; लाग त्याच उद्योगास; मला देखील या पोरीचा फारच राग आला आहे; मला साफ नाहीं ह्मणून सांगितलें ! हिला या गुणाजीरावाचा प्रताप अजून माहीत नाहीं ! पण आतां या कामास आरंभ केव्हां करायचा !

**विसाजी**—आरंभास काय उशीर ! हेंच पहा आतांच त्या शिवड्या बागवानाला पत्र लिहितों. [ उठतो. ] चल आतांच पत्र लिहूं.

**गुणाजी**—पण आपली एकट्याचीच सही करूं नको. माझेंही नांव त्यावर असलेंच पाहिजे. [ जाऊं लागतो. ]

**विसाजी**—तूं ही थट्टा समजूं नको. माझा निश्चय खरो-खरच झाला. मी खरोखरच आतां पत्र लिहितों. या पोरीची टर उडवून देईन तरच मी विसाजीराव !

[ विसाजीराव व गुणाजीराव जातात. ]

---

## प्रवेश २ रा.

### शिवाजीरावाच्या घरांतील खोली.

[ सतार वगैरे वाद्यें इकडे तिकडे पडलीं आहेत; एका बाजूस कांहीं कागद पडले आहेत, जवळच एक तसबीर कपड्यानें झांकलेली टांगलेली आहे. पड्याच्या आंत " शिवाजी महा-राजकी जय " असा मोठ्यानें शब्द होतो. ]

**शिवाजीरावाची आई**—[ प्रवेश करून ] हं, शिवाजी आला वाटतें; माझ्या शिवाजीनेंच वाटतें आज बक्षीस मिळविलें, ह्मणून त्याचे सोबती त्याला घेऊन इकडे येत आहेत. बहुतकरून हे राजश्री आनंदाच्या भरांत आतां यांना जेवणाचा आग्रह करणार, ह्मणजे मात्र आली माझी पंचाईत.

**शिवाजी**—[ पडद्याच्या आंत ] अरे, थांबतां कां ? माझे मित्र असून आज माझ्याच घरीं येत नाहीं ? [ स्मरण करून ] हं हं, तिकडे जायचें असेल वाटतें ? बरें तर जा, पुनः केव्हां तरी या ह्मणजे झालें.

[ आंत " शिवाजी महाराजकी जय " असा मोठ्यानें ध्वनि होतो. ]

( शिवाजीराव खांद्यावर बंदुक टाकलेला असा प्रवेश करितो. )

**शिवाजी**—[ ह्मातारीपुढें बंदुक ठेऊन व पायांवर दंडवत घालून ] आई, ही पाहिलीस माझी बंदुक ? आजचें बक्षीस तुझ्या पुण्याईनें मलाच मिळालें; आज जर एक नेम चुकला असेल तर शपथ-पण ही माझी बंदुक कशी आहे ? मोठी सुरेख आहे, नाहीं ?

**शि० आई**—अरे, आहे हो, तुझी बंदुक सुरेख आहे. पण शिवाजी, आपल्यासारख्या गरीबांना बंदुक घेऊन काय करावयाचें ? आपल्याला काय बरें तिचा उपयोग ?

**शिवाजी**—काय उपयोग ! अग या बंदुकीच्या साहाय्यानें मी आतां मोठेपणा मिळविणार.

**शि० आई**—शिवाजी, तूं, बाबा अगदीं वेडा आहेस, अरे मोठ्या लोकांना मोठेपणा, तो आपल्यासारख्या गरीबांना काय होय ? बाबा, तुझें मोठेपणाचें हें मनोराज्य आहे. मोठेपणा उगीच चालत नाहीं; त्याला किती खर्च येतो, याचा विचार तरी केला आहेस का ? ह्या तुझ्या मनोराज्यानें शेवटीं

हातीं झोळी येईल, समजलास? लिहिणें वाचणें शिकावें ह्मणून पंतोजी ठेविलास; चित्रें काढूं लागलास; गाणें शिकूं लागलास; तसेंच, दांडपट्टा खेळावयास शिकलास; सतार तबला वाजविण्यास शिकलास; सर्व शिकलास खरा, पण हे वेडे छंद करावयाला पाण्यापरी पैसा ओतावा लागला, हें तुला समजतें का? मी ह्मणतें हें सर्व तूं शिकलास, पण पैसा गेल्यावर पोटाची काय वाट? या चैनीच्या छंदांनीं पैसा का मिळतो!

**शिवाजी**—आई, तूं तरी वेडीच आहेस. पैसा नाहीं मिळाला ह्मणून काय झालें? ज्ञान मिळतें, बुद्धि वाढते, मनाला सुख होतें, लोकांत मोठेपणा मिळतो; आणि सर्वांहून श्रेष्ट फायदा हा कीं मम जिवाची प्रियकरणी सुंदरी मिळविण्याची योग्यता माझ्या अंगीं येते. आणखी तें काय पाहिजे?

**शि० आई**—वेडारे वेडा! देवा काय या माझ्या मुलाच्या नशिर्वी तूं लिहिलें आहेस कोण जाणे! शिवाजी, तुला हा उगीच नाद लागला आहे बरें, अरे, सुंदरीचा बाप ह्मणजे लाखापती सावकार, तो आपली एकुलतीएक मुलगी तुजसारख्या गरीबाला देईल का बरें? ती मुलगी तुजकडे पहायाची सुद्धां नाहीं. तुझें पुढें कसें होईल याची मला फार धास्ती वाटते. तिच्या या नादानें तुझें डोकें अगदीं फिरून गेलें आहे.

**शिवाजी**—आई! तिनें मजकडे पाहिलें नाहीं ह्मणून देवदेखील मजकडे पहायचा नाहीं कीं काय? भयंकर तुरुंगांत अगदीं तळघरांत अंधार कोठडींत एखादा बंदीवान् असतो, त्याला देखील देव पहातो, त्यानें धांवा केल्यावर त्यालाही देव पावतो, मग मी देवाची प्रार्थना केली, तर देव मला पावणार नाहीं? माझा सर्व भार देवावर आहे, असें असून तो माझी इच्छा पूर्ण करणार नाहीं? [ चित्राजवळ जाऊन वरील

पडदा एकीकडे करितो.] ही पहा माझ्या सुंदरीची तसबीर; मी चित्रें काढावयास शिकलों पण माझ्या सुंदरीवांचून दुसऱ्या कोणाचेंही चित्र मला काढितां येत नाहीं. माझा हातच वळत नाहीं दुसऱ्याचा चेहरा काढण्यास. हें मोहक तोंड, हे गोंडस, लुसलुशीत अवयव ज्या कलमानें काढले तें मी दुसऱ्याच्या स्पर्शानें कसें विटाळूं? मी आपलें सर्व कसब खर्च केलें तरी मजकडून माझ्या सुंदरीचें हुबेहुब चित्र निघालें नाहीं. पण तिचें हुबेहुब चित्र निघणार तरी कसें? तिच्या अनुपम सौंदर्याची कल्पनाच करितां येत नाहीं. मी खास सांगतों, कितीही कुशल चितारी आला तरी त्यालाही माझ्या सुंदरीचें अगदीं बरोबर चित्र काढितां येणार नाहीं. माझी सुंदरी अशीच मोहिनी आहे! आतां दुसरें चित्रच काढावयाचें नाहीं. आतां मी आपलें कलम टाकून तरवार बंदूक हातीं घेणार; बस, शिपाई बनून लढाईंत जावयाचें;—पण माझी सुंदरी येथें असून ही जागा माझ्यानें सोडून जाववेल? [आंत आलेल्या उन्हाकडे पाहून] अं, इतका उशीर! आई, तुला एक गम्मत सांगावयाची राहिलीच आहे. दोन महिने झाले, रोज निवडक सुवासिक व छान फुलें घेऊन त्यांच्या वेण्या, गजरे करून मी या सुंदरीला मुद्दाम पाठवीत असतों हें तुला माहीतच आहे. मीं पाठविलेल्या वेण्या, गजरे सुंदरीला फारच आवडतात, ऐकलेंस? मीं पुष्कळ वेळां पाहिलें आहे कीं त्याच वेण्या तिच्या बुचड्यावर असतात; ह्मणून मला कांहींसा धीर आला. आज मीं असें केलें कीं सकाळीं फुलें पाठवून दिल्यावर तिच्याकडे एक पत्र पाठविलें. असें मधुर, प्रेमळ पत्र लिहिलें आहे सांगूं? त्यावर मीं आपली सहीही केली आहे. तिला वाचतां येतें, ह्मणून माझें पत्र तीच वाचील!—अरे पण मीं पत्र देऊन मनुष्य पाठविला त्याला इतका उशीर कां झाला कोण जाणें

शि० आई—देवा, देवा देवा ! ! शिकस्त झाली आतां ! याच्या या वेडाला हसावें का रडावें कांहींच समजत नाहीं. पत्रें पाठवून मुलीला मागणी करण्याची नवीच तऱ्हा पाहिली बाई ! पण शिवाजी, ती तुला काय उत्तर देईल असें वाटतें ?

शिवाजी—काय उत्तर देईल ह्मणजे ! मी खास सांगतों, माझें पत्र वाचून ती आपल्या मनांत खुलेल. आपल्याशींच ह्मणेलः "किती तरी बाई गोड पत्र लिहिलें आहे पण ! त्यां-तील स्तुति वाचून तिला उत्कंठा उत्पन्न होईल असें मोहक लिहिणाराची गांठ घेतलीच पाहिजे." आणि मग ती हळूच आईचा डोळा चुकवून कागदावर "मला अमक्या ठिकाणीं अमक्या अमक्या वेळेस गुपचूप येऊन भेटा" असें लि-हील. मग मी माझ्या सुंदरीला भेटावयास जाईन. मी तेथें गेलों ह्मणजे ती मला एकीकडे बोलावून मजपाशीं बोलावया-स लागेल, तेव्हां मी एकसारखा तिचेंच मधुर भाषण ऐकत बसेन ! मधून मधून ती मजकडे हळूच पाहील; तेव्हां मीही माझ्या प्रियेकडे चोरून पहात असेनच. तेव्हां आह्मां दोघांची एकदृष्टि होईल ! मग ती लाजेल व मध्यें मध्यें हळूच हसे-ल ! अशी हसून लाजूं लागली ह्मणजे तीच प्रेमाची निशाणी ! ती आपली मान कांहींशी खालीं करील; मग मी हळूच तिच्या मुखाकडे पाहीन ! तेव्हां तिच्या सानंद व लज्जायुक्त चर्ये-वरून तिचें मजवर असलेलें मन मला सहज कळून येईल ! तितक्यांत ती आपली मान कांहींशी वर करील, पण मी तिच्या मुखाकडे पहात असल्यामुळें तिला अधिकच लाज वाटेल. खचित हा बागवानाचा मुलगा तिचें हृदय चोरणार.

शि० आई—अबबब ! धन्य ग बाई या पोराच्या वेडाची ! येवढा मोठा झाला तरी व्यवहारज्ञानाच्या नांवानें आंवळ्या-येवढें पूज्य ! अरे, ती तुजकडे एकदां तरी पाहील, किंवा

एखादा तरी शब्द तुजपाशीं बोलेल तर कीं नाहीं हें तुझें मनोराज्य ?

**शिवाजी**—पण खातरीनेंच ती मजकडे पाहील, मला पाहून लाजेल, हळू हळू, लाजत लाजत, ती मजपाशीं बोलूं लागेल! "पैसा घेऊन काय करावयाचें, मला किनई बाई पैशापेक्षां गुणच अधिक आवडतात" असें तीच स्वतः डोळे मुरडीत व मुरकत मुरकत ह्मणेल! मग आपल्या स्मरणार्थ ह्मणून कांहीं तरी प्रेमचिन्ह मला देईल; बहुतकरून आपल्या हातांतील मोतियाचा गजरा—मींच तयार करून दिलेला—लीलेनें माझ्या अंगावर फेकील. मग काय विचारावें! माझा आनंद त्रिभुवनांत मावणार नाहीं! त्या गजऱ्याचें कितीदा जरी चुंबन घेतलें तरी माझी तृप्ती होणार नाहीं. तेथून कष्टानें पाय काढला कीं धरलीच लष्कराची वाट. माझी हां हां ह्मणतां बढती होईल. वरवर चढत जाऊन मी मोठेपणाच्या कळसास जाऊन पोंचेन. मग माझा लौकिक काय विचारावा! कोणत्याही सुंदर स्त्रीला माझें नांव ऐकून अशाच्या जन्माची आपण भागिदारीण व्हावें असें वाटूं लागेल! मग माझ्या प्रियेला काय वाटेल हें तूंच पहा! माझें नांव ऐकून तिला मोठा अभिमान वाटेल. मी परत येईन व माझ्या सुंदरीला भेटेन; व प्रेमाच्या गोष्टी बोलत असतां मी आपल्या सुंदरीला असें सहजरीत्या बोलेन: "प्रिये, हलक्या घराण्यांतील पुरुषाचें व एखाद्या कुलीन, श्रीमान घराण्यांतील अतिशय सुंदर स्त्रीचें प्रेम जडलें, तरी त्यापासून त्या कुलीन सुंदरीला कमीपणा येत नाहीं. पण त्या हलक्या घराण्यांतील पुरुषाला मात्र मोठेपणा येतो!" मग ती लाजून हळूच गालांत हंसेल व एकदम मला घट्ट मिठी मारील देखील. तिच्यानें शब्दही बोलवणार नाहीं. आई, तूं हसूं नको. या तुझ्या लेकाच्या अंगीं किती

पराक्रम आहे हें तुला व साऱ्या जगाला दाखविल्याशिवाय हा शिवाजी राहणार नाहीं हें पक्कें समज.

[ दारावर थाप बसते. ]

शि० आई—कोण आहे ? अरे उघड, आंतून कडी नाहीं.

( संतु दरवाजा उघडून प्रवेश करितो. )

शिवाजी—वाहवा ! तूंच का तो ? किती उशीर केलास ? मी तर एकसारखा तुझीच वाट पहात होतों. आण आण लवकर तिची ती प्रेमदूती. [ संतु मान फिरवितो. ] अशी मान का फिरवितोस ? पत्र, पत्र कोठें आहे ? बोल. [ संतु एक पत्र देतो. ] हें पत्र आणिलेंस ? हें तर मींच दिलेलें ! अरे, माझें पत्र तूं तिला दिलेंच नाहींस ?

संतु—मी तुझें पत्र तिजकडे पाठवून दिलें, पण—

शिवाजी—पण काय ? तिनें माझेंच पत्र मला परत पाठविलें ? उत्तर वगैरे कांहीं दिलें नाहीं ?

संतु—फार-फार चांगलें उत्तर मिळालें; नामी उत्तर मिळालें; खासें उत्तर मिळालें. आपण शिवाजी राजे-नाहीं, चुकलों-महाराज-आपला मी दूत. आपण मुद्दाम मलाच पाठविलें; मग ती मला सन्मान कशी बरें देणार नाहीं ? मला मोठाच मान मिळाला, मी मोठा धन्य झालों. या मानाची आठवण मला पुष्कळ दिवस राहील ! अरे शिवाजी, तुझ्या पत्रामुळें माझी अशी स्थिति झाली, याचें तुला कांहीं तरी वाटतें ?

शिवाजी—ह्मणजे झालें तरी काय ?

संतु—काय सांगूं तुला ! तूंच हें असें करविलेंस ह्मणून बरें; दुसरा कोणी असता तर त्याचा समाचार घेतला असता. मी तेथें गेलों तेव्हां देवडीवर एक शिपाई फिरत होता, त्याला

तें पत्र देऊन "सुंदराबाईसाहेबकु देव" असें ऐटींत सांगितलें, पण त्यानें तें दुसऱ्या एका शिपायास दिलें; त्यानें तें तिसऱ्याच्या हातीं दिलें; असें तें पत्र हजारोंच्या हातीं खेळून शेवटीं एकदां त्या तुझ्या सुंदरीच्या हातीं जाऊन पडलें.

**शिवाजी**—असो, माझें पत्र तिच्या हातीं तर गेलें खरें; पुढें काय झालें?

**संतु**—त्या शिपायांनीं लागलेंच तें पत्र मला परत आणून दिलें; आणखीं वरतीं माझ्या श्रमाबद्दल, माझ्या इमानी स्नेहाबद्दल मला बक्षीसही दिलें. "या तुह्मी शिवाजीराव महाराजांचे हुजरे!" "कसें काय आमच्या नाईसाहेबांचे यजमान होऊं पाहणाऱ्यांचे चाकर?" असें ह्मणून जो येई त्यानें मला लाथाबुक्या मारून मनास येईल तशा शिव्या द्याव्या! तिच्या बटकी तेथेंच खिदळत उभ्या होत्या आणि त्या तुमच्या भार्या पट्टराणीसाहेबही वरून खिडकींतून आपल्या चाकरांची ही चेष्टा पाहून गालांतल्या गालांत हसत होत्या. कां, शिवाजी, ऐकतोसना माझी कशी दशा झाली तुझें पत्र नेलें ह्मणून? पत्र नेण्याबद्दल मला ही शाबासकी मिळाली—मला—या संतूला—तुझ्या सोबत्याला ही शाबासकी बरें! गरीब झालों ह्मणून मला लाथा माराव्या काय? आह्मी बागवान ह्मणून आमच्या नशिबीं धक्के! गरीब बापडे श्रम करून पोट जाळतों, यांची मिजास राखतों; आमच्या कसबानें यांचे चेहरे खुलवितों ह्मणून आह्मांला अशा भलत्यासलत्या शिव्या!

**शिवाजी**—तूं उगीच त्यांच्यावर कुभांड रचतोस; ते कां बरें उगीच तुला धक्के मारितील?

**संतु**—कां मारितील? शाबास रावजी! रामराम तुह्मांला! मार खाऊन मित्राकडे समाधानाकरितां आलों तों त्याजकडून खोटें बोलणारा हा किताब! माझें अंग कसें ठेचून गेलें आहे

तें तुला दाखवायाला पाहिजे वाटतें ? अरे, तुझें पत्र त्यांनीं चिखलांत फेंकून दिलें, पायाखालीं तुडविलें, व त्यावर ते थुंकले. शिवाजी, आपल्या पत्रांत तूं असें लिहिलें होतेंस तरी काय ?

शिवाजी—माझें पत्र तर असें आहे कीं एखाद्या रंकानें कोणा सार्वभौम राणीस जरी तें पाठविलें तरी शोभेल; हें पहा, तूंच पहा, या पत्रांत तिला राग येण्याजोगें एक अक्षर तरी आहे काय ?

[ तें पत्र पुनः वाचून पहातो व संतूच्यापुढें धरितो. ]

संतु—तें कसेंही असो, पण माझी मात्र फजिती तर झाली खरी ! कां शिवाजी अशी फजिती आपण गुपचूप सहन करावयाचीना ?

शिवाजी—संतू, तूं मला एकवार क्षमा कर. माझ्या मूर्खपणामुळें तुझी अशी फजिति झाली, ही माझीच चूक. आतां माझे डोळे उघडले; माझें मनोराज्य ढासळलें. गरीबी व हलक्या कुळांत जन्म हे मनुष्याचे मोठे शत्रू हें आतां मला समजलें. नुसत्या गुणांची या जगांत चहा नाहीं. अरेरे! पण माझा असा अपमान ! आतां हा अपमान मी कधींही विसरणार नाहीं. तुला, माझ्या संतुला, त्यांनीं असें वागविलें काय ? मीं ज्याला आपला ह्मणविलें त्याच्याशीं असें वर्तन ! याबद्दल सूड-सूड-घेईन , तरच मी शिवाजी चागवान ! मजपाशीं असें निर्दयपणाचें वर्तन ! सूड-सूड-बस्स. आतां दुसरा कसला विचार नाहीं. त्यांचा ताठा वांकवीन तरच माझें नांव शिवाजी !

संतु—शिवाजी, तुला फार वाईट वाटलेंसें दिसतें; पण मजबद्दल वाईट वाटूं देऊं नको; त्यांनीं शिव्या दिल्या ह्मणून काय झालें ? तुजकरितां शिव्याच काय ? काय पाहिजे तें मी सहन करीन. पण हा अपमान माझा नसून तुझा आहे त्याची मला फार चीड आली. पहा आतां, तूंच याचा विचार कर. मी

जातों. मिळालेलें बक्षीस पचविलें पाहिजेना ? (संतु जातो).

**शि० आई**—बाळा शिवाजी, पाहिलांस हा तुझ्या वेडाचा परिणाम ? आतां तरी तिचा नाद सोडशील कीं नाहीं ? तरी मी सांगत होतें ! कोण ही शोभा !

**शिवाजी**—आई, पुरें आतां. तूं नको आणखी मला हिणवूं. तिला हें पत्र मी मोठ्या गौरवानें लिहिलें होतें; पण तिला काय होय असें गौरव ? आतां भरस्त्यांत तिचा हात धरितों ! भरस्त्यांत तिची चेष्टा करून फजिती करितों ! तिच्या शिपायांचा चांगला समाचार घेतों ! या सुंदरीची खोड-खोड मोडीन तर मी खऱ्या बीजाचा होईन. [ म्हातारीकडे वळून ] आई, तूंच सांग, ह्या सुंदरीनें माझा काय ह्मणून असा अपमान करावा ? माझ्या पाठीला उंटासारखें पोंग आहे ? मी कुरूप आहें ? का मी हलकट दिसतों ?

**शि० आई**—तसें नव्हेरे !

**शिवाजी**—तर मग मी भित्रा का आहें ? चोर—चहाड—लुच्चा ?

**शि० आई**—असें अमंगळ काय विचारतोस ?

**शिवाजी**—तर आळशी, अक्षरशत्रु, गर्विष्ट, मूर्ख, टोणपा, पोरकट तरी ?

**शि० आई**—अरे कोण तूं का ? कोण असें ह्मणेल ?

**शिवाजी**—तर मग मी आहें तरी कसा ? ह्या सर्वांपेक्षांही मी अधिक वाईट आहें काय ? मी बागवान ह्मणूनच केवळ असा अपमान ! प्रीतीच्या स्वातंत्र्ययुक्त राज्यांत देखील उच्च-नीचपणाचा संबंध असतो काय ! बागवानाला मन नसतें आणि पैसेवाल्याला असतें होय ?

शि० आई—अरे पण ती मोठ्याची मुलगी नव्हे काय? तूं कां बरें तिला असें पत्र पाठवावेंस?

शिवाजी—मोठ्याची मुलगी असली ह्मणून? हाच कोण मोठा आला? आह्मी मोठे नव्हत? आह्मी शेतें पिकवितों, आह्मीच भाजीपाला करतों; तेंच हे मोठे लोक खातात, आमच्याच उत्पन्नावर या मोठे लोकांचे खेळ चालतात; मग आह्मीच कसे मोठे नव्हत? हेच चोर कसे मोठे लोक झाले?

(एक गडी प्रवेश करितो.)

गडी—विसाजीरावांनीं आपणांस पत्र दिलें आहे. [पत्र देतो.]

शिवाजी—[आश्चर्ययुक्त मुद्रेनें] विसाजीरावानीं मला पत्र दिलें? [पत्र घेतो.]

गडी—होय, आपणासच दिलें; उत्तर मिळेपर्यंत थांब असें सांगितलें आहे.

शिवाजी—बरें तर, अंमळ थांब, मी पत्र वाचतों. [पत्र उघडतो व पुढें लिहिल्याप्रमाणें आपल्याशींच वाचतो.] "रा० रा० शिवाजी बागवान यांस राम राम विनंति विशेष. तुमचा आमचा परिचय नाहीं, परंतु तुमच्याविषयीं आतांच कांहीं वर्तमान ऐकलें, त्यावरून अशा प्रसंगीं तुह्मांस मदत करावी असें मनांत आणून हें पत्र लिहीत आहों. पुष्कळ दिवसांपासून तुमचें मन एका स्त्रीवर बसलें आहे; परंतु तुह्मी बागवान असल्यामुळें व ती स्त्री मोठ्या श्रीमंतींत असल्यामुळें, तुह्मी कितीही प्रयास केले तरी ते फुकट जाणार. मीं या कामांत मन घातलें असतां यश आल्यावांचून सहसा राहणार नाहीं; पण मी एकट्यानेंच ही खटपट करून उपयोग नाहीं. धैर्य धरून, विचारानें व प्रसंग पडेल तसें वा-

गण्याचें जर तुह्मी वचन द्याल, तर तुमचा मनोरथ खासच सिद्धीस जाईल. मी तुह्मांस पाहिजे ती मदत करण्यास तयार आहें; पण " मी आपला हेतु कधींही सोडणार नाहीं " असें मात्र तुह्मीं पूर्वीं वचन द्यावें; आणि "त्या स्त्रीला वरण्यास मी तयार आहें, व ज्या दिवशीं लग्न होईल त्याच दिवशीं रात्रीं मी तिला आपल्या घरीं नेईन " अशी शपथ घ्यावी. हें मी थट्टेनें लिहीत आहें असें समजूं नये; तुमची थट्टा करण्याचें मला कांहींच कारण नाहीं. माझें सांगणें कबूल असेल व आपलें काम करून घेण्याची इच्छा असेल तर याच गड्याबरोबर यावें; मी आपला मित्र व साहाय्यकर्ता आहें असें समजून इकडे येण्याविषयीं संकोच नसावा. सूज्ञांस विशेष काय लिहिणें, लोभ असावा हे विनंति. विसाजीराव दौलतराव." माझे डोळे तर मला फसवीत नसतील ? या पत्रांत हाचे मजकूर ? हा भास तर नसेलना ? पण पत्र तर माझ्याच हातांत आहे, मग हें खोटें कसें ह्मणावें ? चल. [ गड्याकडे पाहून ] मीही आलोंच. [ गडी जातो ].

शि० आई.--शिवाजी, कुठूनरे आलें तें पत्र ? हा आपल्याच नादांत आहे. शिवाजी संभाळ. भलतेंच कांहीं करशील ! [ जाते. ]

शिवाजी—( आपल्याशींच. ) "त्या स्त्रीला वरण्यास मी तयार आहें; व ज्या दिवशीं लग्न होईल, त्याच दिवशीं रात्रीं मी तिला आपल्या घरीं नेईन " अशी शपथ घ्यावी. वाहवा ! फार चांगली अट ! मना, तुला आतां काय पाहिजे ? सूड किंवा प्रेम ? बोल, लवकर काय पाहिजे तें. ( चित्राकडे पाहून ) किती सुंदर ही ! मजकडे पाहून हंसते आहे असें दिसतें ! तिची तसबीर इतकी सुंदर ! मग ती प्रत्यक्ष किती सुंदर असेल बरें ? माझें मन अजून देखील या सुंदरी-

कडे ओढ घेतें! हिनें माझा अपमान केला, तरी देखील मला अजून हिचेंच वेड! पण त्या सुंदरीनें माझा अपमान केला. या निर्जीव तसबिरीनें केला नाहीं. मग या माझ्या सुंदरीच्या चित्राचा काय म्हणून मीं धिक्कार करावा? (म्हातारीस) आई, मी बाहेर जातों. दार लाव; मी आतांच परत येतों. (आपणाशीं) माझें कपाळ अगदीं फिरून गेलें आहे, काय करतों, काय नाहीं, याचें मला आतां भानच नाहीं; मी स्वप्नांत तर नाहीं? किंवा हा माझी थट्टा तर करीत नसेल? पण हें स्वप्न नव्हे; तो माझी थट्टा काय म्हणून करील? हेंच त्याचें पत्र माझ्या हातांत आहे, मग थट्टा कशी म्हणावी? काय होईल तें होवो. सुंदरी आपली झालीच पाहिजे. (शिवाजीराव जातो.)

## अंक पहिला समाप्त.

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला--दादासाहेबांच्या घरापुढील बाग.

(विसाजीराव व गुणाजीराव प्रवेश करितात.)

**विसाजी**—कां गुणाजी, कशी आहे माझी युक्ति? आपण माझी थट्टा करीत होतांना? पाहून घ्या आतां हें माझें बावलें कसें खेळतें तें! दादासाहेबांची व माझ्या राजाची भेट झाली मात्र, तोंच त्यांचें सख्य जडलें. राजाचें नांव ऐकतांच आणि त्याचें लग्न व्हावयाचें आहे असें ऐकतांच तर थै थै आई व मुलगी नाचूं लागल्या; तशांत त्यांच्या घरीं प्रत्यक्ष राजेसाहेब गेल्यावर मग काय! 'महाराज आले, महाराज आले,' असा

जिकडे तिकडे कुजबुजाट! आपल्याला काय इंद्रलोक कां वैकुंठ मिळालें असें त्यांना झालें. हुरळलेल्याच बायका! त्यांना लाज कसची न काय कसचें! राजा आला ह्मणतांच दादासाहेबांच्या पुढें त्यांचें पाऊल. पुष्कळदां जाळें टाकून निराश झालेला कोळी जसा एखादा मासा दिसला कीं त्यावर झडप घालतो तसें यांनीं त्याला घेरलें आहे. आमच्या या वेगडी राजाला तर मुळचेंच सुंदरीचें वेड! दोहोंकडूनही असें झाल्यावर मग काय सांगावें! सकाळीं, दुपारीं, संध्याकाळीं एकच गोष्ट-राजा, राजा, राजा! म्हाळसाबाई तर काय अगदीं मनांत खुष आहे. सुंदरीला "मी राणी झालेंच" असें जणूं वाटतें. आमच्या राजाला येऊन जरी फारसे दिवस झाले नाहींत, तरी दादासाहेबांच्या घरीं त्याचा इतका कांहीं घरोबा जमला आहे कीं एक दिवस राजा भेटला नाहीं तर त्या बायकांना चैन पडत नाहीं. अलीकडे आमचे महाराज सारा दिवस तेथेंच घालवितात. त्या तिघांच्या गोष्टी जेव्हां चालतात तेव्हांची ती मौज पहाण्यासारखी असते. राजाचा एकेक शब्द पण कशा खेळीत असतात. म्हाळसाबाईचा तर झालाच निश्चय कीं आपली मुलगी आमच्या या राजाच्या गळ्यांत बांधावयाची. येऊन जाऊन तिला पंचाईत येवढीच पडली आहे कीं राजेसाहेब पदरांत घेतील कीं नाहीं.

**गुणाजी.**—पण तिनें निश्चय करून काय उपयोग? दादासाहेबांस आमचा राजा पसंत पडला पाहिजे.

**विसाजी.**—अरे वेड्या, दादासाहेबाला एवढी अक्कल असती तर त्यानें अस्मादिकांस साफ नाहीं ह्मणून कां सांगितलें असतें? अरे, दादासाहेब अगदीं भोळा शंभू आहे. त्याची वेसण त्याच्या बायकोच्या हातीं. सॅचली कीं झाला कबूल. तूंच पहा, तो एकसारखा दुकानांत असतो! इकडे

घरीं बायको राजाजवळ खिदळत असते, आणि आपल्या पोरीला नटवून त्याच्यापुढें नाचविते, याचें त्याला कांहीं तरी वाटतें काय? अरे, त्याच्यांत जर राम असता तर या पोरीचें इतकें प्रस्थ माजलें असतें? मोठी स्वयंवर करायला निघाली आहे! रजपुतीणच किनई!

**गुणाजी.**--छी, छीः, तें कांहीं नाहीं. त्यास पैसा मिळाला ह्मणजे झालें.--तें असो, पण तूं युक्ति मात्र मोठी खुबीदार योजिलीस. हा राजा कांहीं राजकारणासाठीं गुप्त वेषानें आला आहे. त्याचें नांवगांव कोणास सांगूं नका ह्मणे! वाः, किती नामी तोड! तूं दादासाहेबांच्या घरीं असें सांगून ठेविल्यामुळें, शहरांत आमच्या राजाविषयीं कोठें कांहींच बोभाटा नाहीं. पण जर का ही बातमी फुटली, तर मात्र आपल्या फजितीस पारावार रहाणार नाहीं. मग आमच्या दोघांचे दांत पडलेच समज. बरें, पण बिसाजी, आमच्या राजानें तर थेट राजाचीच ऐट घातली आहे. पैसा कसा उधळतो तें पाहिलें कीं नाहीं? जणूं काय हा उपजला तेव्हां सोन्यामोत्यांचा पाऊस पडला होता. बापाचा माल! पैसे आमचे मग त्याचें काय जातें?

**बिसाजी.**--अरे, घेऊं दे दोन दिवस मजा मारून. औट घटकेचें राज्य! मग तो तरी का कमी करील? बाकी तो तसें करतो हें आपल्या पथ्यावरच आहे. तसें न करता तर मात्र त्याची छाप आतांप्रमाणें चांगली बसली नसती. पैसा हवा तसा बेगुमान उधळणें हें खानदानीचें लक्षण आहे समजलास! तोच पहाना त्या गोपाळनाइकाचा पोरगा. खांद्यावर मोत्यांची पोतडी टाकून हिंडतां हिंडतां बापाचा सारा जन्म गेला. त्याच्याच पोरानें केवढी हवेली उठवून दिली आहे? काय नाच रंग चालविला आहे? गाड्याघोडे कसे उडवितो आहे!

त्याच्या मनांत आपल्या अंगाला चिकटलेली व्यापाराची घाण मुद्यासकट नाहींशी करून बडे लोकांत शिरावयाचें आहे.

**गुणाजी**—अरे, पण पाण्याप्रमाणें आमचा पैसा बेधडक ओततो हा. अशानें सफई बुडण्याची पाळी येईल.

**विसाजी**—ऊंः त्यांत काय? सूड घ्यावयाचा तर पैसे खर्च करायला तयार असलेंच पाहिजे. भरलेला बार निर्विघ्नपणें उडाला ह्मणजे त्या सुंदरीचें ठेंचलेलें नाक पाहून आनंद होईल तो! पण गुणाजी आमचा राजा मोठा धूर्तही आहे नाहीं बरें? बोलण्याचालण्याची ढब पाहिली नाहीं? जसें काय कोणी राजाच ह्मणेल!

**गुणाजी**—दिसतो तरी काय वाईट? तो पोषाख, ते दागिने त्याला फारच शोभतात.

**विसाजी**—पण ती माझी पोची?

**गुणाजी**—आणि माझी ती कंठी! तिच्यांतला तो मोळ तर केवळ अमोलच आहे. पण हा अखेरपर्यंत असाच कायम राहील असें तुला वाटतें? या दोनचार दिवसांत त्याची मुद्रा कांहींशी फिरलेली दिसते. त्यांना फसविण्याबद्दल त्यास वाईट वाटूं लागलें नसेलना?

**विसाजी**—आतां वाईट वाटून काय होणार? त्यानें शपथ घेतली आहे; त्याला आपली शपथ मोडल्यावांचून आतां परत जातां येत नाहीं. अरे हे वेडेपीर जीव गेला तरी शपथ मोडीत नाहींत. मला वाटतें धनाजीरावाला बहुतकरून आमच्या राजाचा संशय आला आहे; पण त्याला चहाड्या करावयास मी कशाला वेळ देतों? एक दोन दिवसांत सर्व काम उरकून टाकिलें ह्मणजे कोण काय आमचें करणार?

**गुणाजी**—एक दोन दिवसांत? आमच्या गरीब बिचाऱ्या सुंदरीचें मनोराज्य इतक्यांतच लयास जाणार तर मग?

**विसाजी**—बहुतकरून आज उद्याच्या आंत लग्नाचा घाट उडवतों पहा. रात्रींच लागलीच वरात; वरात तरी माझ्या घरींच येणार; माझ्या दारांत पाय ठेवितांच, राजाराणींचें सर्व ऐश्वर्य काढून घेतों. मग आमच्या दिमाखखोर राणीसाहेबांस राजेसाहेबांचें खरें स्वरूप दिसेल. तिला राजा पाहिजे, राजा! ही पोर राणी होणार! हिला मी हा विसाजीराव आवडत नाहीं! 'इश्श मेला' नाहीं? सुंदरे, तुला मी आवडत नाहीं, तुला राजा पाहिजे; घे तर आतां आपला राजा. मार आतां आपल्या भिकार बागवान महाराजांच्या गळ्याला घट्ट घट्ट मिठी! तूं माझा अपमान केलास? मला तूं ओळखलें नाहींस! हा साप काळा साप आहे बरें? डोक्यावर लाठयानें पाय दिलास नाहीं! (इकडे तिकडे पाहून) वाहवा! आमचे सरकार तर सुंदरीची पाठ मुळींच सोडीत नाहींत. ते पहा आमचे शिवाजी महाराज हवा घेत आहेत! शाबास, ह्माळसाबाईंनीं तर खूपच लगट चालविली आहे! ठीक आहे! चालूं द्या, बागवान तर खराच. मीं पेरलेल्या बियाचें त्यानें मामी झाड तयार केलें आहे!

**गुणाजी**—चला, आपणही तिकडेच जाऊं. [ जातात. ]

( सुंदरी, शिवाजीराव ह्माळसा, धनाजीराव प्रवेश करितात. विसाजीराव व गुणाजीराव बोलत, बोलत त्यांजवळ जातात. )

**ह्माळसा**—विसाजीराव, गुणाजीराव यांना एक क्षण देखील महाराजांवाचून गमत नाहीं.

**विसाजी**—महाराजांचा तसाच लोभ आहे.

**ह्माळसा**.—खरेंच, महाराज तसेच थोर आहेत. काय बाई एक एक गुण तरी? दुसऱ्यांस हसविण्याची तरी महाराजांची कांहीं शिकस्तच आहे. दादा, हा एखाद्याचा अंगस्वभाव असतो नाहीं का बरें? हा गुण शिकून येत नाहीं.

**घनाजी.**—येतो किंवा नाहीं, तें तुला काय माहीत? हेंच तें चायकांचें शहाणपण?

**म्हाळसा.**—वाः! बाबा सरळ बोलला अगदीं! तूं कांहीं म्हटलेंस तरी महाराजांची बोलण्याची खुबीच कांहीं वेगळी. ती कुणालाही साधायची नाहीं. नाहीं तर आपली स्वारी! जेथें तेथें दांडगेपणा! पाठीचा भाऊ पण कोणी बोलणें एकेल तर म्हणेल कीं साता जन्माचा वैरी दावा साधयला आला आहे.

**शिवाजी**—[ इकडे तिकडे फिरत ] वाहवा! ही बाग तर मोठी रमणीय आहे. हे ताटवे फारच सुरेख दिसतात.

**म्हाळसा**—हें आमच्या बागवानाचेंच काम बरें. बागेच्या कामांत आमच्या रुद्राजीचा हात धरणार कुणीच नव्हता. त्याचें कसबच कांहीं वेगळें. पण नशीब म्हणतात तें पहा! त्याच्या मुलाला बापाचें कसब मुळींच नाहीं. म्हाताऱ्यानें दोन पैसे जमविले होते, पण तो मरतांच पोरानें त्याच्या पैशाची धूळधाण करून टाकिली. बागवानाचा पोर पण मनाची उडी केवढी! त्या शिवाजीनें 'शिवाजीराव' अशी सही करून सुंदरीला एक अचकट विचकट पत्र पाठविलें बरें! धन्य बाई! हीः हीः हीः! कायग सुंदरे!

**सुंदरी**—[ जरा पुढें सरून व मुरकून ] हेंग काय आई! हीः हीः हीः.

**शिवाजी**—काय म्हणतां? त्या बागवानाच्या पोरानें आमच्या सुंदराताईला पत्र पाठविलें? तर मग तो फारच फाजील असावा.

**म्हाळसा**—मेला कसा का असेना! असेल झालें ओंगळ, कुरूप, टोणपा! बागवानाच्या पोराचें स्वरूप तें काय असणार?

**घनाजी**—ताई! तें तर सरेंच. पण चौकीवरचा शिपाई

ह्मणत होता कीं शिवाजी बागवानाचें तोंड थेट महाराजांच्या तोंडासारखेंच आहे.

**शिवाजी**—शाबास धनाजीराव, आपण मला फार चांगली उपमा दिली; ह्मणतात कीं उपमा कालीदासाची, पण मला वाटतें ती आपल्यापासूनच शिकावी.

**ह्माळसा**---का, आतां कसें नाक ठेचलें? आतां तरी कांहीं अक्कल घ्या. ‘ महाराजांच्या तोंडासारखें त्याचें तोंड आहे !’ इश्श्य बाई !

**सुंदरी**—मामा ! तुह्मी तरी आपली मौजच ! त्या शिवड्याचीं आणि–अगदीं बरोबरी ना? आई तें साठीनी—काय ह्मणतात ग तें !

**शिवाजी**—[ आपल्याशीं ] हा पदवीचा महिमा बरें ! आतां, फक्त छोटासा राजा बनलों आहें, तर तेवढ्यातच मी मदनाचा पुतळा झालों; पण जर कदाचित् सार्वभौम राजा बनलों असतों, तर मला वाटतें हिनें मी दृष्टीस पडतांच माझ्या गळ्यांत माळ घातली असती. एकूण बायका मूर्खच तरी पण–[ मोठ्यानें ] कसें काय दोस्त विसाजीराव !

**विसाजी**—आपल्या कृपेनें बरें आहे महाराज, आणि तसें नसतें तर येथें आलोंच नसतों.

**शिवाजी**—आणि मीही खास सांगतों–कीं तुह्मी आलां तेव्हां बरें नाहींच.

**ह्माळसा**—विसाजीराव, मिळालें बक्षिस !

**विसाजी**—[ आपल्याशीं रागानें ] जळो या चोराचा धूर्तपणा; याला मीच राजा केला असून हा मूर्ख माझीच उलट फजिती करतो.

**धनाजी**—या उत्तराचा अर्थ काय बरें असावा ?

**ह्माळसा**—[ शिवाजीची पोंची बाहेर आलेली पाहून ] म-

हाराज, ही पोची फारच सुरेख दिसते. त्यांतल्या माणकांचें ते-ज तरी किती झळकतें! असले दागिने अस्सल जागींच मिळा-वयाचे!

सुंदरी—आई, आणि ती गळ्यांतली कंठी! किती सुरेख!

शिवाजी—ही पोची तुह्मांला इतकी चांगली वाटते? मा-झ्या वडिलांनीं मला ही दिली. किंमत फारशी नाहीं; पण व-डिलांच्या हातची ह्मणून मी आपल्या हातांत ठेवितों. तुमच्या मनांत ती भरली आहेसें दिसतें तर राहीना कां तुमच्याच हा-तांत. नाहीं तरी तुह्मीं माझा जो आदरसत्कार केला त्यापुढें हिची किंमत काय? [ ह्माळसाबाईस पोची देतो. तें पाहून गु-णाजीराव गालांतल्या गालांत हंसतो. ]

विसाजी—[ शिवाजीरावास बोटानें खुणा करून एकी-कडे ] अरे, हें काय, तुला वेड तर नाहीं लागलें? माझी पोची दिलीस? तुजपासून ती भरून घेतल्यावांचून मी कधींही रहा-णार नाहीं; ध्यानांत ठेव. [ विसाजीराव रागानें कांहीं अंतरा-वर जातो; व शिवाजीराव सुंदरीजवळ जाऊन ]

शिवाजी—हा गोफ तुला आवडतो ना? मग तो तो माझ्या गळ्यांत कशाला पाहिजे? [ गोफ आपल्या गळ्यांतून काढून सुंदरीच्या गळ्यांत घालतो. ] वाः आतां कसा नामी शोभतो! या गोफानें तुमचें मन आतां बांधून टाकलें. आह्मी आपल्या गांवीं गेलों ह्मणजे आमची आपल्या-ला आतां खचित आठवण राहील.

सुंदरी—इश्श बाई जसें कांहीं आह्मीं विसरणारच होतों! आई पाहिलास का हा गोफ? याचें काम तरी किती सुरेख आहे. महाराजांनीं आपण होऊन तो माझ्या गळ्यांत घातला. हा गळ्यांतून कधीं काढूंच नये असें मला वाटूं लागलें आहे.

गुणाजी—[ शिवाजीरावास एकीकडे ] अरे, अंमळ थांब,

कोणाचा गोफ देतोस त्याचा तरी विचार कर. माझ्या आजीनें माझ्या वाढदिवशीं दिलेला तो होता. तेवढाच कायतो मोठा दागिना माझ्या घरीं होता. [ सुंदरी व म्हाळसा गोफ पहात अंतरावर जातात. ]

**शिवाजी**—तुह्मां दोघांसही इतकी अक्कल नाहीं? राजा होणें ह्मणजे गुरें राखणें नव्हे. [ धनाजीरावाकडे पाहून ] धनाजीराव, तुह्मींच पहा यांचा शहाणपणा. मीं आपला गोफ दिला, त्याबद्दल यांस हो का वाईट वाटावें ? म्हणतातना स्वभावाला औषध नाहीं.

**विसाजी व गुणाजी**—[ आपल्याशीं ] वाहवा ! ही मात्र मोठी चांगली थट्टा खरी ! आनचें नुकसान व आमचीच फजिती ! [ त्याच्याकडे पाहून धमकावणीची मुद्रा करतात. ]

**धनाजी**—हे तिघे एकमेकांपाशीं का बरें कुजबुजतात?–येथें कांहीं तरी कपट असलें पाहिजे. हा राजा कर्नाटक प्रांतांतील असावा असें मुळींच दिसत नाहीं. कांहीं तरी दगा आहे. पण इतका विचार कशाला? आतां याची परीक्षा–हा कर्नाटकांतील असेल तर यास कानडी येत असलेंच पाहिजे–त्यांतच पाहिल्यानें याची परीक्षा घेऊं. येनु रायरे द्ये उंटे ?

**शिवाजी**—[ आपल्याशीं ] काय बोलतो कोणजाणें? मला तर यांचें बोलणें मुळींच समजत नाहीं, पण हें कानडी असावें खचित. असलें हेंगाडं बोलणें दुसऱ्या भाषेंत संभवत नाहीं.

**धनाजी**—तम्म भेट्टी लाभ आइतु इदु नम्म सुदैव.

**शिवाजी**—[ आपल्याशीं ] आतां मात्र फजितीची वेळ आली खरी.

**धनाजी**—तम्मकहीगेनु हेचकडिमी वर्तमानी ?

**शिवाजी**—धनाजीराव, आपल्या प्रश्नांस मीं उत्तरें देत नाहीं. मी येथें कांहीं गुप्त हेतूनें आलों आहें. आपल्याशीं

परक्या भाषेंत बोलूं लागलों तर त्याचा हे गृहस्थ भलताच अर्थ करतील.

**धनाजी**—[ आपल्याशीं ] यानें वेळ तर खूप मारून नेली; त्यावरून हा धूर्त आहे खचित. पण याच्या त्या कांहीं वेळपर्यंत भांबावलेल्या मुद्रेवरून याला कानडी येत नाहीं आणि तेव्हां हा तोतया आहे यांत संशय नाहीं. [ उघड ] महाराज ! माझ्या सर्व लक्षांत आलें.

**शिवाजी**—मामासाहेब, आपण फार लवकर उमजलां ह्मणावयाचें. प्रसंगवधान ह्मणतात तें यालाच. आपण कानडीभाषेंत प्रश्न कोणत्या हेतूनें विचारिले असतील ते असोत; पण त्यायोगें आमचें सारें कारस्थान ढासळायचा योग आपण अगदीं जवळ आणला होता. या ठिकाणीं [ **म्हाळसा व सुंदरी**कडे पाहून ] मला कांहीं जास्त कमी बोलतां येत नाहीं.

**म्हाळसा**—कां आतां कशी खोड मोडली ? उगाच डौल—मी यंव करीन त्यंव करीन ह्मणून बायकांजवळ फुशारकी सांगायची; पण चांगला वस्ताद भेटला कीं बोबडी वळलीच.

**सुंदरी**—हं हं ! आतां कसा गप्प बसला ? यां पाहूं आतां महाराजांना उत्तर मामासाहेब ! आई मामाच्या या दांडगेपणामुळें महाराज रागावलेसे दिसतात. त्यांची क्षमा मागूं या. [ **धनाजी**रावाकडे पाहून हसते. ]

**शिवाजी**—कशाला इतकी तसदी ? झालें तें होऊन गेलें. त्याचें आतां माझ्या मनांत कांहीं नाहीं.

**विसाजी**—किती वस्ताद आहे पहा ! मोठा समयसूचक खरा.

**गुणाजी**—समयसूचक खरा ! पण माझा गोफ ?

**धनाजी**—[ आपल्याशीं ] हे मजकडे पाहून हंसतात ! आणि माझी थट्टा करतात. ठीक आहे, कांहीं हरकत नाहीं

ह्मणावें; याचा सूड आपोआप निघेल. हा राजा नव्हे. हा कोणी ढोंगी आहे. या पोरीला हा पळवून नेणार यांत शंका नाहीं. [रागानें पुढें जाऊन] महाराज, कित्येक लोक दिसतात तसे नसतात याचा अनुभव आपणास असेलच?

शिवाजी—नाहीं. मुख्यत्वेंकरून स्त्रियांच्या समक्ष आह्मीं अशा वाईट गोष्टी काढीत नाहीं. असल्या गोष्टींनीं त्यांचें मन खट्टू करणें थोर अंतःकरणास रुचत नाहीं. तथापि केव्हां तरी हा अनुभव मी आपणापासून शिकून घेईन.

धनाजी—मी ही आपल्यास शिकविण्यास एका पायावर तयार आहे. [जाऊं लागतो.]

म्हाळसा—अरे पण तूं रागानें जातोस कोठें?

धनाजी—राजकारस्थान आणि प्रसंगावधान यांतील विंग शिकावयास जातो. [जातो.]

विसाजी—[गुणाजीरावास] अरे, आपण याची कशी तरी समजूत केली पाहिजे; याला संशय आला आहे. यांत शंका नाहीं. तो पहा कसा फुटफुटत जात आहे.

विसाजीराव व गुणाजीराव जाऊं लागतात.

गुणाजी—[थांबून-विसाजीरावास] पण माझा गोफ?

विसाजी—आणि माझें कडें? आतां या राजेश्रींचें राज्य पुरें!

गुणाजी—माझा गोफ गेला, गोफ! [गुणाजीराव व विसाजीराव जातात.]

म्हाळसा—महाराज आमच्या धनाजीरावास कोणास काय बोलावें हें मुळींच कळत नाहीं, त्याचा सर्वांशीं असाच दांडगेपणा.

शिवाजी—पण मला त्याचा मुळींच राग नाहीं. मनुष्य तापट असला ह्मणजे असाच बोलावयाचा, त्याचा राग कसचा?

सुंदरी—महाराज, त्याचें बोलणें मनांत आणणारच नाहींत. त्याचा स्वभावच असा, पण त्याच्या मनांत कांहींही रहात नाहीं बरें.

शिवाजी—आपण फर्माविल्यावर मी क्षमा करणार नाहीं, होईल तरी कसें!

सुंदरी—महाराजांची आपली नेहमीं थट्टा! पण माझा मामा मोठा शूर आहे; त्याला लष्करांत चाकरी धरून पुरीं दोन वर्षेंही झालीं नसतील; इतक्यांत त्यानें आपल्या गुणांनीं फार मोठा अधिकार मिळविला; आतां त्याच्या हाताखालीं दहा हजार शिपाई आहेत बरें.

शिवाजी—वाहवा! मग धनाजीराव मोठेच शूर असले पाहिजेत.

म्हाळसा—महाराजांसारखा नसेलच पण तो आतां लष्करच सेनापति होईल.

शिवाजी—दोन वर्षांत सेनापति! आमच्या राज्यांत असे लोक फारच थोडे होतात.

म्हाळसा—[ आपल्याशीं ] महाराजांच्या मनांत सुंदरी उतरली खचित, तिलाही पण त्यांची राणी होण्याची हौस दिसते, तेव्हां त्यांना घटकाभर येथेंच सोडून जाऊं या. महाराज कांहीं चावटपणा करावयाचे नाहींत अशी माझी खात्री आहे, त्यांतून आपण आंतून नजर ठेवूं म्हणजे झालें. [ मोठ्यानें ] अगआई! घरीं येण्याची वेळ झाली. जाऊं दे आत लवकर [ म्हाळसा जाते. ]

शिवाजी—एकंदरींत, ज्याचे गुण मोठे तोच मोठा असेंच तुझें मत कीं नाहीं. असें नसतें तर धनाजीरावाबद्दल, तुला येवढा अभिमान वाटला नसता.

**सुंदरी**—पण धनाजीराव माझा मामा नव्हे का? शिवाय गुणी मनुष्याचा कुणाला बरें अभिमान वाटणार नाहीं?

**शिवाजी**—मी तरी असेंच ह्मणतों कीं तुला कुळाचें फारसें महत्व वाटत नाहीं. गुणी मनुष्य तुला फार आवडतात.

**सुंदरी**—पण महाराज गुणाची मोठी किंमत असली तरी–

**शिवाजी**—तरी काय?

**सुंदरी**—तरी मी ह्मणते कुळाकडेही लक्ष दिलें पाहिजे, नाहीं का बरें! कारण ज्याचे पूर्वज मोठे असतात, त्यालाच लोक मोठा ह्मणतात.

**शिवाजी**—आमच्या पूर्वजांनीं तरवार गाजवून किंवा दुसऱ्या कोणत्या तरी प्रकारानें मोठेपणा मिळविला असला, ह्मणून आमचा त्यांत मोठेपणा नाहीं. थोर घराण्यांतलि बहुतकरून आपल्याच पूर्वजांच्या नांवावर विकत असतात. आपल्या वाडवडीलांप्रमाणें पराक्रम करून जो कीर्ति मिळवितोच मोठा असें नाहीं का?

**सुंदरी**—महाराज, मी कांहीं इतकी भोळी नाहीं; माझें कुळ हलकें ह्मणून मुद्दाम आपण माझी समजूत करितां; पण आपलेंच कुळ पहाना कसें तें. अशा प्रख्यात राजवंशाचा कुणाला बरें अभिमान वाटणार नाहीं?

**शिवाजी**—अजून तूं मला ओळखिलें नाहींस! मी सार्वभौम राजा असतों तरी त्यापासून मला खरोखर मुळींच सुख झालें नसतें. पराक्रमी पुरुषांच्या कुळांत जन्म घेऊन त्यांच्या प्रमाणेंच जर आपण आपलें नांव गाजविलें, तर मात्र त्या कुळाला शोभा येते. पूर्वजांनीं पराक्रमानें मोठेपणा किंवा राज्य संपादन केलें, त्याचा आह्मीं आळसांत उपभोग घेत बसलों, तर आपणांस उलट लाज वाटली पाहिजे, नाहीं का

वरें? तूंच सांग. सुंदरी, का उत्तर देत नाहींस? माझें ह्मणणें तुला पसंत नाहीं?

सुंदरीः—पण महाराज, आपण मजवर इतका लोभ करितां, असें असून आपल्या राजकुळाचा मला कसा वरें अभिमान वाटणार नाहीं? [ उभी राहून ] महाराज आपला मजवर खरोखर लोभ असेल तर आपल्या त्या सुंदर बागेचें पुनः एकदां वर्णन करा. खरेंच त्या गोष्टी कितीकदां ऐकल्या तरी पुनः पुनः ऐकाव्यासें वाटतें. तें कामसरोवर, त्याच्या काठीं तो मोठा वाडा-सभोंवार ती मोठी बाग हीं केव्हां पाहीन असें होतें. त्याचें नांव घेतल्यानें सुद्धां मनाला कांहीं विलक्षण आनंद होतो.

शिवाजी—जेव्हां तूं ती जागा पहाशील-तेव्हांच तिचें खरें स्वरूप कळेल. पण पाहिजे तर त्यांचें वर्णन पुनः करितों-सुंदरी, तुझें जसें शुद्ध अंतःकरण, तसें त्या कामसरोवराचें शुद्ध निर्मळ उदक; तुझें भाषण जसें कोमल, मधुर, तसेंच त्या सरोवराचें उदक मधुर व तेथील वारा कोमल; तुजवर जसें तुझ्या पतीचें प्रेम बसेल, तसें त्या सरोवरावर त्या वाड्याचें प्रेम; तुझ्या शुद्ध प्रेमयुक्त अंतःकरणांत तुझ्या पतीचें, किंवा त्याच्या प्रेममूढ अंतःकरणांत तुझें जसें प्रतिबिंब पडलें पाहिजे, तसें त्या शांत जलाशयांत, त्या वाड्याचें प्रतिबिंब पडतें-त्या सरोवराच्या सभोंवतीं कांहीं अंतरापर्यंत अशी दाट झाडी आहे कीं, ती पाहून समाधान झाल्यावाचून कधींही रहाणार नाहीं-आसपास फुलझाडांचे ताटवे असे लागून गेले आहेत, व त्यांच्या भिन्न रंगाचें असें संमेलन होत असतें कीं, त्यापुढें इंद्रधनुष्याचीही शोभा अगदीं फिक्की पडते-मधून मधून असलेल्या गगनचुंबित वृक्षांची शोभा कांहीं अपूर्व दिसते. नियमित अंतरावर मोठे कुंज असून त्यांच्या दाट छायेमध्यें

बसणारांस जें सुख होतें, त्याला तर उपमाच नाहीं. तुमच्या समागमानें मला जें सुख होतें, तें जर मला मिळालें नसतें तर मी त्याच कुंजांत पडून राहिलों असतों. तेथें फुलांचा सुगंध तरी किती आल्हाद देतो ह्मणून सांगूं? या तुझ्या मुखकमलाचा सुवास त्याहीपेक्षां अधिक मनोहारी. या मुखकमलाचा मकरंद ज्याला सेवावयाला सांपडेल तो किती धन्य !

**सुंदरी**—महाराज, आज माझी गरीबाची इतकीशी स्तुति चालविली आहे? आपल्या तोंडून ती ऐकतांना मला कसेंसेंच होतें.

**शिवाजी**—या बागेंतील गुलाबाचे ताटवे मला फारच आवडत असत, पण आतां मी त्यांकडे पहाणारसुद्धां नाहीं—त्यांच्या फुलांची शोभा मला फार प्रिय होती, पण दुसऱ्या एका ठिकाणच्या गुलाबी छटेची शोभा पाहून त्याचा मला अगदीं कंटाळा आला; या बागेंतील दाट झाडींत असंख्य पक्षी बसतात व सकाळीं व सायंकाळीं असें मधुर, मंजुळ गायन करितात कीं त्या गायनाला उपमा तुझ्याच कोमल, मधुर, मंजुळ भाषणाची !

**सुंदरी**—महाराज, आपल्या रम्य बागेचें वर्णन चाललें असतां, माझी थट्टाच करावयाचीना?

**शिवाजी**—सुंदरी, ही थट्टा नव्हे-मी ह्मणतों यांत असत्याचा एक लेशही नाहीं. असल्या सौंदर्याचें वर्णन केल्याशिवाय कोणाच्यानें राहवेल? खरोखर तुला सांगतों माझें मन तुझ्या चतारख्या एका सुंदरीनें हरलें आहे. तुला पाहिलें कीं तिची प्रतिमा डोळ्यापुढें उभी राहते. माझी सुंदरी तेथें आली ह्मणजे ते पक्षी माझ्या सुंदरीच्याच नांवाचा जप करावयास शिकतील, व माझ्या प्रियेच्या नावाचें तें मधुर गीत सुरू झालें ह्मणजे मला जो आनंद होईल तो गगनांत मावणार नाहीं;

माझ्या प्रियेला हा आपला मंजुळ स्तुतिपाठ ऐकत बसावें असें वाटूं लागलें ह्मणजे आपण उभयतां एखाद्या मनोहर, सुगंधी, शीतल कुंजांत बसूं, व हें मधुर गीत ऐकून आपलीं मनें प्रसन्न झालीं ह्मणजे आपण आपल्या आनंदाच्या व प्रेमाच्या गाष्टी बोलावयास लागूं. आपण एकांतीं बसून गोष्टी बोलत आहों असें पाहून निशापतीला मत्सर उत्पन्न होईल; आमचें सुख स्वतः पहावें ह्मणून तो हळूच आंत प्रवेश करील, तरी आमचें लक्ष त्याकडे जाणार नाहीं, पण कांहीं वेळानें जेव्हां आपण आपल्या वाड्याकडे परत येऊं, तेव्हां त्याचे पादन्यास आपल्या नजरेस पडतील; तेव्हां परपुरुषासमक्ष मी आपल्या प्रियकराबरोबर गोष्टी बोलत होतें अशी माझ्या प्रियेच्या मनांत शंका येऊन ती लाजेल व आपली लाज झांकण्यासाठीं माझ्या बाहुपाशांत आपलें मुख लपविण्याचा प्रयत्न करील. प्रिये, मग मला जो अत्यानंद होईल—

**सुंदरी**—इःश बाई! मी जातें तर मग आंत. आपली एकसारखी थट्टाच!

**शिवाजी**—ही थट्टा नव्हे; पण आपल्या वाड्याचें वर्णन करीत असतां माझ्या प्रियेमुळें मला होणाऱ्या सुखाचेंही वर्णन केलें, आणि तूं समोर उभी होतीस हें विसरून माझी लाडकी सुंदरीच पुढें उभी आहे असा मला भास झाला, आणि माझ्या तोंडून चुकून शब्द आला.

**सुंदरी**—खरेंच त्या आपल्या सुंदरीच्या नशिबीं किती तरी सुख! आपलें भाषण ऐकूं लागलें ह्मणजे मधुरपुष्परसाला लुब्ध मधु जसा तेथेंच लटकून राहतो त्याप्रमाणें होतें. [ उसासा टाकून अर्धवट आपल्याशीं ] देवा, माझ्या नशिबीं आहे का असलें सुख!

शिवाजी—सुंदरी, तूं खिन्न कां होतेस ? अग हें सुख तुला अशक्य का वाटतें ? हें तर तुझ्या अगदीं हातीं आहे. पण तुला खरें प्रेम व खरें सुख कोठें हवें आहे ? अग तुला आणि तुझ्या आईला राजा पाहिजेना ? राजा मिळेल कोठेंही, पण खरें सुख येईल का त्याबरोबर ? माझा तर निश्चय आहे कीं जिला मी माझ्या अंगच्या गुणावरून प्रिय असेन तिलाच मी वरीन. आतांच मी आपल्या घराचें वर्णन करीत असतां नंदनवनामध्यें देखील जें सुख दुर्लभ तें तेथें प्राप्त होईल असें बोललों; पण तसें नसून माझें घर ह्मणजे एक भिकार झोंपडी आहे. तेथें अन्नाची मोनाद, ऐषआरामाचा वाराही नाहीं, दिवसभर काबाडकष्ट करावे लागावयाचे, असें मीं ह्मटलें असतें तर मग मधुर पुष्परसाला लुब्ध मधुप जसा तेथेंच लटकून रहातो तशी तूं राहिली असतीस का ?

सुंदरी—हें काय बाई बोलणें ! इतकें का मला कळत नाहीं ! पण मी येवढेंच सांगतें कीं आपण माझी परीक्षा केली नाहीं. कांहीं दिवसांपूर्वीं राजाच नवरा असावा असें मला वाटत होतें हें खरें; पण आतां महाराज, आपल्या पायांची शपथ कोट सांगेन तर-माझ्या मनांतला पती मिळाला तर—

शिवाजी—ज्या गरीब बागवानानें तुला पत्र पाठविलें, त्याप्रमाणें तो भिकारी झाला तरी—

सुंदरी—सत्य महाराज—माझ्या गळ्याची शपथ—तरी माझें प्रेम कधीं कधींही कमी व्हावयाचें नाहीं. महाराज, मी आतां सर्व उमजलें. प्रेमाचा व श्रीमंतीचा कांहीं संबंध नाहीं. पण प्रेमांत श्रीमंतीची भर पडली म्हणजे मग किती बहार ? आणि पण हो, आपण त्या बागवानाची गोष्ट कां काढली ! त्या मेल्याचें नांव ऐकतांच माझें कपाळ उठतें. उगीच आपली माझी परीक्षा पाहण्यासाठीं आपण तसें बोलला. दे-

याच्या दयेनें माझ्या मनांत आहे असें होईल का ? महाराज मी जातें आंत; मला रजा द्यावी. माझ्याच्यानें अधिक बोलवत नाहीं. [ त्याच्याकडे एक प्रेमकटाक्ष फेंकून -झटदिशीं आंत जाते. ]

शिवाजी—धन्य माझी ! माझ्या सुंदरीचें मन वश झालें हें केवढें भाग्य ! अहाहा ! किती खुबीनें तिनें आपला मनोदय सुचविला पण ! ह्मणूनच बरें हा शिवाजी तुझ्यावर लुब्ध झाला तो. आई भवानी, तुझ्या कृपेनें सुंदरी माझी झाली तर तुला लुगडेंचोळी माझ्या ऐपतीप्रमाणें वाहीन. [ जरा विचार करून ] पण मी तिला असें फसवितों हें वाजवी आहे का ? देवाच्या घरीं हें रुजू होईल का ? शिवाजी, अरे काय केलेंस हें ? हिचा तूं घात केलास ! अजून तरी सावध हो. काय करितोस याचा विचार कर. अशी स्त्रीहत्या करूं नको. तिला तूं आपल्या घरीं नेलेंस आणि तेथील सर्व थाट पाहून भ्रमाचा भोपळा फुटला ह्मणजे तिला काय वाटेल ? आतांच तिच्या बोलण्यांत वागवानाबद्दलचे रागाचे शब्द आलेले विसरलास काय ? तूं राजा आहेस तोंपर्यंतच तूं तिला आवडणार. खरें स्वरूप बाहेर आलें ह्मणजे तिच्या अंगाचा कसा तिळपापड होईल त्याचा कांहीं विचार कर. जिच्यावर प्रेम तिच्या प्राप्तीसाठीं तिला असें ठकविणें ह्मणजे गाईचा गळा कापणेंच होय. शिवाजी, हा कसायाचा धंदा कधींपासून पतकरलास ?

( विसाजीराव व गुणाजीराव येतात. )

शिवाजी—विसाजीराव, माझें वचन परत द्या, मी आपली शपथ परत घेतों, मी लग्न करावयास कबूल नाहीं.

विसाजी.—वाहव्वा वाहव्वा ! खूप केलीत बोवा ! आपली शपथ मोडणार आं ?

शिवाजी—शपथ खरी असेल तर मोडीन; माझी शपथ खरी नव्हती. मी लग्न करीन ह्मणून वचन दिलें तेव्हां शुद्धीत नव्हतों. रागाच्या आवेशांत मीं भलतेंच वचन दिलें; मीं शुद्धींत नसतां शपथ घेतली ती मोडल्याबद्दल मुळींच दोष नाहीं; मी असा विश्वासघात कधींही करणार नाहीं.

विसाजी—ह्या पाभळ्या गोष्टी आतां दूर राहिल्या आतां तुला लग्न केलेंच पाहिजे. फार काय ? आजच लग्नास तयार असलें पाहिजे. तुजबद्दल गांवांत मी केव्हांच खोटी बातमी पसरून दिली आहे, व तूं कांहीं केलेंस तरी लोकांना तीच खरी वाटेल. धनाजीरावालाही तुजविषयीं संशय आला आहे. तूं आतां मागें आलास तर लागलेंच तुझें इंगित बाहेर पडेल. हा धनाजीराव ही बातमी सरकारांत कळवील. तुला पकडावयास लागलेच शिपाई तयार आहेत असें समज. मग तूं कोठें पळणार ? तुझी सुंदरी तुझ्या नांवानें दगड फोडील व मनास येतील तसतसे तुला शाप देत बसेल ! पण इतकें होऊनही तुझ्या नशिबीं तुरुंग आहे तो आहेच. पहिल्यानें याचा नीट विचार करायचा होतास. अरे सूड घ्याव-याचा बेत विसरलास वाटतें ? इतका तूं नेभळा असशील असें वाटलें नव्हतें.

शिवाजी—काय करूं रे ! दोहोंपरी पेंचांत सांपडलों.

विसाजी—तूं पाहिजे तें ह्मण; पण जर आतां असा मागें आलास तर या गांवांत तुझ्या नांवाचे धिंडवडे निघ-तील. 'शिवाजीराजे' ह्मणून पोरें आपल्या मागें लागतील. शिवाय अशा रीतीनें फजीत झाल्यामुळें सुंदरीचे आईबाप तिला कोणाच्या तरी गळ्यांत बांधून टाकावी असाच त्यांचा विचार ठरणार. असें झालें ह्मणजे जो पहिल्यानें मागणी करील त्यासच ती मिळेल. मींच पहिल्यानें मागणी केली आहे.

पुनः मीच ही गोष्ट काढीन. मग ती मलाच मिळणार; मग मी—हा विसाजीराव--हाच महाराजांचा नम्र सेवक आपल्या भावी राणीसाहेबांचा प्रेमखजिना लुटणार, खचित लुटणार बरें !

**शिवाजी**—अरे नीचा, तूं त्या रत्नाचा उपभोग घेणार काय ? तुझ्या जिव्हेचा विटाळ पुनश्च तिच्या नांवाला होऊं नये असेंच करतों थांब. [असें ह्मणून तरवारीला हात घालतो.] पण ही माझी तरवार तुझ्या रक्तानें विटाळल्यास तिचें पवित्र तेज नाहींसें होईल. असो; होसो हो ! दिलेलें वचन परत घेणें माझ्या शीलाला उचित नाहीं. हा मी लमास तयार आहें. कर लवकर सर्व तयारी. जा कर कृष्णवदन येथून एकदाचें.

**गुणाजी**—अबबब ! किती चवताळून गेला आहे पहा ! हे राजेसाहेब फार तापट. यांचा अधिकार तावडतोब काढून घेतला पाहिजे, नाहीं तर एखाद्या गरीबाचा घातपात करतील.

**विसाजी**—महाराजाधिराज ! तापूं नका ! मलाही तेंच पाहिजे आहे. हाच पहा मी त्या तयारीस लागतों. आपण मात्र तयार रहा. [ **विसाजी** व **गुणाजी** जातात. ]

( **धनाजी**राव आपल्या अंगरख्यांत झांकलेल्या दोन तरवारींसह प्रवेश करितो. )

**धनाजी**—यावें, महाराज ! यावें सरकार ! आतां तर येथें बायका नाहींतना ? मघाशीं बतावणी तर खूप केलीत. आपण बोलण्यांत जसे कुशल, तसे ( तरवारीवर हात मारून ) या कामांतही वाकब असालच. महाराज, युद्ध ह्मणजे काय, हा शब्द आपल्या कानांत आला असेलच. निदान कधीं कानांनीं तरी ऐकला असेल; यापुढें आतां लाजतां का ?

**शिवाजी**—धनाजीराव ही मस्करीची वेळ नव्हे ! खबरदार, यावेळीं माझी थट्टा कराल तर !

**घनाजी**—पुरे झाली ही पोकळ राजकीय ऐट आतां! या राव, तुम्हांला थोडासा अनुभव शिकवितों! आपणास व्याकरण फार चांगलें येत असेल! घ्या तर आतां तरवार हेंच नाम! महाराज, चालवा तरवार! [ एक तरवार पुढें करितो. ] जाती घातक, सामना नाव, चालवा आपण पुढें कसें चालवितां पाहूं? कां महाराज, तरवार देखील चालवितां येत नाहीं! बरें तर, तेंही मीच आतां आपणास शिकवितों.

**शिवाजी**—अरे मूर्खा!—

**घनाजी**—काय! शिवी! हें तर अगदीं पोरकट! आपण महाराजना? आणि महाराजांच्या तोंडांत असला हलकट शब्द! येथें अगदीं घसरलां आपण! [ पुढें जाऊन ] आतां कोठें पळून जातोस? राजा व्हायला पाहिजे नाहीं? झाला राजा! घे ही तरवार! दाखवितों आतां एका राजाचे दश करून.

**शिवाजी**—नाहींच ऐकत तूं! बरें आहे. हा पहा मी तयार आहें! रहा उभा, दाखव काय तो पराक्रम आतां. [ घनाजीराव व शिवाजीराव परस्परांशीं लढतात; घनाजीरावाची तरवार हातांतून दूर उडून पडते, ती शिवाजीराव घेतो व घनाजीरावास परत देऊन त्यास लवून मुजरा करितो. ] शूर शिपायास एवढीच शिक्षा पुरे आहे।

**घनाजी**.—वाहवा वाहवा! तुला तरवार फार चांगली चालवितां येते! शाबास! तूं हुशार गुणी आहेस! शूर आहेस तसाच विनयवानही आहेस. तुझा जय झाला असून गर्विष्टपणाचा एक शब्दही नाहीं. क्षणभर राजा झालास म्हणून कांहीं हरकत नाहीं! गुणी मनुष्य राजा झाला तर वाईट काय?

**शिवाजी**.—[ आपल्याशीं ] गुणी मनुष्य! कांहीं वेळापूर्वी

मी गुणी होतों ! पण आतां मात्र माझ्या गुणांना उपमा नाहीं! [ मोठ्यानें ] धनाजीराव, तुह्मी लष्करांत नोकरीस आहां व तुमचा अधिकारही मोठा आहे. असें ह्मणतात, तें खरें काय?

धनाजी—हो, मी लष्करांतच असतों खरा.

शिवाजी—चाकरी धरून पुरीं दोन वर्षें झालीं नाहींत तोंच तुमची बढती होऊन आतां तुमच्या हाताखालीं दहा हजार फौज आहे असें ऐकतों.

धनाजी.—खरें आहे. आलिकडे या लष्करी खात्यांत अशीच बढती होते. आमचे सेनापतीच पहा—अजून तिशी उलटली नसेल, पण त्यांना सेनापतीचा अधिकार मिळून तीन वर्षें झालीं !

शिवाजी —वाहवा ! इतक्या लवकर सेनापती झालेना! शाबास ! नोकरी करावी तर अशाच ठिकाणीं करावी ! धनाजीराव तुमच्या लष्करांत चाकरी करण्याचा मींच कधीं विचार केला तर तुह्मीं मला आश्रय द्याल !

धनाजी—वाहवा ! तुला आश्रय देणार नाहीं तर देऊंतरी कोणास ? तुला तर पहिल्यानें. तुजसारख्या शूरास तर मजकडून होईल तेवढी मदत मी करीन. ज्यापाशीं मी भांडतों तो मनुष्य. तर मला फारच आवडतो. हें घे वचन. मी तुझा स्नेही आहें असें समज, व प्रसंगीं वेळाथक माझें साहाय्य माग.

( ह्माळसाई व विसाजीराव प्रवेश करितात. हे दोघे तरवारी लपवितात. )

ह्माळसा—[ लगबगीनें ] महाराज त्वरा करा; त्वरा करा; महाराज, आपण येथून लवकर निघून जा कसे. काय बाई तरी चमत्कारीक वर्तमान हें ! ही बातमी ऐकून माझे तरी पायच मोडले !

शिवाजी— मी निघून जाऊं ?

विसाजी—अशीच वेळ आली आहे. हें पहा पत्र आतांच माझ्या एका मित्राकडून आलें.–आपण आमच्या महाराजांच्या शत्रूंस सामील आहां व आमच्या राज्यांतील लोक फितूर करण्याकरितां गुप्त वेषानें या शहरांत आलां ह्मणून आपणांस एकदम कैद करावें असा हुकूम करून जिकडे तिकडे स्वार रवाना केले आहेत. आपण माझ्या घरीं आहां असें माझ्या मित्रानें ऐकिल्यावरून आपल्या येण्यापासुन कदाचित् संकट येईल तें येऊं नये ह्मणून त्यानें हें पत्र पाठविलें. महाराज आतां माझा निरुपाय आहे. आपणांस एकदम येथून निघून गेलें पाहिजे, नाहीं तर ते लोक आपणांस कैद करून नेतील व पुढें काय होईल हेंही सांगतां येत नाहीं. महाराज, आतांच जा,—निदान या शहराबाहेर तरी निघून जा—पुढचें पुढें.

म्हाळसा—हरहर! आतां माझ्या पोरीचें कसें होईल ?

( सुंदरी व दादासाहेब येतात. )

सुंदरी.—[ शिवाजीरावाच्या जवळ जाऊन ] सरेच का आतां आपणास निघून गेलें पाहिजे ? इतक्यांतच आपल्याला जावयाचें होतें तर इतके दिवस कशाला येथें राहिलां ? मधांशीं आपण तें तसें भाषण तरी का केलें ?

[ शिवाजी आणि सुंदरी एका बाजूस होतात. शिवाजी सुंदरीला सावरून धरतो. ]

विसाजी—महाराज आतां वेळ करूं नका.

दादा—नानासाहेब कोतवाल यांजकडे जाऊन मी चौकशी करून येतों.

विसाजी—कृपाकरून तेवढें मात्र करूं नका; तुह्मी

तिकडे गेलां तर सगळाच घात होईल. तुमचा त्या प्रकरणांत संबंध असला पाहिजे असें समजून तो आपल्यास तेथें कैद करील; तुमच्या घरीं हा राजा आला असावा असा तर्क बांधून तो लागलाच आपले शिपाई घेऊन येथें तयार होईल. तुह्मी जाल करावयास एक पण होईल भलतेंच.

**म्हाळसा**—देवा! सगळेच फिरे बेत फसले. थोरा मोठ्यांच्या पदरीं मुलगी पडावी ही इच्छा आणि हे राजेसाहेब आपण होऊन घरीं चालून आले. पण बाई कोठलें आमचें इतकें दैव! पोरीचें मनही त्यांच्यावर बसलें आहे. पण--

**विसाजी**--पण का? मर्जी असेल तर अजून देखील एक उपाय आहे. आजच लग्न करून सर्व काम उरकून घेतलें पाहिजे-आज मुहूर्तही चांगला आहे. रात्रौ पस्तीस घटिकेचा मुहूर्त; मी आतांच उपाध्यायांस विचारून आलों; कारण राजेसाहेबांकडून यांतला थोडासा सुगावा मला पूर्वीच लागला होता. त्यांच्याही मनांतून सुंदरीबाई साहेबांनाच वरावें असें आहे. मी सारी जुळवाजुळव करतों. महाराजांच्या कृपेबद्दल उतरायी होण्यास मी काय करणार नाहीं!

**म्हाळसा**--होय, तें होईल तर किती नामी होईल! मी तुमचे उपकार कधीं विसरणार नाहीं.

**विसाजी**—होईल तर काय झालें! पण आपला व दादासाहेबांचा रुकार असला पाहिजे.

**म्हाळसा**--माझी सुंदरी राजालाच द्यावयाची. बरें तर विसाजीराव, माझी कबुली आहे. तिकडची कबुली माझ्याकडे लागली. आजच संध्याकाळीं लग्न उरकून घ्यावें-पण तुह्मी मात्र तेवढी व्यवस्था करा. सुंदरे-अग सुंदरे-झालें तरी काय पोरीला? अग महाराजांशीं तुझें लग्न करण्याचा विचार चालला आहे. तूं आहेस तरी कोठें?

**सुंदरी**--[सावध होऊन झटदिशीं शिवाजीपासून दूर होते.] आई, खरेंच काय ? तर माझ्यासारखी भाग्यवान मीच. [शिवाजीच्या मुखाकडे पाहते. ]

**शिवाजी**--पण अशा स्थितींत लग्न करणें चांगलें नाहीं. मी आतां पळून जाणार; असा पळून जाणारा नवरा तुला कसा आवडेल? शिवाय, मी केवढा गुन्हा केला आहे हें तुला माहीत आहे? आतांच तुमच्या राजाचे शिपाई मला कैद करून नेतील। हें तुला बरें दिसेल ?

**सुंदरी**—वाहवा ! इकडे संकट आलें असतां मी त्याचा वांटा घेतला नाहीं तर मी आपली कशी ?

**शिवाजी**—[ आपल्याशीं ] किती मुग्ध आहे ही ! अशा या भाबड्या मनाला मी फसविणार ? हाय हाय ! देवा आतां कसें करूं? यापेक्षा मरण बरें !

**दादा**—अरे, हें आहे काय ? कोणाचें लग्न ? सुंदरे, अंमळ लहान्यानें व मर्यादेनें घोळ. अजून कशास कांहीं ठिकाण नाहीं तोंच इतकी लगट ? चल हो बाजूला. हुंड्याविषयीं—

**विसाजी**—हुंडा ! आमचे महाराज इतके नीच नाहींत ! आपल्या बाहेर ते नाहींत. [ म्हाळसाबाईस ] पहा, असा राजा कधींच मिळावयाचा नाहीं. दादासाहेबांनीं पैशाची गोष्ट काढतांच त्यांचें मस्तक कसें फिरलें आहे तें पहा. [ मोठ्यानें ] दादासाहेब, हा सर्व विचार मागाहून करावा; पहिल्यानें कसें तरी कार्य उरकून घ्यावें हेंच बरें.

**दादा**—परंतु—

**म्हाळसा**—पुरे झालें आतां बोलणें ; उगाच वाद कशाला पाहिजे ? अधिक बोलून तरी लोकांत हसें पिकावयाचें कीं नाहीं ? मेलें फुकाचें गप्प कसें बसवत नाहीं कोण जाणें ।

विसाजी—तर मी अतां जातों व सांगितल्याप्रमाणें व्यवस्था करितों. दादासाहेब, पहिल्यानें कार्य उरकून घ्या ; जा आतां त्याच कामास लागा. रात्रीं नऊ वाजण्याचे पूर्वीं वरात बाहेर पडली पाहिजे. पुढें मृत्युयोग आहे असें जोशानें सांगितलें आहे. शिवाय उशीर झाला तर काय होईल कोण जाणें ! प्रसंग मोठा चिकट आहे.

म्हाळसा—आमच्याकडून कांहीं उशीर नाहीं. कशी तरी एकदां गळ्यांत माळ पडली म्हणजे झालें. मोठें अवडंबर माजवून तरी काय करावयाचें ! पण नऊ वाजतां आपल्या येथें वरात न्यावयाला तुम्ही यांल कीं नाहीं !

विसाजी—मी तर पूर्वींच तयार आहें असें समजा. आमच्यां सुंदराबाईच्या लग्नास मी नाहीं म्हणजे !

म्हाळसा—विसाजीराव, तुम्ही मोठ्या मनाचे खरे. आम्हीं तुम्हाला मुलगी देत नाहीं म्हणून सांगितलें तरी त्याचें तुम्हांला मुळींच वाईट वाटलें नाहीं. उलट होईल तेवढी तुम्ही मदतच करीत आहां ! अखेरीस माझ्या सुंदरीच्या नशीबीं राजाच नवरा मिळायाचा होता ! पण मी कितीदां सांगत असें कीं आमच्या सुंदरीला माळ घालायला कोणी तरी राजाच तयार होईल म्हणून ?

विसाजी—माईसाहेब, सुंदराबाईसाहेबांचें नशीबच तसें आहे ! त्यांच्याशीं लग्न करण्याची उद्धटपणाची इच्छा मला कशी झाली याचें मला आश्चर्य वाटतें. बाकी या कामीं मी मनोभावें झटतों याबद्दल तुम्हीं कांहीं माझी स्तुति करायला नको. लोकांकरितां झटणें हें कसें अगदीं माझ्या अंगीं खिळून गेलें आहे. तुम्हीं इतक्यांतच काय जाणलें आहे ? [ एकीकडे ] बाईसाहेब, रात्रीं वरात घरीं जाईपर्यंत वाट

पहा. मग तुम्हांला समजून येईल सुंदराबाईंचें नशीब किती उत्तम आहे तें आणि परकार्यदक्ष विसाजीरावानें तुमची चाकरी किती चोख बजाविली आहे ती! 'इःश मेला' नाहीं! सुंदराबाईसाहेब रात्रीं आपली स्वारी जेव्हां आपल्या भव्य व सुशोभित राजवाड्यांत जाईल त्या वेळची आपली मुद्रा व आपले शब्द पहायला व ऐकायला हा सेवक विसाजीराव हजर राहील बरें! तूं मग या महाराजांवर शिव्यांची लाखोली वाहशील ती ऐकायला हा विसाजी तेथें असेलच. तो तुमचा प्रेमविलास पाहून माझ्या हृदयांतील क्षत कांहींसें भरून येईल. निराशा व संताप यांच्या तावडींत तूं सांपडल्यावर पुढची खटपट करण्यास चुकणार नाहीं. आणि-मग-मग-जाऊं द्या. तो बेत जरा सावकाशीनें व शांत चित्तानें रचला पाहिजे.

[ विसाजीराव मिटक्या मारीत जातो. ]

**म्हाळसा**—आतां इथेंच उभें राहून काय करावयाचें! कांहीं तयारी करावयाची आहे कीं नाहीं?

**दाद.**—मला नाहीं असा उतावेळपणा आवडत; जा आतां तुम्हींच दिवे लावा, मी पाटावर बसावयास मात्र येईन.

**म्हाळसा**—आहारे! पण तेवढें तरी होईलना? का नारळावर भागविलें पाहिजे!

[ दादासाहेब व म्हाळसाबाई जातात. ]

**शिवाजी.**—[ सुंदरी जात असतां तिचा हात धरून ] सुंदरे, थांब-एक शब्द-पहा, अजून नीट विचार करण्याची वेळ आहे—नाहीं तर हासत कर्म करावें, भोगावें तेंचि रडत परिणामीं.

सुंदरी—[ प्रेमयुक्त व हास्ययुक्त मुद्रेनें ] काय बरें हें विचारणें ! मी मूल, मी तो विचार काय करावयाचा ! आईनें सारा विचार केलाच असेल. तिचें आणि विसाजीरावांचें बोलणें चाललेलें आतांच नाहीं का ऐकिलें ? यांत कांहीं मुलीचा कोणी विचार घेत असतो ! आतां इकडे बोलण्याची मला लाज वाटते. आई भवानी माझ्या मनाप्रमाणें तूं केलेंस हें मी विसरणार नाहीं. [ सुंदरी जाते. ]

धनाजी—[ पुढें येऊन ] शाबास, तूं मोठ्या नशिबाचा आहेस ! असें सुंदर रत्न तुझ्या नशिबीं आहे, आणखी काय पाहिजे ! पाहिलीस कशी तुला शहाणी व मर्यादशील बायको मिळाली ती ! ही इतकी मर्यादशील असेल असें माझ्या मनांत कधींच आलें नाहीं; पण हा प्रेमाचा परिणाम! रत्न आहे रत्न बरें ! तिला आतां खुशी ठेव ह्मणजे झालें. आपलें तें मधलें काम संपलेंच आहे ! तुझ्यासारखें माझें नशीब असतें तर—

शिवाजी—तर काय ! माझें नशीब तुह्मांस इतकें चांगलें वाटतें ! दुरून डोंगर साजरे !

धनाजी—चांगलें आहे ह्मणजे शंका आहे कीं काय ! पण पुरे आतां, आपली घरीं वाट पहात असतील. [ धनाजीराव शिवाजीरावाचा हात धरून त्यास नेतो. ]

अंक २ रा समाप्त.

---

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला.

( विसाजीराव व गुणाजीराव येतात. )

विसाजी—का गुणाजीराव, आमच्या राणीसाहेबांची

भारी येथपर्यंत तर येऊन पोंचली! आतां आमच्या महाराजांचें राज्य, त्यांचें तें कामसरोवर, हीं कांहीं दूर नाहींत. आतां लवकरच आमच्या राजाराणीचा, त्यांच्या त्या कामसरोवराच्या कांठीं असणाऱ्या गगनचुंबित वृक्षांनीं चोहों बाजूनीं वेढिलेल्या टोलेजंग वाड्यांत प्रवेश होईल. हाः-हाः-हाः-कायरे गुणाजीराव, आमच्या या राणीसाहेबांनीं तें भिकार झोंपडें पाहिलें ह्मणजे तिची कशी दशा होईल बरें!

गुणाजी.—गरीब बिचारी! तूं असा हात धुवून त्या गरीब पोरीच्या पाठीस लागलास हें बरें नव्हे. तिनें तुझा अपमान केला ह्मणून तूं तिचा असा सफई घात करावास हें लायक काम नव्हे! आपण नाहीं रे बोवा यांतले.

विसाजी—ठीक! झाला का आपला वेदांत सुरू? बरें मी एक काफर ठरलों, पण तूं? अरे हो! हे पहा आपले राजेसाहेब आले. कदमपर निगा रखो महाराज! सही ताजीम! मुजरा घेनः आहा महाराज! शाबास, राज्य करावें तर असेंच करावें! आपली कारकीर्द मोठी यशस्वी खरी! आपण राज्याचा त्याग केल्यामुळें मला फार वाईट वाटतें. पण महाराज, आपली प्रजा आपणास प्रतिकूल कशी झाली? दैव फिरल्यामुळें सर्वच गोष्टी प्रतिकूल होतात कीं काय कोणजाणें? बरें महाराज, हें राजाचें सोंग आतां उतरून द्या हीं आपली पूर्वीचीं वस्त्रें!

गुणाजी—पण माझा गोफ महाराज? आपल्या आजीनें आपल्या वाढदिवशीं दिलेला तो. टाका परत, नाहीं तर न्यायाधिशाकडे नेईन!

विसाजी—माझी पाची महाराज! आपल्या बाबासाहेबांनीं आपणास दिलेली?

शिवाजी—मूर्खांनो, लाज वाटत नाहीं असें बोलायला!

मी आपली शपथ मोडिली कीं काय ! मीं आपलें वचन नडीस नेलें किंवा नाहीं.?

विसाजी—नाहीं कोण ह्मणेल ! महाराज तुह्मी आपलें वचन अक्षरशः खरें केलें. थोडें जास्त पण कमी नाहीं. थोरच आपण !

शिवाजी—अरे नीचानों ! काय करूं ? महाराशीं गांठ पडली ! बरें असो. माझ्या वचनाप्रमाणें मी वागलों. तुमचा व माझा सर्व संबंध तुटला. आतां काय ह्मणून तुह्मी मजपुढें येऊन नाचतां ! आतां येथून चालते व्हा. जा आग लावा त्या तोंडाला.

विसाजी—काय ! फारसा शेफारून बोलतोस ?

शिवाजी—तुह्मी तरी काय ह्मणून मला उगाच त्रास देतां? करारप्रमाणें मी वागलों; आतां तुमचा माझा काय संबंध ! आपण मोठा जय मिळविला, त्या गरीब बिचाऱ्या पोरीचा घात केला, तिच्या नांवास कलंक लाविला, तिच्या जन्माचें मातेरें केलें, या जन्मीं ह्मणून तिला आतां सुखाचें नांव नाहीं, अशी तिची स्थिति केली. ही तिची दशा पाहून तुह्मास आनंद होत असेल, पण मला माझ्या कृतीबद्दल फारच लाज वाटते. तुह्मास अत्यानंद होत असेल तर पोटभर हंसा, पाहिजे तितके हसत बसा, पण मजपुढें हंसाल तर मात्र संभाळा. मीं तिला फसविलें-मीच तिचा विश्वासघात केला, परंतु आतां ती माझी पत्नी आहे, तेव्हां मीच तिचें रक्षण करणार. विसाजीराव, मुख्यत्वेंकरून मी तुलाच सांगतों-जर अतःपर तूं तिच्या वाटेस गेलास किंवा तूं तिची थट्टा केलीस, तिजकडे नुसतें वांकड्या नजरेनें पाहिलेंस, तरी देखील मी चांगलें प्रायश्चित्त भोगावयास लावीन ! पश्चात्ताप ह्मणजे काय तें तुझ्याच सं-

गतीनें मी शिकलों; तोच पश्चात्ताप जर मी तुला शिकविला नाहीं, तर मी शिवाजी नव्हे.

विसाजी—वाहवा! आमचे महाराज मोठे बोलके बोलकी आहेत. सुंदराबाईसाहेब तर्‍याच नशीबवान!

शिवाजी—खबरदार पुन: तिच्या नांवाला तुमच्या अपवित्र जिव्हेनें विटाळाल तर! आणि मला महाराज, महाराज ह्मणाल तर! तुह्मांला वाईट वाटत नाहीं, पण मला माझ्या कृतीबद्दल फार वाईट वाटतें—पश्चात्तापानें माझें काळीज जळत आहे-जा मूर्खांनों येथून काळें तोंड घेऊन आतां मी काय करीन काय नाहीं, तें माझ्यानें सांगवत नाहीं ह्मणून सांगतों, संभाळा!

गुणाजी—विसाजीराव आतां त्याचें नांव घेऊं नका-तो जीव घ्यावयास देखील चुकावयाचा नाहीं-आतां येथून निमूटपणें जाऊं या कसे एकदां.

विसाजी—महाराज आपला भेदांत, आपल्या धमक्या बस करा. येतों आतां महाराज, आपल्या सासुरवाडीस कांहीं निरोपबिरोप! हं, पण बरें स्मरण झालें-महाराज लग्नाच्या दिवशीं दोनशें रुपये देईन असें मी बोललों होतों त्याप्रमाणें हे दोनशें रुपये. [ पुढें रुपये करतो. ]

शिवाजी—मीं आपलें वचन फुकट दिलें होतें, विकलें नव्हतें समजलास! मी तुजसारख्या मांगाच्या पैशास शिवत नसतों. [ शिवाजीराव रुपयांची थैली विसाजीरावाच्या हातची घेऊन दूर फेंकतो. ती गुणाजीरावाच्या पाठींत बसून तो ‘ आई ’ ह्मणून बोंबलतो. ] आतां कसा बोंबलास?

विसाजी—अस्सें अस्सें! पण याबद्दल तुला देखील केव्हां तरी बोंबवून आमचे पाय धरावयास लावीन. [ एकीकडे-गु-

गाजीरावास ] चल गुणाजीराव, आतां आपण घरीं जाऊं; पुनः उद्यां सकाळीं मला इकडे यावयाचेंच आहे–आमच्या सुंदराबाई राणीसाहेबांस आपलें राज्य कसें काय पसंत पडतें तें पाहिलें तर पाहिजेच ? त्याशिवाय जिवाला सार्थक्य नाहीं वाटावयाचें.

**शिवाजी**—की अजून गेलां नाहींत ?

**विसाजी**—जातों महाराज, गेलों महाराज, निघालों महाराज.

**गुणाजी**--महाराज, महाराज, महाराज–[ विसाजीराव व गुणाजीराव 'महाराज' 'महाराज' ह्मणत जातात व दाराबाहेर जातांच मोठ्यानें हसतात. ]

**शिवाजी**--बरें झालें या वेळीं मजजवळ शस्त्र नाहीं. नाहीं तर रागाच्या झपाट्यांत या दोघांसही येथेंच ठार केलें असतें. या जगांत किती तरी नीचपणा व अधमपणा भरला आहे ! पण मी तरी काय कमी नीच व अधम आहें ? मींच तिच्या घातास मुख्य कारण ! मींच तिचें लोकांत हंसें करविलें. तिच्या जन्माचें मातेरें केलें. अरेरेरे ! पहा पहा, आंत हंशा कसा चालला आहे तो ! [ आंतून मोठा हंशा ऐकूं येतो. ] इतक्यांत कोणी तिकडे जाऊन चहाडीही केली असेल. पुढें कसें काय होईल, तें सांगतां येत नाहीं. तिला इकडेच हांक मारावी हें बरें. एक विश्वासू मनुष्य मीं पाठविलाच आहे, तो बहुतकरून घरीं पोंचला असेल. तिला घेऊन आतां जलदी घरीं जावें हाच उत्तम मार्ग. दुःख होणार तें होणार; आणखी लोकांचें हंसें तरी नको. घरींच आईच्या तोंडून तिला सारी हकीकत कळेल तें बरें. आई माझ्या पापावर पांघरूण घालण्यास आणि माझ्या कृत्याचा ओंगळपणा सारा लपविण्यास

चुकणार नाहीं. [ दाराजवळ जातो, इतक्यांत सुंदरी बाहेर येते. ]

**सुंदरी**—महाराज, पाहिलें का हे विसाजीरावानें बरोबर दिलेले लोक किती दांडगे ते ! या लोकांना भीड, मर्यादा, यांचें कसें तें मावच नाहीं. जो तो येऊन मजकडे पाहून हंसूं लागतो. मेले एकमेकांना पाहून डोळे तरी कसे मिचकावतात सांगूं ! मला वाटतें यांना राजा ह्मणजे काय पदार्थ आहे, त्याची योग्यता काय, त्याचा मान कसा राखावा हें कांहीं समजत नाहीं. गादी तरी पाहिलींना मेल्यांना कशी सांपडली ती ! पण, महाराज, आपलें कपाळ घामानें किती तरी थबथबलें आहे ! चेहेराही उतरला आहे. झालें तरी काय बाई ? [ त्याचा घाम आपल्या पदरानें पुसते.]

**शिवाजी**—त्यांत काय आहे ? दगदगीमुळें व गर्दीमुळें घाम आला असेल.

**सुंदरी**—मग मला नाहीं आला तो ? छे: कांहीं तरी कमजास्त झालें आहे. माझ्यापासून देखील का चोरून ठेवायचें ? खास प्रकृतीच बिघडली असावी ? किंवा कांहीं मोठी काळजी तरी लागली असावी.

**शिवाजी**—वेडी आहेस तूं ! माझी प्रकृति बिघडायाला काय झालें ? [ तिच्या हनवटीला हात लावून ] आणि आतां माझ्या जिवाला काळजी तरी कशी चिकटणार ? तेथें प्रेमाशिवाय दुसऱ्या कशालाही थारा मिळावयाचा नाहीं.

**सुंदरी**—मी कांहीं इतकी वेडी नाहीं. आपल्या जिवास कशाची तरी मोठी काळजी उत्पन्न झाली असावी. या आपल्या सुंदरीला नाहीं का तिची वाटेकरीण करावयाची ? एकदां इकडे पाहून हंसल्याखेरीज नाहीं बाई मी हालूं द्यावयाची. ही ह्मणजे केवढ्या आनंदाची वेळ ! एकमेकांच्या सह-

वासापासून उघडपणें सुखोपभोग करून घेण्याची ही राजरोस वेळ असतां पहिल्या घडीसच हा असा प्रकार, मग पुढें—

**शिवाजी**—[ तिच्या तोंडावर हात ठेवून हंसल्यासारखें करून ] छीः छीः वेडे ! असलें अमंगळ बोलूं नको. या गुलाबाच्या फुलाला पाहून कोणाला बरें आनंद होणार नाहीं ? मला वाटतें–या इलकट लोकांस आतां परत लावावें. त्या मुळें विसाजीपंतानें घाईमुळें चांगलें वाईट न पाहतां जे लोक मिळाले ते नोकरीस ठेवले. माझ्या हें लक्षांत येतांच मीं येथेंच एका झोंपडींत सारी सोय तूर्त करविली आहे. पुढें पाठविलेला मनुष्य सर्व व्यवस्था करून आपली वाट पहात बसला असेल—तर तिकडेच आतां आपण जाऊं. त्या झोंपडींत एक म्हातारी आहे. मोठी गरीब आणि मायाळू. आपण तिच्या घरीं जाऊन मीठभाकर खाल्ली तर तिला मोठा आनंद होईल. तिनें कितीकदां मला मुद्दाम घरीं नेऊन प्रेमानें मीठभाकर खाऊं घातली आहे. चल जाऊं तिकडेच. अहाहा ! काय पिठासारखें स्वच्छ चांदणें पडलें आहे! अशा वेळीं आणि अशा सोबतीनें एकांतीं चालणें याहून अधिक सुख कोणतें असेल काय ? पण तूं चालत येशील ना ?

**सुंदरी**—हें काय मेलं विचारणें ! एवढेंसें अंतर का माझ्यानें चालवणार नाहीं ? हा हात धरल्यावर मी पाहिजे तितकी दूर चालत येईन. पण इकडचें राहणें दूरदेशीं. मग येथील रस्त्यांची वगैरे माहिती कोठली ?

**शिवाजी**—प्रिये, इतक्यांतच संशयाला प्रारंभ ! अग या ठिकाणीं मी एकांतीं आपल्या प्रियेची गांठ घेण्यास येत असें.

**सुंदरी**—हं ! हं ! कोण बरें ती प्रिया ?

**शिवाजी**—इतक्या आंत्या नकोत कपाळाला घालावया-

ला. अग तूंच ती. प्रत्यक्ष गांठ नव्हे, मनोराज्यांतील गांठ समजलीस. बरें तें राहूं दे. चल आतां जाऊं झोंपडीकडे.

सुंदरी—पण बाई! मशालीशिवायच?

शिवाजी—अहाग अरसिक! ही स्वर्गीची मशाल असतां त्या चिंध्यांच्या घाणेरड्या मशालीची तुला आठवण तरी कशी होते?

सुंदरी—अगबाई! किती गार वारा हा! मला तर थंडीच वाजूं लागली.

शिवाजी—तर हा घे माझा शेला. [ तिच्या अंगावर आपला शेला घालून तिला आपल्या अंगाशीं चिकटून धरतो. ] आतां तर थंडी लागणार नाहीं?

सुंदरी—आतां कोठून थंडी लागेल?

शिवाजी—[ आपल्याशीं ] ईश्वरा अशा रत्नाचा मीं घात केलाना! काय हें घोर पातक! इचा प्रेमाचा एकेक शब्द अंतःकरणांत शल्यासारखा टोंचतो. याचा शेवट आतां कसा होईल तो होवो.

प्रवेश २ रा. शिवाजीचें घर.

( शिवाजीरावाची आई येते. )

शि० आई—[ लगबगीनें ] आतां मात्र बेत जमला खरा. माझ्या शिऊला अव्यवस्थितपणा मुळींच सपत नाहीं. जिकडे तिकडे साफसूफ दिसलें पाहिजे. गरीबाचें पोर पण त्याचा डौलच कांहीं वेगळा-पण यानें निरोप पाठविला, तो तरी धड पाठवावयाचा होता कीं नाहीं बरें? याचा जिकडे तिकडे उतावळपणा-"आम्ही आतांच घरीं येतों, सर्व तयारी ठेव." काय तो हाच निरोप. पण एवढ्यावरून मी काय समजावें?

तिच्याच मनांत माझा शिवाजी भरला असावा; नाहीं तर आमच्या गरिबाच्या घरीं तिच्या आईबापानें तिला दिलें असतें? माझा शिवाजी जरी राजाच्या वेषानें त्याच्या घरीं गेला, तरी तो कपट करून त्यांना सचीत सचीत फसविणार नाहीं; तेव्हां जरी ती मुलगी याच्या गळ्यांत माळ घालायला तयार झाली असली तरी लग्न होण्यापूर्वीं यानें बहुतकरून तिला खरी हकीकत सांगितली असेल. मी ह्मणतें– बागवानाचा मुलगा असला ह्मणून काय झालें? सगळेच कसे मेले राजे असतील! तरी पण माझ्या शिवाजीची कांहीं वेगळीच तऱ्हा! राजांत तरी अधिक काय असतें? राजाच्या जन्मास जरी तो आला नसला, ह्मणून काय झालें? त्याच्या अंगच्या गुणांत आणि राजाच्या गुणांत काय अंतर आहे? तो का कमी उदार, शूर, बुद्धिमान, एकवचनी आहे? पण बाई, माझ्या मनाला चैन कां नाहीं वाटत? त्यानें हें जें राजाचें सोंग घेतलें हें कांहीं नीट केलें नाहीं. त्याच्या स्वभावाला हें विरुद्ध. कसें बाई हें निभावेल अगं निभावो! आई भवानी तुला सर्व काळजी आहे. अगं बाई! माझ्या शिवाजीला हजार वर्षं आयुष्य आहे. त्याची आठवण काढतांच हा पहा दारांत उभा; आणि तीही त्याच्याबरोबर आहे.

[ शिवाजी व सुंदरी येतात. ]

[ पायांवर दूध, पाणी घालून ] हा वेळपर्यंत तुमचीच वाट पहात बसलें होतें. शिवाजी, आतां येतों ह्मणून तूं निरोप पाठविलास, तरी देखील इतका उशीर केलास ना? तुला तरी मागचें भानच रहात नाहीं. मुली, वेला आतां काढून ठेवतें बरें. अग अशी दूर का जातेस? मीं कांहीं कोणी परकी नव्हे.

सुंदरी—पण बाई-याचा अर्थ काय? महाराज, हें आहे तरी काय? या बाईचा व आपला इतका परोबा कसा? मला वाटतें आपली व या बाईची ओळख येथची नव्हे, कर्णाटकांतली फार दिवसांची असावी!

शि० आई—शिवाजी, हें काय आहे रे कोडें? माझी तुझी ओळख कर्णाटकांतील ह्मणे!

सुंदरी—( म्हातारीच्या तोंडाकडे व शिवाजीच्या तोंडाकडे टकमक पाहत ) महाराज, ही म्हातारी कोण? ही अशी कां बोलते? ही आपल्याला अरे तुरे एकेरी कां बोलते? ही वेडीबिडी तर नाहींना? आणि आपल्याला येथेंच का राहावयाचें?

शिवाजी—प्रिये-नाहीं, नाहीं-या तोंडानें आतां तिच्याशीं कसा बोलूं? काय बोलूं? माझें सर्व धैर्य गळालें-पाय लटपट कांपूं लागले. सर्वांगावर घाम दरारून आला आहे. माझ्यासारख्या नवशिख्या पातक्याचें पाप उघडकीस यावयाची वेळ आली ह्मणजे त्याच्या कृत्याचें खरें स्वरूप त्याला दिसूं लागतें. [ एकीकडे-म्हातारीस ] आई, तूंच सांग आतां-तूंच तिला सर्व सांग. माझ्या हृदयाला पश्चात्तापाच्या डागण्या लागल्या आहेत. देवा, कितीरे मी दुष्ट, उलट्या काळजाचा! मला आतां मरण आलें तरी बरें. [ जाऊं लागतो. ]

सुंदरी—( त्याचा पदर धरून ) हें काय बाई! असें काय एकाएकीं करायचें तें! तोंड देखील अगदीं उतरून गेलें.—ही झोंपडी, ही म्हातारी, ही इथची स्थिति—आपलें व तिचें बोलणें व वागणें—सगळेंच काहीं चमत्कारिक दिसतें. काय असेल तें असो. मला तर मोठा संशय येतो. माझें अंतःकरण धडधडूं लागलें आहे—बाई तुह्मी कोण, कोण तुह्मी? बोला बोला लव-

कर ! काय, तुह्माला देखील बोलता येत नाहीं-तुमचें देखील तोंड अगदीं खिळून गेलें !

शि० आई—अरे, तूं या मुलीला फसविलेंस कीं काय ! या गरीब पोरीला तूं फसविलेंस ? ह्यातारपणीं माझ्या तोंडाला काळोखी आणलीस ! मी समजत होतें कीं तूं हिला खरी हकीकत लमापूर्वी सांगितल्यावांचून राहणार नाहींस. देवा, ते गेले तेव्हां त्यांच्याबरोबरच कां नाहीं मला नेलेंस !

शिवाजी—आई ! नको नको आतां माझ्या दुःखावर डाग देऊं ! [ छातीवर हात ठेवून ] येथें जो भडका उडाला आहे तो आतां माझ्यानें सहन करवत नाहीं. देवा ! [ तिच्या पायांशीं मूर्छा येऊन पडतो ]

शि० आई—अरेरे ! गरीब बापडी भोळी मुलगी ! मुली, काय सांगूं तुला ! या कपाळकरंट्यानें तुझा सर्वस्वी गळा कापला ! मुली, आतां तुला काय सांगूं ? माझ्या तोंडानें माझ्या पोराचा अधमपणा तुला ऐकवावा यापेक्षां मला मरण आलें असतें तर बरें. हा मुलगा कांहीं राजा नाहीं-याचें कूळ मोठें नाहीं पण नीचही नाहीं. हा माझाच मुलगा. याचें नांव शिवाजी बागवान बरें—

सुंदरी—तुमचा मुलगा ! हा शिवाजी बागवान ! पुरे, बस झालें आतां ! [ शिवाजीरावाजवळ येऊन त्याला हालवून ] माऐकलेंत का ! या ह्यातारीनें माझा थट्टा चालविली आहे. माझा हा अपमान होत असलेला आपल्याला पाहवतोना ? अग आई, यांना झालें आहे तरी काय ! हे असे निचेष्ट कां ? तरी मघाशींच मला भीति वाटली होती. पण तेव्हां नुसती उडवाउडव केली. आतां करूं तरी काय ! ही ह्यातारी कांहीं उपयोगी पडावयाची नाहीं. महाराज, प्राणप्रिया, पहा एकदां इकडे एक शब्द तरी बोला. ही आपली सुंदरी.

शिवाजी—[ एकदम दचकून ] कोण महाराज! कोठली सुंदरी! [ आठवण झाल्यासारखें दाखवून दुःखावेगानें ] अरेरे! मी पापी, मी अधम, अजून जिवंत राहिलोंना? बरें असो! आई, तूं जा आतां आंत. माझें कर्म मलाच निस्तरूं दे.

शि०आई—शिवाजी, शिवाजी, कायरे हें केलेंस! कसें नांव बुडविलेंस! अरे तूं प्रामाणिक, सऱ्या दिलाचा, तूं माझें पांग फेडशील म्हणून बारे मी कसे तरी दिवस कंठीत होतें! चांगलें फेडलेंस बाबा पांग! [ जाते. ]

सुंदरी—बरें झालें एकदांची गेली थेरडी! कोण उद्धट तरी! म्हणे आपला मुलगा! महाराज, पण आपण नाहीं का माझ्याशीं प्रेमाचा एक शब्द बोलत? [ त्याच्याजवळ जाते. ]

शिवाजी—प्रेम! आतां कसचें प्रेम! [ तिला दूर करून ] सुंदरी, आतां मी काय सांगतों तिकडे नीट लक्ष दे.

सुंदरी—अगबाई! हें असें काय करायचें तें! इतका निष्ठुरपणा कां? आपली मुद्रा अशी कां पालटली एकदम! त्या म्हातारीनें कांहीं चेटूक केलें खचित! [ पुनः जवळ जाते. ]

शिवाजी—[ पुनः तिला दूर सारून ] प्रिये!—पण छे—आतां असें बोलणें उपयोगी नाहीं. सुंदरी, आतां तूं गोड प्रेमाचे शब्द बोलूं नकोस. हा शिवाजी अधमाधम, राक्षस, महापातकी तुझा घात करणारा आहे. याला तूं आतां जितके शाप देशील तितके थोडे!

सुंदरी—[ एकदम चपापल्यासारखी होऊन ] काय! हें मी स्वप्न तर नाहींना? किंवा हा कांहीं तरी भुताटकीचा प्रकार असेल! असल्या गोष्टी मीं पुष्कळ वाचल्यां आहेत. माझ्या प्रियकराच्या तोंडून असले शब्द कधींही यावयाचे नाहींत. त्यांचें मन किती उदार! ते कधींही माझ्यासारख्या दीन गा-

हिला अशा तऱ्हेनें फसविणार नाहींत. हे पहा मी हात जोडतें. खरें बोला. आतां संशयांत ठेवूं नका. माझें डोकें फिरूं लागलें, छाती धडाडूं लागली, पायांना कंप सुटला. सोडवा मला या भयंकर कल्पनांच्या जाचांतून! हं—बोला बोला.

**शिवाजी**—काय, बोलूं काय? मीं जें नीच कर्म केलें आहे त्याचा उच्चार करण्यास माझी जिव्हा उचलत नाहीं. सुंदरी, नको माझ्या तोंडून तें वदवूं. तुझ्या अंतःकरणांत जर कांहीं दयेचा लेश असेल तर आतां असें छळूं नको. तूं आपल्या भोंवतालीं पहा, आणि समज.

**सुंदरा**—हरहर! दैवा! कायरे हा माझ्यावर प्रसंग आणलास! असल्या या रूपाच्या खालीं इतका अधमपणा, राक्षसी दुष्टपणा लपला असेल का? हे खरोखरीच इतके निर्दय व निष्ठूर झाले असतील काय? छेः, मला नाहीं हें खरें वाटत. आपण माझी नुसती परीक्षा पाहण्यासाठीं असें बोललात खचित. आपण कधीं असा कोणाचा गळा कापणार नाहीं. आपली ती स्वाभाविक राजासारखी ऐट, आपला तो उमदा स्वभाव, आपले ते थोर विचार—छेः, बागवानाच्या अंगीं असले गुण कधींही दिसावयाचे नाहींत. (हंसून) महाराज, पुरे आतां ही थट्टा. आजचा दिवस किती आनंदाचा! अशा वेळीं अशी थट्टा करणें आपल्याला शोभतें का? (त्याच्या गळ्यांत हात घालून त्याच्या तोंडाकडे प्रेमानें पाहते.)

**शिवाजी**—काय आतां हिला सांगूं? कशी हिची खात्री करूं? या प्रसंगांतून मी जर लवकर मोकळा झालों नाहीं तर माझें डोकें ठिकाणावर राहणार नाहीं. हिचे हे प्रेमाचे शब्द माझ्या हृदयांत सुईसारखे शिरून माझ्या वेदना वाढवीत आहेत. (तिचा हात गळ्यांतून काढून तिच्यापुढें उभा रा-

होतो.) सुंदरी, ऐक. देवाची शपथ, ती म्हातारी बोलली हें सर्व खरें आहे. ती माझी आई. मी आपलें कुळ विसरलों, शीळ विसरलों; मी बागवान खरा. मी चांडाळ घातकी आहें.

सुंदरी—(एकदम मागें सरून) पुरे-बस्स. समजलें मी. माझे डोळे उघडले. देवा! काय ही माझी अवस्था केलीस! माझे कान कां नाहीं बधिर झाले? किंवा आपली जिव्हा कां नाहीं सडून गेली? ही सुंदरी शेवटीं बागवानीण बनलीना! हे-हे-महाराज जेव्हां घरीं आले, तेव्हां केवढा आम्हांला आनंद झाला! आई नेहेमीं म्हणत असे "माझी सुंदरी कोणा तरी राजाची पट्टराणी होणार!" आज सकाळींच आमच्या हर्षाला किती ऊत आला होता! आमचें मनोराज्य खरें ठरलेलें पाहून आम्ही अगदीं आनंदशिखराला जाऊन पोंचलों होतों; आणि आतां-नको ती आठवण-आतां मला तोंड दाखवायला जगांत जागा राहिली नाहीं. मी राजाची पट्टराणी होईन, माझें शरीर दागदागिन्यांनीं मढवून काढीन, दासदासींची मालकीण होईन, माझा बुरख्याचा मेणा रस्त्यानें जाऊं लागला कीं रस्त्याच्या दोहों बाजूंनीं लोक मला वांकून मुजरे करतील-इत्यादि कल्पना मनांत येत तेव्हां मी किती हरखें! आणि आतां रस्त्यांत मी दिसलें कीं लोक माझ्याकडे बोटें दाखवितील व एकमेकांशीं कुजबुजून गालांतल्या गालांत हंसतील. चहाटळ पोरें "यावें राणी साहेब" म्हणून माझ्या मागें लागतील. आई जगदंबे! पुरे आतां हे जन्माचे सोहाळे! दे मला मरण एकदाचें! कां, महाराज, असे स्तब्ध कां? कोठें आहे तो तुमचा राजवाडा—ते गगनचुंबित वृक्ष—ते फुलांचे ताटवे—इंद्रधनुष्याला लाजविणारे ते त्यांचे रंग-मधुर गायन करणारे आपल्या सुंदरीच्या नांवाचा जप करणारे पक्षी? काय मेलें कपट हें! पण कायहो, मला असें फसवून तुम्हांला काय

निघालें ? असा गरीब गाईचा गळा कापण्यांत आपण कोणता पुरुषार्थ साधला ? मीं आपला असा कोणता अपराध केला होता ? इतका अधमपणा, इतकी दुष्टाई, इतका निष्ठुरपणा माझ्यावर कां पाखडलांत ? कोठें चाल या पापाचा झाडा ? देवा तुझ्या येथें न्याय आहे कारे ? असेल तर यांना या कर्माबद्दल घोर शिक्षा दे. यांना या जन्मांत सुख कधीं मिळूं देऊं नको. पुढच्या जन्मीं यांना नरकाशिवाय इतर कोठें थारा देऊं नको.

**शिवाजी.**—सुंदरी, दे, दे शाप. तेच माझ्या पापाला योग्य आहेत. मीं तुला फसविलें, तुझा घात केला हें खरें आहे. त्याबद्दल ईश्वर मला जें शासन देईल तें मी सोसण्यास तयार आहें. पण मीं हें कां केलें तें ऐक. या माझ्या अक्षम्य अपराधाचें मुख्य कारण तूंच-तुझाच अभिमान, तुझाच गर्व तुला भोंवला. जर तूं अभिमानानें वागली नसतीस व तुजवर खरें प्रेम करणाराचा अपमान केला नसतास, तर तुला असें दुःख झालें नसतें. एखादा अमूल्य हिरा असतो, त्याचें तेज अनुपम असतें; पण त्यांत अगदीं लहानसा अवघ जरी असला, तरी त्यामुळें तो हीनमोल होतो-तशीच तुझी ही स्थिति झाली. तुझें सौंदर्य अतुल, तुझे गुणही तसेच; पण अशा लावण्यगुणखाणीमध्यें एका दोषास आश्रय मिळाला, त्याचेंच हें फळ! तुझा गर्व हाच तो दोष! हाच दोष तुझ्या दुःखाचें मूळ. सुंदरी, मी अगदीं लहान होतों तेव्हांच तुझें हें सुंदर रूप, तुझे मोहक गुण माझ्या मनांत भरले व त्यावेळीं जें माझें प्रेम तुजवर जडलें तें हा वेळपर्यंत कायम असून मला मरण येईपर्यंत तसेंच राहील. मी अगदीं लहान होतों तेव्हां आपल्या बापाबरोबर नेहेमीं तुझ्या बागेंत काम करावयास जात असे. मी दिवसभर बागेंत खपत असें, ह्यामुळें सका-

ळीं, संध्याकाळीं, जेव्हां जेव्हां तूं बागेंत फिरण्यास येत असस तेव्हां तेव्हां माझी दृष्टि तुजकडे जाई. तूं बागेंत असतां माझ्या दृष्टीला दुसरें कांहींच दिसत नसे; पण तूं एकदां देखील मजकडे पाहिलें नसशील! तूं बागेंत आलीस ह्मणजे मला कांहीं विलक्षण आनंद होई! मध्यें मध्यें कोठें तरी झाडाच्या आड राहून मी तुला पहात असे व तुझें ध्यान करीत असे! तुला पाहून माझ्या मनांत कांहीं नवे नवे तरंग येऊं लागले—तूं तेथून गेलीस ह्मणजे मला चैन पडेनासें होऊं लागलें. त्यावेळीं मी लहान होतों तरी ते तरंग माझ्या मनांत वारंवार येऊन मला अस्वस्थ करीत, व मला वाटे—तूं जवळ असलीस तरच मला समाधान होईल; यामुळें तूं जवळ असावीस ही इच्छा माझ्या मनांत उत्पन्न झाली. माझ्या जीविताचा तुझ्या जीविताशीं कांहीं तरी संबंध असावा व तुला प्राप्त करून घेतल्यावांचून मला मुळींच सुख व्हावयाचें नाहीं, असा माझा पक्का ग्रह झाला; पण तूं श्रीमान् सावकाराची मुलगी—मी गरीब बिचारा बागवान,—ही गोष्ट मी त्यावेळीं विसरलों नव्हतों—हा दारिद्र्यपाश कसा तोडून टाकावा हाच मी विचार करूं लागलों! परंतु या पाशांतून सुटण्यास जसजसे मी अधिक प्रयत्न करूं लागलों, तसतसे तुझे कटाक्ष मला अधिक व्याकुळ करूं लागले. तुला मिळविण्याची योग्यता यावी ह्मणून मी अधिक श्रम करावयास आरंभ केला, इतक्यांत माझा बाप वारला. त्याजवळ जो कांहीं थोडासा पैसा होता तो मला मिळाला. अशा रीतीनें स्वतंत्र झाल्यावर तुझ्या कुळाची बरोबरी करण्यास जो एक मार्ग दिसला तो मीं निश्चयानें धरला. लिहिणेंवाचणें शिकलों; गाणेंबजावणेंही शिकूं लागलों; दांडपट्टा वगैरे शिपाईगिरीचे बहुतेक खेळ मला लवकरच येऊं

लागले. मग चित्रें काढण्याचा अभ्यास सुरू केला, व त्या कामांत मीं पुष्कळ मेहेनत केली तरी मला एकच चित्र काढितां येऊं लागलें—मी आपल्या सुंदरीचें मात्र चित्र काढावयास शिकलों व सर्व कसब खर्च करून तुझी एक तसबीर तयार करून तिचेंच मी रात्रंदिवस ध्यान करूं लागलों. कोणतेंही काम हातीं घेते वेळीं लोक ज्याप्रमाणें आपल्या इष्ट देवतेचें स्मरण करितात, त्याप्रमाणें तुला मिळण्याची योग्यता संपादन करण्याकरितां जेव्हां जेव्हां मी उद्योगास लागत असे, तेव्हां तेव्हां तुझें दर्शन घेऊन व ध्यान करून मी त्या उद्योगास लागत असे.

**सुंदरी**—( आपल्याशीं ) याच्या तोंडची ही हकीकत ऐकून मला बाई मोठें आश्चर्य वाटतें. हलक्या कुळांत जन्म खरा, पण याच्या अंगीं ईश्वरानें कांहीं अलौकिक गुण ठेवले आहेत. अशाच्या संगें सारा जन्म घालविणें कांहीं कठिण नाहीं. पण या साऱ्या गुणांवर त्याच्या एका कृत्यानें–अरे–यानींच माझा घात केलाना! मला त्याचा विसर पडत होता.

**शिवाजी**—याप्रमाणें कांहीं दिवस गेले. कोणी मला वेडा ह्मणत, कोणी मूर्ख ह्मणत, कोणी कांहीं ह्मणत, तरी मी तुझें ध्यान सोडिलें नाहीं, व ज्याप्रमाणें देवतेच्या भक्तांना आपल्या हातानें त्या पवित्र मूर्तीवर प्रतिदिवशीं एक तरी पुष्प पडावें असें वाटतें, त्याप्रमाणेंच तुझ्या सुंदर मूर्तीवर मीं अर्पण केलेलें एक तरी पुष्प दिसावें अशी इच्छा उत्पन्न होऊन, मी स्वतः लाविलेल्या फुलझाडांचीं सुंदर शेलकीं फुलें गुंफून गजरे करून तुझ्या घरीं पाठवूं लागलों. जरी मी आतां बागेचें काम पहात नसे, व त्यामुळें तुझ्या बागेमध्यें काम करीत असतां तेथें तुझें दर्शन होण्याचा संभव नव्हता, तरी प्रतिदि-

वर्षी तुझें दर्शन घेतल्यावांचून मला चैनच पडत नसे; म्हणून कसेंही करून मी नेहेमीं एकदां तरी तुला पाहून समाधान मानीत असे. रात्रंदिवस मला तुझाच ध्यास लागला होता, पण पाहिजे त्यावेळीं मला तुझें दर्शन होणार कसें? म्हणून ही तुझी प्रतिमा पाहून मी संतोष मानीत असे. एके दिवशीं मी फारच उत्कंठित झालों असतां मला एक नवीन कल्पना सुचली. तूं शिकलीसवरलेली; तेव्हां आपलें मनोगत तुला पत्रद्वारें कळवावें असें माझ्या मनांत आलें. तें एक पत्र लिहिण्यास मला किती वेळ लागला म्हणून सांगूं! त्या पत्रांत मीं माझ्या प्रेमाचें चित्रच वठविलें होतें. हें पत्र इतक्या नम्रतेनें लिहिलें होतें कीं, एखाद्या रंकानें एखाद्या सार्वभौम राणीस जरी तें पाठविलें असतें तरी त्या राणीला देखील तें पाहून संतोष झाला असता. पण तेंच पत्र जेव्हां तुजकडे गेलें, तेव्हां तूं त्याचा अपमान केलास. तुजवर माझें इतकें प्रेम असून तूं माझा अपमान केलास; त्यावेळीं मला किती राग आला असेल बरें? मी रागानें अगदीं वेडा झालों. त्याच वेळीं दुसरे कांहीं लोक तुला कोणत्या रीतीनें दुःख द्यावें या विचारांत होते, त्यांच्या हातीं मी सांपडलों. माझ्याकरवीं आपला हात साधण्याचा त्यांनीं विचार केला; मी तर त्यावेळीं रागानें मूढच बनलों होतों. मीं सापाची कृति केली. तूं मला लाथेनें तुडविलेंस त्याचा मीं डाव धरला व संधि साधून तुला डसलों. नको, नको त्या कर्माची आठवण! ( खालीं मान घालून दुःखाकुल असा स्तब्ध राहतो. )

**सुंदरी**—( आपल्याशीं ) हेंच खरें प्रेम! पण प्रेमांत विष असतें काय? (उघड) या गरीब विचारीनें अपमान केला तो काय! पण त्याबद्दल असा सूड घ्यावा हें शोभतें ना!

**शिवाजी**—सुंदरी, मीं घात केला खरा; पण आतां ही

गोष्ट परत येत नाहीं. आतां मला सुखाची आशा नाहीं हें मी पक्कें समजतों. असें दुष्कर्म केल्याबद्दल मला किती दुःख भोगावें लागत आहे ? पश्चात्तापानें माझें काळीज कसें जळत आहे हें मी आतां सांगत नाहीं. झाल्या गोष्टीचें होईल तेवढें निराकरण करावें, माझ्या कपाळीं तरी दुःखच लिहिलें आहे; पण तुला तरी निदान माझ्यापासून दुःख न होऊं देण्याचा माझा निश्चय झाला आहे. सुंदरी ! ( तिच्याजवळ जातो. ती रागानें दूर होते. )

सुंदरी—हां, हां ! पुरे आतां प्रेमाच्या गोष्टी. तुम्हांला काय बोलावयाचें असेल तें दुरूनच बोला. आपली बटीक झाली आहे खरी; पण माझ्या अंगांत गर्वाचा ताठा भरला आहे हें पक्कें ध्यानांत असूंद्या. मला आतां दुःखाशिवाय कांहींच राहिलें नाहीं. मी आतां बागबागीण झालें. मला कावाडकष्ट केले पाहिजेत. पण आपल्याला निक्षून एक सांगतें कीं काहींही होवो, दिवसभर काम करीत राहीन. आपल्याला मात्र मीं माझ्या अंगाला हात लावूं देणार नाहीं. आपण माझे पती खरे–पण एवढीच कृपा करा कीं झाला हा अपमान पुरे. आतां हा देह किटाळूं नका. आपलें मुखावलोकन न होईल तर मी मोठी धन्य ! पण इतकें मोठें नशीब कोठें आहे माझें ?

शिवाजी—सुंदरी, तूं भिऊं नको. मी कसा आहे हें तुला माहीत नाहीं. लग्न होतांच माझा राग शांत झाला व मी आपल्या दुष्ट वचनांतून पार पडलों. मला अगोदरच पश्चात्ताप होऊं लागला होता. आज सकाळींच लग्नाचा निश्चय होत होता तेव्हां मीं तुला काय म्हटलें त्याची आठवण कर. वचनानें बांधला गेलेला, सूड घेण्याच्या इच्छेच्या तावडींत सांपडलेला आणि तुला आपलीशी करून घेण्याच्या आशेला

गुंतलेला असा मी असल्यामुळें मला स्पष्ट बोलतां येईना. असो, मी तरी तुला हेंच सांगणार होतों--कीं अतःपर तूं मला देवीप्रमाणें पूज्य आहेस—व मी आपला अपवित्र हात तुला बिलकुल लावणार नाहीं. आतां तुझा माझा लग्नाचा संबंध आहे असें मनांत आणून दुःख करण्याचें कारण नाहीं. मी तुला फसविलें. तुझा विश्वासघात केला, ह्मणून हें विश्वासघातानें झालेलें लग्न खरें नाहीं. अतःपर तुझा व माझा कांहींच संबंध नाहीं रात्र बरीच झाली आहे—आज येथेंच नीज—मनांत कांहींही धास्ती बाळगण्याचें कारण नाहीं—आपल्या आईबापांच्या घरीं जशी सुरक्षित होतीस, तशीच येथेंही आहेस. उद्यां सकाळीं तुझा बाप तुला परत न्यावयास येईल. आज सकाळीं तूं जशी कुमारी असून लाजत, हंसत बोलत होतीस, तशीच उद्यांही लाजत, हंसत, मधुर भाषण कर व जो तुला योग्य वाटत असेल त्यालाच वर. तुला सुख मिळूं लागलें ह्मणजे माझ्या पापाचें तुला विस्मरण होईल. माझ्या प्रेमाची तेवढी आठवण करून ईश्वरानें मला माझ्या कृतकर्माची क्षमा करावी ह्मणून प्रार्थना करीत जा; एवढेंच तुजपाशीं मागणें आहे. आई, इकडे ये. [ आंत जातो .]

**सुंदरी**—( आपल्याशीं ) खरोखरीच यांनीं मला फसविलें तरी हे मनाचे मोठे खरे. मी ताठ्यानें यांच्या प्रेमाला धिक्कारिलें हें चांगलें केलें नाहीं. तरी यांच्याशीं बोलत असतां वरचेवर हे ह्मणत असत कीं कुळापेक्षां गुण थोर. तुझा नवरा दरिद्री झाला तर तूं त्याच्यावर प्रीति करशील का ? असें त्यांनीं विचारल्याचें मला आतां स्मरतें खरें. माझें प्रेम कायम राहील असें मीं त्यावेळीं उत्तर दिल्याचेंही मला आठवतें. खरेंच, प्रेम असल्यावर सुख कां नसावें ? पण नाहीं. यांनीं कपट केलें तें फारच नीच. राजाशीं लग्न लावून शेवटीं बागवानीण ! लोक मला

काय ह्मणतील ! [ शिवाजी आणि त्याची आई येतात. ]

शिवाजी—आई, ही माझी बायको नव्हे, ही आपल्याकडे पाहुणी आली आहे. हिला तूं आपल्या खोलींत अंथरूण घालून दे व आपल्याजवळ निजीव. [ सुंदरीस ] तूं कांहीं धास्ती बाळगूं नको. आपल्या बापाच्याच घरीं आहेस असें समज. आई, जा आतां हिला आंत घेऊन. तिला फार दुःख झालें आहे. एकदां निजूं दे कशी.

शि॰आई—अरे, ही तुझी बायको नव्हे ह्मणतोस !

शिवाजी—नाहीं, नाहीं, पण तूं आतां बोलूं नको—तिला आंत ने पाहूं कशी एकदां ! [ ह्मातारी सुंदरीचा हात धरून नेते; सुंदरी रडत चालूं लागते. चार पावलें जाऊन मागें पहाते. ] परमेश्वरा ! हिचें रक्षण कर, हिजवर सुखाची वृष्टि कर. या शिवाजीचे सुखाचे दिवस संपले. [ जमिनीवर अंग टाकतो. पडदा पडतो. ]

अंक ३ रा समाप्त.

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

( शिवाजीराव हातांत पत्र घेऊन येतो. )

शिवाजी—( सुसकारा टाकून ) तिला निद्रा लागली आहे, हे ईश्वराचे मजवर उपकारच. मी तिच्या आयुष्याचें मातेरें करणारा, जिवंत असून मेल्याप्रमाणें तिचें जिणें करणारा, यमस्वरूपी दुष्ट घातकी वैरी या जगांत जिवंत आहे

याचा तिला घटकाभर कां होईना, विसर पडला आहे. कामक्रोधादि मनोविकार मनुष्याचे कट्टे वैरी ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. पहाना, त्यांच्या आधीन होऊन मी शिवाजी, ज्याला नांव ठेवावयाची गांवांत कोणाची प्राज्ञा नव्हती, त्याला या मनोविकारांनीं मोह पाडून त्याच्याकडून केवढें नीच कृत्य करविलें! असो; आतां झालें तें झालें पण पुढची तजवीज काय? या कसाचाच्या करणीनें मिळविलेला डाव पुरा करावयाचा काय? छे छे! पुरे पुरे हें पाप! झाला—निश्चय ठरला. (हातांतील कागदाकडे पाहून) ती जागी होण्यापूर्वीं सारी घडी पुनः पूर्ववत् केली पाहिजे. जणूं कांहीं निजा घडलेला प्रकार स्वप्नवत् वाटावा, एवढाच काय तो तिचें केलेलें नुकसान भरून देण्याचा मार्ग आहे. अरेरे! मी ह्मणतों खरें—पण पुढें माझी वाट? सुंदरी गेल्यावर मी काय करणार? तिला आपली करून घेण्याकरितां मा हा सारा अट्टहास! [इकडे तिकडे फिरून] किती तरी माझें मन दुष्ट आहे हें! अजूनही आपल्याच सुखाची आशा करितें. अजून पापाकडेच त्याची प्रवृत्ति! हें उपयोगी नाहीं. झालेला निश्चय एकदम अमलांत आणला पाहिजे. मग जें होईल तें होवो.

( शिवाजीरावाची आई दाराबाहेर येते. )

शि० आई—शिवाजी, कायरे हें केलेंस? बाबा, मनाच्या फाजील हावेचे हे परिणाम! तरी मी पहिल्यापासून तुला सांगत होतें. आपण गरीब, आपल्याला हे ढंग नकोत.—पण शिऊ, तुझी अशी चर्या बदलली कशानें? तूं काळाठिक्कर कां दिसूं लागलास? सचित केल्या कृत्याचा तुला पश्चात्ताप झाला असावा. व्हायचाच तो. नाहीं तर तूं

माझ्या पोटचा कसचा ? माझ्या शिऊनें कोणाच्या तरी नादीं लागून असें गैरलायख कृत्य केलें असावें ! कायरे शिऊ, असेंचना ?

शिवाजी—आई, मजकडून गुन्हा झाला खरा; आतां तो कांहीं परत येत नाहीं. मी उगीच दुसऱ्यावर कां ढकलूं ! माझ्या दुष्ट मनाचेच हे सारे चाळे. पण झालें, आतां त्या मनाचें राज्य संपलें. सुविचाराची वेसण त्याला घातली. अद्दल घडल्या-शिवाय अक्कल येत नाहीं. ( सुंदरी निजली होती तिकडे बोट दाखवून ) हें पहा आई, तिला तिचा बाप घरीं नेईल अशीच तजवीज केली पाहिजे. तिचें मात्र लमच झालें नाहीं असेंच केलें पाहिजे. मी आतांच तिच्या बापाकडे हें पत्र पाठवून देतों ह्मणजे तो लागलाच येथें येऊन तिला घरीं घेऊन जाईल मी अंमळ बाहेर जाऊन येतों. ती उठलीच तर तिचें सांत्वन तूंच कर. ही सारी थट्टा ह्मणून सांग, कांहीं बोल पण माझ्या कृत्याचा तिला विसर पडे असें कर.

शि० आई—[ विचार करून ] बरें बाबा, मला तें कठिण दिसतें; पण पहानें प्रयत्न करून.

शिवाजी—ह्या माझ्या कृत्यानें आपल्या नांवास कलंक लागला, तो आतां मी काढून टाकण्याचा प्रयत्न करणार. मी आपल्या आईबापांच्या नांवलौकिक बुडविण्यास कारण झालों—पण आतां तो नांवलौकिक जेव्हां मी पुनः मिळवीन तेव्हांच तोंड दाखवीन. आई, मी बाहेर जातों, तिला जप बरें. [जातो.]

शि० आई—[ तो जात असतां त्याजकडे पाहून ] काय घोटाळा पहा ! पोराच्या या एका कृत्यानें सारी वडी बिघडली असो; कपाळींच तसें लिहिलेलें मग तो तरी काय करील !

( सुंदरी दार उघडून बाहेर बघते व हळू हळू बाहेर येते. ]

सुंदरी—[ आपल्याशीं ] येथें नाहीं ! असो, मुद्दाम माझ्या डोळ्यांपुढें तरी ते बसले नाहींत हे तरी त्यांचे मजवर उपकारच ह्मणायाचे. पण काल रागाच्या सपाट्यांत मीं कांहीं भलतेंसलतें तर बोललें नाहींना ? ते दृष्टीसमोर नकोत खरे; पण ते निघून गेले असल्यास मला चैन पडणार नाहीं. ते कोठें तरी गेले असें वाटून मला हें घर भयाण वाटूं लागलें आहे. सुंदरे, काय तुझ्या नशिबाचा फटकारा हा ! काल कोणत्या रंगांत दंग आणि आज ? आणि ह्याला कारण—छेः ते नाहींत. याला कारण मीच. माझाच ताठा मला भोंवला. भलती हाव मनांत धरल्याचा हा परिणाम ! उगीच दुसऱ्याला बोल लावण्यांत काय अर्थ ? काल त्यांच्या तोंडची ती सारी प्रीतिकथा ऐकून माझा राग बाई तेव्हांच निवाला, आणि त्यांतून काल रात्रींचें त्यांचें वर्तन किती उदारपणाचें ! त्यांची बोलण्याचालण्याची ढब तरी किती संभावीतपणाची आणि मोहनीनें पूर्ण भारलेली ! देवा, हे जर खरे खुरे महाराज असते तर माझ्या सुखाला पार नसता ! आणि आतां—छेः हा भऊपणा नाहीं कामाचा. हा माझा घात करून मला खरीच बागवानीण बनवील. नाहीं, क्षमा करून उपयोग नाहीं.

शि० आई—मुली, तूं इतक्या लवकर कां उठलीस ? रात्रींचें जागरण आणि दगदग यांनीं तुझें कपाळ भणभणून गेलें असेल ! अंमळ झोंप घेतलीस तर बरें वाटेल.

सुंदरी—होय, तें खरें; पण आपण उठून आल्यावर अंथरुणावर लोळणें मला शोभेल का ? लोक काय ह्मणतील ? "पहा कशी पसरली आहे ती ! कांहीं लाज वाटते का हिला ! सासू उठून बिचारी काम करते आहे त्याचें हिला कांहीं नाहीं ! जणूं कांहीं राजाची सून !" असें ह्मणतीलना !

शि० आई—( आपल्याशीं ) आतां हिला काय सांगूं? प्रसंग मोठा अडचणीचा आला आहे. ( उघड ) अग हें काय? तूं वेड्यासारखें काय बोलतेस? सासू कोण? आणि सून कोण? काय मेला हा थट्टेचा परिणाम तरी! सुंदराबाई, कालचें तें सारें विसर आतां. अग तुझा आणि माझ्या शिवाजीचा कांहीं संबंध नाहीं हो. तुला राजालाच द्यावयाची असा तुझ्या आईचा आग्रह—तुझ्याही मनांतून तेंच होतें, तेव्हां तुमची फजिती करण्याकरितां ती थट्टा केली. आतांच तुझ्या बापाकडे शिवाजीनें निरोप पाठविला आहे. तो इतक्यांत येथें येईल. मग तूं त्याच्याबरोबर घरीं जाशील. तुला खरोखरीच एखादा राजा मिळेल हो. मग तर आह्मी गरीबांवरचा राग टाकून देशीलना?

सुंदरा—बाई, तुम्हां दुखाल का माझा थट्टा करूं लागलां! तुह्मी वृद्ध-मला वाटलें होतें कीं त्यांनीं एक माझा गळा कापला तो कापला, तुम्हीं तरी मला ममतेनें वागवाल. पण नाहीं, असें कसें होईल? इतकें कोठें माझें नशीब सरळ आहे! ( रडूं लागते. ) काय ह्मणे कालची ती सारी थट्टा! मी देखील तसेंच मानून आनंदांत राहतें! पण येथें मी आलें कशी! हा राजवाडा, चाकरमाणसांचा सुकाळ, जिकडे तिकडे ऐषआरामाची सामुग्री-हीं सांगताहेतना कीं मी एका मोठ्या राजाच्या पदरीं पडलें ह्मणून! आपण माझ्या सासूबाई. पण बाई, ही काय मी अशी आपल्यापुढें फतकल मारून बसलें! (उठून उभी राहते.) सासूबाई, आतां मी काय काम करूं?

शि० आई—मुली नकोग असें बोलू. माझ्या शिवाजीनें हें अगदीं वाईट केलें; पण त्याबद्दल त्याचें मन त्याला खाऊं लागलें आहे. त्याचें मन पापी नाहीं. दुष्टांच्या संगतीनें त्याच्या हातून असें घडलें. काय सांगूं त्याचें प्रेम तुझ्यावर असे! तुझ्याशिवाय

त्याच्या मनांत दुसरें कांहींच घोळत नसे. मी असकें शिकेन, तसकें करीन, ह्मणजे तर माझे गुण पाहून माझी सुंदरी माझ्याकडे प्रेमदृष्टीनें पाहील असें त्यानें ह्मणत असावें.

सुंदरी—काय ह्मणतां? त्यांच्या मनांत माझ्याविषयीं प्रेम! सोच बाई, प्रेम कसें नसेल! प्रेम नसतें तर त्यांनीं मला अशी फशीं पाडली असती का? फारच प्रेम! मी वेळींच जर हें यांचें प्रेम ओळखलें असतें, तर साऱ्यांचाच किती तरी त्रास वांचला असता.

शि० आई—आणि अजून तरी का तसें होणार नाहीं? मुली, तूं माझ्या शिवाजीला चांगलें ओळखलें नाहींस?

सुंदरी—कसें ह्मणतां? चांगलें ओळखलें नाहीं? तर मग ज्यांनीं 'महाराज' पणा पतकरून महारामांगांनाही न शोभणारी अशी करणी केली, ज्यांनीं मज गाईला विश्वासीं गुंतवून गळा कापला ते आपले चिरंजीव नव्हेत?

शि० आई—अग, मीं सांगितलेंना एकदां? नको आतां असे दुःखावर डाग देऊं. झाली ती गोष्ट परत का येते? तथापि त्याच्या हातून होईल तितकें करून तो तुला या अडचणींतून सोडविण्यास तयार आहे. तो आतां याच उद्योगासाठीं बाहेर गेला आहे. तुझ्या बापाला त्यानें पत्र लिहून सारी हकीकत कळविली आहे. काय म्हणे तें लग्न लटपटीचें होतें. सारा थट्टेचा व खोटा प्रकार. तुझा बाप आला कीं तो पुनः तुला जशीच्या तशीच निष्कलंक त्याच्या स्वाधीन करणार. तसेंच आपला तुझ्यावर कोणत्याही प्रकारचा हक्क नाहीं असें लिहून देणार. देवाच्या दयेनें तुझ्या मनानुरूप नवरा मिळावा अशी त्याची देवापाशीं प्रार्थना चालू आहे; ह्मणून मी पुनः ह्मणतें, मुली, झाला तो प्रकार विसर. आमच्याविषयीं मनांत असलेला राग टाकून दे.—आणि मुली, ऊठ, तोंड धू आणि थोडेंसें

दूध पी. तुझा जीव अगदीं हलक झाला आहे. दूध प्यायलीस ह्मणजे अंमळ बरें वाटेल. चल आंत जाऊं.

**सुंदरी**—बाई, नको आतां मला कांहीं. माझ्याच्यानें कांहीं पिववावयाचें नाहीं. कसा बाई एक दिवसांत सारा प्रकार बदलला? काल जर कोणीं मजविषयीं असें भाकीत केलें असतें तर कोणाला खरें वाटतें का? यांनीं कि नाहीं माझा सर्वस्वी घात केला हो! मी त्याचें हें कसें विसरूं? निष्कलंक मी घरीं जाऊं? निष्कलंक ह्मणजे यांचा स्पर्श झाला नाहीं इतकेंच कि नाहीं? प्रत्यक्ष स्पर्श नसला ह्मणून काय झालें? लग्नानें मीं बांधली गेलेंना? आतां पुनः एखाद्या हलक्या कुळांतल्या उनाड अवदसेप्रमाणें पाट लावूं ह्मणतां? बाई, आतां अशी भळभळती थट्टा तरी नका करूं. जें माझ्या नशिबीं आहे तें माझें मला भोगूं द्या. तुह्मीं तरी दुःखावर डाग नका देऊं. आतां माझा सारा भरंवसा तुमच्यावर. देवानें घातलें आहे खरें तुमच्या पदरांत.

**शि० आई**—नको, नको असें बोलूं. तुला माझ्या शिवाजीच्या प्रीतीची प्रतीति पाहायची असेल तर ही पहा जागजागीं दिसून येईल. तुझ्यासाठीं तो केवळ वेडा होऊन गेला होता. (आंत जाऊन पेला घेऊन येते.) हा पेला त्यानें एकदा मुद्दाम विकत घेतला. याला रोख किंमत फार पडली नाहीं तरी ज्याच्याजवळ तो होता त्यानें एक आमच्या घरांत पिढ्यानुपिढ्या मोठ्या अभिमानानें जतन करून ठेविलेली तरवार होती ती मोबदल्यांत घेतली. आमचे वाडवडिलांपैकीं कोणी बादशहाच्या पदरीं सिलेदार होते, त्यांनीं सरकारची चाकरी मोठ्या इमानानें बजाविली. एका प्रसंगीं बादशहाचा त्यांनीं मोठ्या शिकस्तीनें प्राण वांचविला ह्मणून ती नजर केलेली होती, ती त्यानें मागितली. असली चीज मोठ्या प्रीतीतली देतांना शिवाजीच्या डोळ्यांतून पाणी आलें. पण

तो पेला सुंदर असून त्यावर तुझेंच नांव कोरलेलें होतें, तेव्हां त्यानें ती तरवार देऊन तो पेला घेतला. केवळ तुझें नांव त्याच्यावर होतें ह्मणून त्याच पेल्यांतून पाणी पिण्याचा त्याचा निश्चय.

सुंदरी—( आपल्याशीं ) कोण तरी बाई वेड हें! खरेंच इतकी प्रीति असल्यावर त्यांनीं असें केलें हें एकपरी स्वाभाविकच झालें. तरी पण–

शि॰ आई—हें पहा त्यानें काढिलेलें तुझें चित्र? तो चित्रें काढावयास शिकला. त्यांतील मूळ हेतु तरी हाच कीं आपल्या सुंदरीचें चित्र काढून आपल्या खोलींत अशा रीतीनें ठेवावें कीं तुझी सुप्रसन्न मूर्ती रात्रंदिवस आपल्या नजरेसमोर रहावी. हें पहा कसें आहे तें? [ चित्रावरील पडदा दूर करिते. ] हें तुझेंच नव्हे का बरें? पण मी ह्मणतें–आतां ह्या गोष्टी बोलून काय करावयाचें? झालें, संपलें त्याचें मनोराज्य. त्यानें हें जें कृत्य केलें त्यायोगें या चित्रादि गोष्टींनीं त्याच्या मनास आनंद न होतां दुःखच होत राहणार. पण मुली, माझें ऐक, तूं भुकेली असशील; घोटभर दूध घेतलेंस तर बरें, नाहींका?

सुंदरी—नको मला कांहीं नको. नका उगीच आग्रह करूं. ( आपल्याशीं ) आईचें प्रेम कांहीं निराळेंच ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. हिचें त्यांच्यावर किती तरी प्रेम आहे! ही तर बाई सरळ, इमानी, खरी दिसते, तेव्हां तेच कसे उलटे निपजतील? पण बाई, नेम नाहीं. ' सूर्यापोटीं शनैश्वर ' असे प्रकार का थोडे आढळतात? पण या एका गोष्टीशिवाय त्यांच्या हातून वावगें घडलेलें असें मला काय माहीत आहे? आणि याही गोष्टींत त्यांचें मन ठिकाणावर कोठें होतें? खरेंच त्यांचें माझ्यावर अत्यंत प्रेम असावें. यांची पण ही गरिबीची स्थि-

ति! जमेल का माझें येथें? (पेल्याकडे नजर जाऊन) तो पेला हातीं घ्यावा, त्यांतून दूध प्यावें असें बाई माझ्या मनांत फार येऊं लागलें आहे.

**शि० आई**—अग, त्यांत विचार कसला करते आहेस इतका? घे हें दूध थोडेसें. इतका संकोच कां? दूध चांगलें आहे. त्यांत कांहीं घातलें नाहीं हो. तुला आतां भिण्याचें कांहीं कारण नाहीं. जे व्हावयाचें तें होऊन गेलें. माझा शिवाजी कांहीं मांग नाहीं. माझेंही अंतःकरण चिरून पहा, तेथें तुला कपटाचा लेशही मिळावयाचा नाहीं. देऊं का मग पेल्यांत?

**सुंदरी**—माझ्या ना ह्मणण्यानें इतकें का तुह्मांला वाईट वाटलें? घेतें हो बाई एक पेला, पण एकच पेला बाहा. [शि० आई दूध आणण्याकरितां आंत जाते व लागलीच दूध घेऊन बाहेर येते.] ह्मातारी मनाची मोठी प्रेमळ आहे. इच्याकडून मला कोणत्याही तऱ्हेचा त्रास पोंचणार नाहीं. तिकडे तर काय? सारें प्रेमाचेंच राज्य आहे. फक्त गरिबीशिवाय येथें कांहीं कमी नाहीं. मग कसें? [शि०आई सुंदरीपुढें दूध आणून ठेवते व पुढें बसते. इतक्यांत विसाजीराव त्या सोलीच्या खिडकींतून डोकावून पाहतो.]

**विसाजी०**—वाहवा! आतां मार्ग तर खुला आहे—मी त्याला जातांना पाहिलेंच. आतां आपणास बोलण्यासंवरण्यास फार चांगली संधी मिळेल. [आवाज न करितां हळूच मार्गे सरून दाराजवळ जाऊन दार ठोठावतो.]

**सुंदरी**—कोण आलें बाई! बाबा तर नसतील? छेः पण इतके लवकर कसे येतील? आतां बाबा कसचे येथें येतात! यापुढें माझा कारागृहवास कायमचा ठरलाच.

**शि० आई**—मुली, पुनः आणलेंस तूं डोळ्यांस पाणी!

मीं मघाशींच सांगितलेंना कीं दादासाहेबांना शिवाजीनें सकाळींच पत्र लिहिलें आहे. ते खचित येऊन तुला घेऊन जातील. तुला येथें बंदींत ठेवून आह्मांला काय मिळावयाचें आहे ? रात्रीं शिवाजीनें तुला माझ्या स्वाधीन केली तेव्हां तो काय बोलला त्याची आठवण कर. काय बाई, कोण तरी आलें आहे दारापाशीं ? [ दरवाजा उघडूं लागते. ]

**सुंदरी**—कोणी का असेना ? यावेळीं नांव सांगितल्याशिवाय कोणासही आंत येऊं देऊं नका. [ शि० आई दार बंद करीत असतां विसाजीराव दार जोरानें आंत लोटून आंत शिरतो. ] अगबाई, हा काळतोंड्या येथें कशाला आला ? दुसरें कशाला यावयाचा ? हिणवायला व माझी स्थिति पाहून आनंद मानावयाला आला असेल.

**विसाजी**—कसें काय सुंदराबाई ? [शि० आईकडे पाहून] तुमचा मुलगा आतांच मला रस्त्यांत भेटला. तो देवळाकडे गेला व तुह्मालाही त्यानें तिकडेच बोलाविलें आहे. तो ह्मणाला—" कांहीं निकडीचें काम आहे—आईला ह्मणावें तूं देवळांत ये—मी तेथें तुझी वाट पाहतों. तेथें नसलों तर कुरणांत असेन—तेथेंही नाहीं भेटलों तर मावशीकडे खासच असेन. " तो वाट पहात बसला असेल; तुह्मी लवकर जाल तर बरें. त्याच्या बोलण्यावरून काम निकडीचें दिसलें.

**सुंदरी**—मला येथें एकटी सोडून जाऊं नका—मी नाहीं येथें एकटी रहावयाची.

**विसाजी**—[ नम्रतेनें ] मुली, अशी भितेस का ? मी दादासाहेबांकडून आलों आहें. काय पहा साराच भुलवणीचा प्रकार ! बाई, तुह्मी परत येईपर्यंत मी येथेंच बसतों; मी हिला सोबत करतों.

**सुंदरी**—(आपल्याशीं) कसें करावें बरें? बाबांकडून निरोप घेऊन आला आहे ह्मणतो. तसें असेल कदाचित्. पण बाबा स्वतःच कां आले नाहींत? या सुंदरीला त्यांनीं सोडली का? पण या लग्नाच्या कामांत हाचना पुढारी होता? मग याच्याबरोबर बाबा निरोप कसा पाठवितील? मला बाई शंका येते. पण यांना तरी जाऊं नका असें कसें म्हणूं? तिकडे काय झालें असेल कोण जाणें! पश्चात्तापामुळें ते कांहीं आपल्या जिवास भलतेंसलतें तर करून घेणार नाहींत ना? त्यांचें डोकें अगदीं फिरून गेलें असावें. जाऊंयाच यांना. माझें काय होईल तें होवो. (उघडपणें) जा बाई तुह्मी. माझ्याबद्दल काळजी नका करूं. विसाजीराव माझी सोबत करतील.

**शि० आई**—मला तर या बोलावण्याचा कांहींच अर्थ समजत नाहीं. असो, पण मी तिकडे जाऊन येतें. तो माझी वाट पहात बसला असेल; मी लवकर परत येईन.

[जाते.]

**सुंदरी**—विसाजीराव, तुह्मी कां आलां तें मीं मनांत जाणलें आहे. सांगा पाहूं बाबांचा काय निरोप आहे? हं बोला लवकर. (बोलत नाहीं असें पाहून) तरी मला वाटलेंच होतें. आपली अशुभ मूर्ति पाहतांच माझ्या मनांत आलें. लग्नाच्या पूर्वीं आपण माझ्याविषयीं इतकी कळकळ दाखविली तिचें खरें स्वरूप आतां माझ्या अनुभवास आलें. माझी अप्रतिष्ठा पहावयाला आलां होय? पहा, खुशाल पहा आणि पोटभर हंसा. मीं आपलें मन निगरगट्ट केलें आहे समजलां?

**विसाजी**—सुंदरे, तुझा समज अगदीं चुकीचा आहे. मी तुझी थट्टा करावयास आलों नाहीं. या लुच्यानें तुला फसविलें, तुझा घात केला, ही गोष्ट मला कबूल आहे. इतकेंच नाहीं,

पण मींच याला तुमच्या घरीं आणलें; माझ्या बोलण्यावर भरवसा ठेवून त्याची तुह्मीं वडीजाव ठेविली व अखेरीस हा असा प्रकार झाला! काल रात्रींत-घरीं आल्यावर मागून मला सगळा प्रकार कळून आला-मला झोंप ह्मणून कशी ती ठाऊक नाहीं. तुझ्या झालेल्या घाताची घडी पुनः उलटवावी कशी हा विचार सारखा मनामध्यें घोळत होता. कांहीं युक्ति सुचेना. आज सकाळीं मग निश्चय केला कीं आपली चुकी कबूल करून तुह्मी क्षमा मागावी.

**सुंदरी**—तुह्मीं ही गोष्ट जाणून बुजून केली किंवा तुमच्या हातून अजाणतां ही चूक झाली याविषयीं माझ्या मनाची खात्री होऊन चुकली आहे. आतां कशाला बतावणी करतां? जर तुह्मी चांगल्या हेतूनें येथें आलां असतां तर मघाशीं बाबांचा निरोप घेऊन आलों आहें असें खोटें का सांगतां? बस, पुरे आतां तुमचा संबंध. येथून काळें तोंड करा कसें?

**विसाजी**—ऐक, माझें ह्मणणें तर नीटपणें ऐकून घे. आपल्या चुकीला कोणतें प्रायश्चित्त योग्य याचा विचार मी करीत होतों तेव्हां पुष्कळ वेळ माझ्याशींच काथ्याकूट केल्यावर एकच उपाय सुचला. या बागवानाच्या घरीं तुझ्यानें दिवस कसे काढवतील? त्याचें तुझें चार घटका पटणार नाहीं. अशा साऱ्या मुलुखाला फसवणाऱ्या नवऱ्याशीं तुझें कसें जमेल? क्षणोक्षणीं तुला त्याच्या बेइमानीपणाची आठवण होणार. किती झालें तरी तो हलक्या कुळांतला, तूं थोरामोठ्याची मुलगी! तेव्हां असा मनाचा निश्चय केला कीं तुला याच्या येथून काढून आपल्या येथें ठेवावी. माझी संपात्ति तुला माहीत आहे. राजाच्या राणीपेक्षां तुझी मिजाज अधिक ठेवीन. आतां पुनः दादासाहेबांच्या येथें जाणें तुला आवडणार नाहीं. तेथें गडीमाणसें देखील तुझ्याकडे पाहून खिदी खिदी हंसणार!

माझ्या घरीं रहा. मग तुझ्याकडे पाहण्याची कोणाची माझा आहे !

सुंदरी—अरे मेल्या मांगा ! कसायाची करणी करून मला फशी पाडून वरतीं मला अगदीं एखाद्या निर्लज्ज वेसवेप्रमाणें तुझी बटीक होऊन रहा म्हणतोस ? तुझ्या जिभेला हाड आहे कीं नाहीं ! असलें घाणेरडें बोलतांना तुझी जीभ सडली कशी नाहीं ? अरे चांडाळा! काय तुझ्या मतें मी इतकी हलकी झालेंना कीं रागाच्या आवेशांत मी आपलें कुळशील विसरून तुझी बटीक होईन असें तुला वाटलें ! देवा ! कशीरे तुला येत नाहीं माझी करुणा ! माझ्या दुःखाचा घडा भरण्यास ही येवढीच गोष्ट कमी पडली होतीना ?

विसाजीराव—( आपल्याशीं ) ही अशी वठणीला येईलसें दिसत नाहीं. तथापि एकदम उग्र रूप दाखवूं नये. ( सुंदरीस ) रागाऊं नकोस. तूं भलतेंच समजलीस. मी तुला असें कसें म्हणेन ? माझ्या मनांत असा घाणेरडा विचार येईल तरी कसा ? माझें म्हणणें कीं कबूल असशील तर तुला मी लग्नाची बायको करीन. मी आपल्या घरचा राजाच आहें. ऐश्वर्याला-ही कांहीं कमी नाहीं. राणींत आणि तुझ्यांत नांवाशिवाय कांहीं अंतर रहाणार नाहीं.

सुंदरी—मी का एखादी उनाड हलक्या कुळांतली आहें म्हणून तुम्ही मला असें म्हणतां ? हजार नवरे करून घेणारी मी नव्हे. बस पुरे आतां तुमचें बोलणें. माझें डोकें ठिकाणावर नाहीं. तुम्ही चालते व्हा कसे; नाहीं तर मी काय बोलेन आणि काय करीन याचा नेम नाहीं. तुमचे शब्द मला वि-षासारखे कडू लागतात.

विसाजी—अस्सं ! अस्सं ! अजून तुझा ताठा नाहींसा झाला नाहीं ?

**सुंदरी**—विसाजीराव, हा ताठा वेगळ्या प्रकारचा आहे समजलां? आईबापांच्या घरीं असतां अभिमान मला शोभत नसे, पण आतां अशा गरीब स्थितींत तोच अभिमान मला शोभूं लागला. संपत्तीच्या वेळीं जो दोष असतो तोच विपत्तींत गुण होतो. हें घर माझ्या नवऱ्याचें अर्थात् माझेंच आहे. मी येथील मालकीण. ते कितीही गरीब असले तरी मला ते राजेच आहेत. त्यांनीं माझा विश्वासघात केला तरी तेच माझ्या सौभाग्याचें आगर. ते असतां मला कोणाची पर्वा आहे? वैभव नसलें म्हणून काय झालें? आमचें सुख तर कोणी नेत नाहीं!

**विसाजी**—खूप केली! राणीसाहेब हें तत्वज्ञान मी जाणतों बरें. मी अशानें फसणार नाहीं. अजून तरी डोळे उघड; येथें तुझ्या नवऱ्याच्या घरीं कशी काय स्थिति आहे ती नीट पहा. धड भिंतीसुद्धां नाहींत. छपर तर वाऱ्यानें केव्हां उडून जाईल हेंही सांगतां येत नाहीं. रात्रंदिवस काबाडकष्ट. माझ्या घरीं आलीस तर तेथें तुला किती सुख मिळेल बरें? तूं सांगशील तें तयार! तुझा रंगमहाल असा सजवून देईन कीं तो पाहून राणीला देखील मत्सर उत्पन्न होईल. ऐषआरामांत सारा दिवस तूं गुंग होऊन रहावेंस. या शहरांत अतिशय श्रीमान् व्यापारी मीच आहें; व त्याप्रमाणें अतिशय सुंदर स्त्री तूंच आहेस; असे दोन गुण एके ठिकाणीं मिळाल्यावर आपल्या सुखाची कोण बरोबरी करील!

**सुंदरी**—अरेरे! देवा मी आपल्या आईबापांस सोडून आलें म्हणूनच यांचीं अशीं घाणेरडीं मर्मभेदक भाषणें ऐकून घेणें माझ्या नशिबीं आलेंना? नाहींना तुम्ही गप्प बसत? सासूबाईंना आपण पाठविलें तें याचसाठीं वाटतें? देवा,

मला आतां कुणाचाच आधार नाहीं काय? कां मीं त्यांना दुर्वचनांनीं ताडलें? ते आतां असते तर माझी विटंबना होती का?

( शिवाजीराव हळूच दरवाजा उघडून उंबऱ्यावर उभा राहतो. )

**विसाजी**--छी, छी, असें म्हणूं नको! हा पहा मी तुझी पाहिजे ती इच्छा पूर्ण करण्यास तयार आहे. पण सुंदरी, प्रिये, त्या नीच बागवानानें या अधराला स्पर्श करून तो बाटविण्यापेक्षां मलाच दृढालिंगन देऊन ह्या तुझ्या गुलाबी अधरांचें अमृतपान करावयास दिलेंस तर किती चांगलें वरें?

**सुंदरी**--देवा! देवा! देवा! माझे काम कां नाहीं बधीर झाले? स्त्रियांचें संरक्षण पतीवांचून कोण करणार? अहो प्राणप्रिया धांवा लवकर. आपल्या धर्मपत्नीची अब्रू राखा.

**विसाजी**-ओरड, हवी तेवढी मोठ्यानें ओरड! (खंजीर दाखवितो) हें पाहिलेंस का? कांहीं होवो, आतां मी तुला सोडावयाचा नाहीं. तुझ्या शिव्या बागवानाचा देव जरी आला तरी मी आतां तुजवर जुलूम करण्यास सुद्धां मागें पुढें पहावयाचा नाहीं. हा पहा आतां मी तुला आलिंगन देतों. आतां कोण काय करणार आहे माझें? ( तिला मिठी मारावयास जातो. )

**शिवाजी**--[ पुढें धांवत जाऊन विसाजीरावास लाथेनें एकीकडे उडवून देतो. ] प्रिये, भिऊं नको. मी तुझें रक्षण करण्यास तयार आहे.

**विसाजी**०—( रागानें जवळ येऊन खंजीर उगारून ) अरे मूर्खा! [ दोघांची झटापट सुरू होते. ]

**सुंदरी**—नका, नका, विसाजीराव त्यांना मारूं नका.

माझा पाहिजे तर-[ दोघांमध्यें जाते. हातानें त्यांचें निवारण करण्याच्या बेतांत असतां मूर्च्छित होऊन पडते.]

**शिवाजी**—[ एका हातानें तिला सावरून ] हरामखोरा, आग लाव त्या तोंडाला ! गरीब बायकांवर शस्त्र ! आतां कसा थर थर कांपतोस ? ये आतां माझ्या अंगावर. तुझें शस्त्र कसें काय आहे तें पहातों. सुंदरी, सावध हो, सावध हो. इतकें भि- ण्याचें कारण नाहीं.

**विसाजी**--तुजपाशीं कोणी बोलावें ? या लग्नापासून तुला विपुल सुख मिळेल-पुष्कळ पुष्कळ सुख घेशील ! [ आपल्या- शीं ] याचा सूड घेईन तेव्हांच मी मरेन. [ जातो. ]

**शिवाजी**— ( खालीं बसून, दोन्ही हातांनीं सुंदरीला सावरून धरून ) असो, हिला एकवार मीं आपल्या हातांत कवळून धरावी एवढें तरी माझ्या नशिबीं होतें ! एकदां तरी पुनः मी हिला भेटलों ? पण आतां हिची माझी ही शेवटचीच भेट । हिचें मीं रक्षण करावें त्या मींच हिचा घात करावा काय ? हाय ! हाय ! ह्या सुंदर मस्तकाचा माझ्या छातीस स्पर्श झाल्यामुळें, आतां मला इतकें सुख होतें, पण अतःपर त्याचा स्पर्श माझ्या नशीबीं मुळींच नाहीं ! आतां एक-एकच शेवटचा अगदीं हळूच घेतों-सावध झाल्यास तिला काय वाटेल ! [ चुंबन घेतो ] गरीब बिचारी ! ती डोळ्यांची वीज-ते भ्रूभंग हीं आतां अगदीं नाहींशीं झालीं ! या सुंदर अधराची वक्रता- तो त्यावरचा गुलाब आतां पळून गेला. ती पूर्वीची मान उड- विण्याची ऐट !--पण आणखी एक आणखी एकच [ पुनः चुंबन घेतो. ] अरेरे ! मी तिला जशीच्या तशी निष्कलंक घरीं पाठविणार होतोंना ? किती अविवेकी मीं ! आतां मात्र पापा- चा कळस झाला ! आणि माझ्या निराशेचाही कळस झाला ! अशा रत्नाचा मीं घात केला काय ! अरे हिनें

सुस्कारा टाकिला. ही शुद्धीवर येत चालली. वाहवा! हे पहा, हिचे अवयव हालूं लागले. ही मजकडेच पाहूं लागली. पण आतां ही माझा तिरस्कार करील. आपण दूर व्हावें हें बरें. माझा देह विटाळूं नका असें तिनें मला सांगितलें आहे.

सुंदरीः—( उभी राहून ) सगळेंच नाहींसें झालें. जिकडे तिकडे शांत दिसतें हें काय? सगळेंच स्वप्न कीं काय? जिवाला त्या मेल्यानें इकडे कांहीं अखम तर नाहींना केली?

**शिवाजीः**—मीं त्याचा जीव घेतला नाहीं; तूं इतकी घाबरूं नकोस; तुझें रक्षण करण्याकरितां मीं आपली मानही दिली असती पण माझें दैव कोठें इतकें अनुकूल आहे?

( **शिवाजीची आई** प्रवेश करिते. )

**शि॰ आईः**—शिवाजी, अरे तुला शोधीत मीं फिरावें तरी किती? सर्व ठिकाणीं हिंडलें, तरी तुझा ह्मणून कोठेंच थांग नाहीं. तूं मला निरोप पाठविलास त्याचें कारण काय? आणि येथें केव्हां आलास?

**शिवाजीः**—कोणी निरोप पाठविला? मीं तर मुळींच निरोप पाठविला नाहीं. हां, समजलों. त्या विसाजीचें हें कपट असावें. छे, त्याला तसाच सोडला हें वाईट केलें.

**शि॰ आईः**—खरेंच कीं काय? तर मग त्या मेल्याचेंच हें कपट! पण कांहीं कमी अधिक झालें नाहींना? बरें, शिवाजी, तूं पत्र देऊन मनुष्य पाठविला होतास तो परत आला; तो तुला भेटला का?

**शिवाजीः**—पण आई तो इतक्यांत कसा परत येईल? तुला कोणी तरी खोटें सांगितलें.

**शि॰ आईः**—अरे, खोटें नाहीं. तो खराच परत आला. या मुलीच्या बापाची व त्याची वाटेतच गांठ पडली; तुझें पत्र

याचून दादासाहेब रागानें लाल झाले. ते तसेच इकडे आले असते, पण ह्माळसाबाईला बरोबर आणावें ह्मणून घरीं गेले असें तो बोलला. मला वाटतें ते लवकरच येथें येतील. शिवाजी, आतां तुझी कशी दशा होईल त्याचा कांहीं विचार केलास का? माझे तर आतां पायच कांपूं लागले. मुली, कसें तरी करून माझ्या शिवाजीचें रक्षण आतां तूंच कर. तुला दुःख झालें खरें, पण माझ्या शिवाजीचें तुजवर तसेंच प्रेम होतें बरें.

( सुंदरीच्या जवळ जाते.

सुंदरीः—हें काय बाई असें बोलतां? भिण्याचें मुळींच कारण नाहीं; त्यांच्या अंगास कोण बोट लावणार आहे! पण आतां बाबांना हें तोंड दाखवूं तरी कशी? सर्व लोक आतां माझी छी थू करतील! आईबापांच्या घरीं देखील तोंड दाखवायाला आतां मला जागा नाहींशी झाली. देवा काय ही माझी दशा? ( रागानें ) आपणच अशी माझी दशा केलीत! आपणच मला ठार बुडविलेंत बरें!

शि०—मीही तें कबूल करितों; मजकडून हा अपराध झाला खरा. त्याचें प्रायश्चित्त भोगण्याला मी तयार आहें.

सुं०—( आपल्याशीं ) यांनीं माझी क्षमा मागितली असती तर बरें झालें असतें; मग मी येथेंच सुखानें राहीन. ( उघड ) पण मी आपणांस कधींही क्षमा करावयाची नाहीं.

शि०—मी कोठें मला क्षमा कर ह्मणून ह्मणतों? मला तर क्षमेची आशाच नाहीं.

सुं०—पण मीं आपल्या गळ्यांत माळ घातली आहेना? आपल्यावांचून माझें कसें चालेल याचा कांहीं विचार आहे का? आपल्याला दाही दिशा मोकळ्या आहेतच.

शि०—तूं असें फसून केलेंस; त्यामुळें जरी तूं आपली शपथ मोडलीस तरी तुला पाप लागणार नाहीं.

सुं०—(आपल्याशीं) बोलण्याची तरी कांहीं कमाल आहे! पण पीळ तरी असावा किती? "येथेंच रहा; मी कोठें तुला अंतर देतों आहे?" येवढेच नुस्ते शब्द जरी यांच्या मुखांतून आले तरी देखील—पण ही गाडीच नव्हे का वाजत? बाबा आले वाटतें–(मोठ्यानें) माझे बाबा मला न्यावयाच आले आहेत; अजून तरी आपल्या मनांत मला कांहीं सांगावयाचें आहे का? असल्यास लवकर बोला.

शि०—मी आतां काय बोलूं? बोलायला मार्ग कोठें आहे? मीं तुझा जीव संकटांत घातला होता; पण तूं आतां त्यांतून मुक्त झालीस हें पाहून मला मोठें समाधान झालें. हे पहा, दादासाहेब तुला न्यावयास आले. वाहवा! तुझी आईही आली!

[दादासाहेब, झाळसाबाई व धनाजीराव येतात.]

दादा—सुंदरी, सुंदराताई, ये बेटा. (तिला पोटाशीं धरतो.)

झाळसा—देवा, माझ्या पोरीची गत अशी व्हावी काय? हें घर पाहूनच माझ्या अंगाचा संताप होतो. याला घर म्हणायचेंना? या पोरीची ही दशा पाहून माझा जीव तर अगदीं बावरून गेला. सुंदरे, तुझाच खुळेपणा हा बरें असा फळास आला! दुसऱ्याचें ऐकतीस तर कधींही अशी फसली नसतीस. पण तुझी अशी स्थिति पाहून मला कसें दुःख होतें हें तुला माहीत आहे का?

धनाजी—हः हः हः! करें काय राजाधिराज महाराज? गरीबावर लोभ आहेना? आपणासारख्या गुणी मनुष्यांची अशी स्थिति पाहून मला वाईट वाटतें. आपलें राज्य कोठें

गेलें ? आपली स्वारी आतां लवकरच कारागृहांत राज्य करावयास जाईल, असें माझ्या ध्यानांत येतें.

शि०—चालूं द्या धनाजीराव. ज्यावेळीं तुमच्यापाशीं शस्त्र नव्हतें, त्यावेळीं मीं क्षमा केली; आतां मी शस्त्ररहित आहे, कारण मनुष्यानें अपराध केला ह्मणजे तो विशस्त्रच झाला असें ह्मणायास कांहीं हरकत नाहीं—तेव्हां आपण असें बोलावें हें चुकच आहे. हत्ती चिखलांत रुतला ह्मणजे त्याच्या डोक्यावर बेडकांनीं नाचूं नये तर कोणी नाचावें !

धनाजी—अजून याची ऐट गेली नाहीं. गडी पीळदार खरा !

दादा०—कोठें आहे तो लुच्चा, हरामखोर, पाजी मनुष्य ! तूंच का रे माझ्या पोरीला फसविलेंस ? तूंच का तो गळेकापू ? मजपुढें तोंड दाखवायला लाज नाहीं वाटत चोरा ?

शि०—आपण तिचे वडील आहां, तेव्हां शिक्षा करण्याचा अधिकार आपलाच आहे. माझ्या हातून चुकी झाली खरी.

सुं०—बाबा गोष्ट होऊन चुकली. आतां काय तिचें ? माझ्या नशिबीं होतें तसें झालें. त्यांत इकडे काय बोल ! सारी हकीकत तुह्मीं ऐकिली ह्मणजे त्यांच्यावरचा तुमचा राग कमी होईल. ते जर नसते आणि आपला जीव माझ्याकरितां धोक्यांत न घालते तर या सुंदरीची अब्रू आज राहिली नसती !

झाळसा०—काय बाई पोर वेडी तरी ! अग आतां अब्रू ती काय राहिली ? आमच्या नावलौकिकास यानेंच डाग लाविला, त्याचा आहे कीं नाहीं कांहीं विचार ? हाच लुच्चा कपटी गुलाम ! याच मार्गानें माझ्या पोरीचा घात केला.

ध०—ठीक चाललें आहे. हेच राजश्री काल सर्व गुणांचें

केवळ आगर बनले होते. या जगांत चांगल्याचें वाईट आणि वाईटाचें चांगलें बनण्यास किती थोडें कारण पुरतें.

सुं०—आई, पुरे कर आतां. त्यांचा माझा जन्माचा संबंध झाला. तेच आतां माझें दैवत. माझ्या सौभाग्याचा हाच मुख्य आधार. तूं नको त्यांच्यावर आग पाखडूं. माझ्या सुखाची तुला आवड असेल तर आई त्यांत सुख मानून घे.

म्हाळसा०—सुंदरी, तूंच का ही इतक्यांत असें बोलायला शिकलीस? धन्य बाई तुझी तरी! तुझी अक्कल तर मग फारच वाढली म्हणायची! खचित यानें भुरळ घातली असावी.

दादा०—मी म्हणतों आतां अधिक बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आह्मी तरी कां वेळींच डोळे उघडून पाहिलें नाहीं? तरी लग्नाच्या वेळीं ही घाई मला पसंत नाहीं असें म्हणत होतों! पण तेव्हां तुह्मी हुरळलेल्या—आमचें ऐकतो कोण? असो; तुझेंच मन तुला खातें आहे एवढें पुरे. आतां मी तुला एवढेंच विचारतों. या पत्रांत लिहिल्याप्रमाणें (पत्र पुढें धरून) या मुलीसंबंधीं सर्व हक्क सोडून देण्यास तूं तयार आहेस?

शि०—होय, हाच माझा करार. (एक कागद देतो.) नीट वाचून पहा—मी हक्क सोडून देतों एवढेंच नव्हे—मी आपला सर्व अपराध अक्षरशः कबूल करितों. हें लग्नच मुळीं खोटें. मी जर मुळीं खोटा तर लग्न तरी खरें कसें म्हणतां येईल? मीं कपट करून तुमच्या मुलीचा सर्वस्वी घात केला, हें कबूल करतों. पण तिनें माझ्या घरीं पाय ठेविल्यापासून माझें कसें वर्तन आहे हें तीच तुह्मांस सांगेल. आपण रात्रीं जेव्हां तिचा हात माझ्या हातांत दिला, तेव्हां ती जशी शुद्ध, निष्कलंक कुमारी होती, तशीच अजूनही ती आहे. घ्या तिला पुनः परत. अतःपर मी तुमच्या वाटेस जायचा नाहीं, व आपलें तोंडही

पुनः दाखविणार नाहीं. कोठें तरी दूरदेशीं जाऊन या पापाब- द्दल पश्चात्ताप करण्यांत मी आतां आपलें आयुष्य घालविणार. माझ्या हातून होण्यासारखें होतें तेवढें मीं केलें. बाकीचें ईश्वराच्या हातीं आहे. त्याची मी रात्रंदिवस प्रार्थना करीन. सर्वांनीं या शिवाजीला क्षमा करावी. मी आतां जातों.

शि० आई.--शिवाजी, अरे पण मला देखील तूं सोडून जाणार कीं काय? मी तरी तुला एकट्यालाच संकटांत सोडून गेलें नाहींना! अरे बायकोवरचा हक्क सोडशील, पण आईवरचा देखील हक्क तुला कसा सोडतां येईल? आईच्या ऋणांतून बाबा कसा सुटशील?

सुं०—आणि पण मीही विचारतें, आपण जरी बायकोला सोडून यायास तयार झालां, तरी आपल्या पायांवाचून मला कोठें गत्यंतर आहे? मी तर आतां येथून हलायची नाहीं. माझ्या नशीबीं असेल तसें होईल. तें तर कधीं चुकणार नाहीं. या कुडींत जीव आहे तोंपर्यंत मी हा पदर सोडणार नाहीं. जिकडे आपण तिकडे मी. (शिवाजीचा पदर धरते.)

म्हाळसा०--सुंदरे, तुझेंच का हें भाषण? ये इकडे, वेडी चावट पोर कोठची! अग नवरा कोठला? आतांच नाहीं का त्यानें सांगितलें लग्न खोटें म्हणून? फिर मागें, नाहीं तर अतः- पर तुझें तोंड पाहीन तर शपथ.

दादा०--सुंदरे, फिरतेस कीं नाहीं मागें? आईबापांना सोडून भलत्याच्या पाठीस तूं लागतेस याचा काहीं विचार कर. लज्जा वाटते कीं नाहीं? बेशरम.

सुं०—(बापाजवळ परत येऊन) नाहीं नाहीं; बाबा पण मी हात जोडतें-तुम्ही त्यांना क्षमा करा; ही पहा तुमचे पाय

धरितें-कसेंही करून त्यांना एकवेळ क्षमा करा. त्यांना एकदां क्षमा करून आपल्या पदरीं घ्या.

दादा०—नाहीं, तसें कधींही होणार नाहीं. दोहोंतून एक बोल कोणतें तुला कबूल तें? तो पाहिजे असेल तर तिकडे जा, मजकडे येऊं नको—मग त्याचें घर तें तुझेंच घर—जी त्याची स्थिति, तीच तुझी स्थिति. एवढें मात्र ध्यानांत ठेव कीं, तुला तोच पाहिजे असेल तर मग मजपासून एक फुटकी कवडी देखील तुला अगर या लुच्चाला मिळावयाची नाहीं व मी तुमचें मुखावलोकनही करणार नाहीं.

सुं०—तर मग बाबा मी इकडचे पाय सोडून तुमच्या पैशाकरितां तुमच्या घरीं रहायला येऊं? जे आतां सर्वस्वी या देहाचे मालक झाले व जे माझ्या जन्माचे सोबती त्यांनीं आपलें आयुष्य दुःखांत व हालांत काढावें व त्यांच्या सुखदुःखाची जी मी वाटेकरीण तिनें आपल्या बापाच्या पैशावर चैन भोगावी हाच पातिव्रत्यधर्म आपण मला शिकवितां? आग लावा त्या पैशाला! मी आपल्या पतींना सोडावयाची नाहीं. ( शिवाजीरावाकडे वळून ) हे पहा, मी आपलीच झालें बरें! मरेपर्यंत मी या पायांची सेवा करणार. पैसा, मान, मोठेपणा, हीं जरी आपल्यापाशीं नसलीं तरी आपलें मजवर खरें प्रेम तर आहेना? तेवढेंच मला पुरे आहे. मीच आतां आपण सांगाल तें काम करावयास शिकेन, आपल्या जिवाला व मर्जीला जपेन. आपण रागें भरलां तरी आपला राग मी निमूटपणें सहन करीन. हा देह चंदनासारखा झिजवून होईल तेवढें मी आपणांस सुख देण्याचा यत्न करीन व आजपासून पुढें झाल्या गोष्टीबद्दल मी माझ्या प्रियकराला कधीं कधींही दोष द्यावयाची नाहीं. ( शिवाजीचा पदर धरते. )

धनाजी—या पोरीचें सगळेंच विलक्षण! जसा अभिमा-

न तसाच निश्चय! हा शिवाजी तरी मोठा भाग्यवान् ह्मणूनच त्याला हें असें रत्न लाभलें.

शि०—हाय! हाय! आतां मात्र माझ्या दुःखाचा कळस झाला! काय ही स्त्रीहत्या! अशा स्त्रीरत्नाशीं मीं असें अतिनीच वर्तन करावें काय? देवा, काय हे हिचे गुण! काय हा निश्चय! पण जाऊंद्या. हे विचार आतां काय उपयोगी? अरे चांडाळा शिवाजी! अगोदरच याचा विचार केला असतास तर अविवेकः परमापदां फलं! या मोहांत आतां पडून उपयोगी नाहीं. झाला निश्चय! महाराज, भिऊं नका; तिच्या सुखाच्या आड मी कधीं येणार नाहीं. अजून माझ्या मनांत थोडीशी तरी दया वास करिते आहे. मजपेक्षां जर कोणी तुमच्या मुलीवर अधिक प्रेम करण्यास तयार असेल तर त्याला आपण हिला खुशाल द्यावें! (सुंदरीकडे पाहून) सुंदरी, सोड तूं मला आतां. जा आपल्या बापाकडे. संपला तुझा माझा संबंध! काय हें पातिव्रत्य! किती सरळ हा हिचा स्वभाव! खरोखरींच मी कपाळकरंटा! अरे पण मी पुनः लागलों लोभांत पडायला. असो; हिचें चिंतन करून मी पुनः सद्वर्तनास लागेन व नांवलौकिक मिळवीन. सुंदरी, जा तूं आतां. नको अशी मला चिकटूं. तुझें मन कांहीं वेळानें फिरेल आणि तुला यावेळच्या तुझ्या भाषणाचा पश्चात्ताप होईल. नको माझ्या देहाच्या स्पर्शानें आपला पवित्र देह विटाळूं. मी नुसता गरीबच असतों तर चालतें. पण माझें कर्म कोठें चांगलें आहे? तुझा नवरा दुराचरणी तरी नसावा, तुला पाहून त्याला लाज तरी वाटूं नये, किंवा तुझें नांव ऐकतांच आपल्या दुराचरणाबद्दल त्यास खेद होऊं नये, असा मी आहें काय?

सुं०—(दुःखानें) माझें आपण काय पाहिजे तें करावें!

आपली ही वटीक आहे. मला बोलायचें होतें तेवढें मीं बोललें.

( तो तिला तिच्या बापाच्या जवळ नेऊन देतो. )

ध०—( जवळ जातो व एकीकडे शिवाजीस ) शिवाजी-राव, तूं मोठा शहाणा हुशार आहेस—हा तुजवर आलेला प्रसंग पाहून माझें मन फार कळवळतें ! यावेळीं जास्त बोलण्याची सवड नाहीं. तुला इतकेंच सांगतों जर तूं लष्करांत नोकरी धरलीस तर तूं मोठाच नांवलौकिक मिळवशील. पहा, पाहिजे असेल तर मी आपल्याच पलटणींत तुला चाकरी देतों. आजच मला पत्र आलें; आमच्या सेनापतीची स्वारी ताळीनेरकडे गेली आहे, तेथें जाऊन त्यांस मिळावें ह्मणून मला हुकूम झाल्यामुळें मी आजच संध्याकाळीं निघणार आहें; मर्जी असेल तर चल मजबरोबर.

शि०—( म्हातारीच्या पायां पडतो ). आई, आतां मी येतों—मी गेलें तरी तूं कांहीं काळजी करूं नकोस. परत येऊन तुला भेटल्यावांचून कधीं रहाणार नाहीं. पण अशा स्थितींत परत येईन असें मात्र समजूं नको. माझ्या पराक्रमानें राजाच्या नांवलौकिकापेक्षांही माझा अधिक मोठा नांवलौकिक होईल तेव्हांच मी तुला पुनः येऊन भेटेन. सुंदरी, मी तुजवर कसें प्रेम करितों हें तुला माहीतच आहे व त्यामुळेंच मीं तुला दिलेलें दुःखही तूं पहातेस. मी मात्र मरेपर्यंत तुझेंच स्मरण करीन. मी तुला तर मोकळी केलीच; तुझ्या इच्छेस येईल तेव्हां मागील सर्व विसरून जाऊन योग्य पती वर. शौर्यानें, प्रतापानें, परोपकारानें माझ्या पापाचें क्षालन करण्यास मी आजपासून लागणार. माझ्याविषयींचा आपल्या मनांतील राग काढून टाक, मनांत दया धर, व ईश्वरानें माझ्या मनांतील निश्चय तडीस नेण्याच्या कामीं साहाय्य करावें अशी त्याची कधीं कधीं प्रार्थना करीत जा. पुनः मी येईन तेव्हां तूं जर-

छे: छे: छे: मी पुनः लागलों भकायला. येतों आतां रामराम! (आईच्या पायांवर डोकें ठेवून जातो.)

सुं०—(दचकून इकडे तिकडे पाहून) हाय हाय! गेले काहो? शेवटीं त्यांना जाऊं नका असें ह्मणायला देखील त्यांनीं मला अवकाश दिला नाहीं. हा पैसा बरें! हा तुमचा पैसा माझ्या सुखांत अंतर पाहायला कारण झाला. आई अंबाबाई, तूंच आतां घे या हतभागी दीन दासीला आपल्या पोटांत. [ मूर्च्छित होऊन पडते. ]

[ सर्व जातात. ]

# अंक ५ वा.

## प्रवेश १ ला.

### स्थळः—लवणपुरांतील राजमार्ग.

तीन लष्करी अधिकारी प्रवेश करितात.

**पहिला अधिकारी**—आज धनाजीराव कोठें दिसले नाहींत?

**दुसरा अधि०**—मला वाटतें ते आपल्या बहिणीला भेटायला गेले असावे; त्यांची बहीण याच गांवांत दिलेली आहे.

**तिसरा अधि०**—आमचे धनाजीराव मोठे शूर खरे; पण त्या प्रतापसिंगापुढें त्यांचें तेज कांहीं पडत नाहीं.

**दुसरा अ०**—प्रतापसिंग ह्मणजे एक अजब चीज आहे. तो कोठून आला, कसा आला, तें कांहीं कळत नाहीं. पण

दोन अडीच वर्षे नोकरी झाली नाहीं, तोंच दुय्यम सेनापति होऊन बसला, आणि खरेंच झाला ह्मणून काहीं वाईट वाटायला नको. त्याच्या अंगीं मर्दुमकीचे तसेच गुण आहेत.

[ धनाजीराव येतो. ]

**धनाजी**--(वरील अधिकाऱ्यांचे रामराम घेऊन) राम राम! कसें काय? काहीं नवीन खबर? मला वाटतें हें शहर रमणीय असल्यामुळें येथें काहीं दिवस मुक्काम करावा. कायहो म्हातारपणांत आमच्यासारख्यास तरी एक प्रकारचें सुख असतें. आपण आपल्या देशाकरितां देह झिजविला व देशाचें सुयश आपल्या निस्सीम देशभक्तीचें फळ आहे. हा विचार मनांत येऊन मोठें समाधान वाटतें. आपण आपल्या देशाच्या उत्कर्षास थोडाबहुत हात लावला असें ह्मणण्याचा ज्याला अधिकार आहे तो खरोखरीच धन्य! बरें, पण आज 'प्रतापसिंग कोठें आहे?

**पहिला अ०**--त्याचीच आतां गोष्ट निघाली होती.

**दुसरा अ०**—धनाजीराव, हा प्रतापसिंग कोठला कोण हें धडपणें कांहींच कळत नाहीं. आपणांस तरी याची कांहीं खरी माहिती?

**धनाजी०**--खरी माहिती आणखी काय पाहिजे? आमच्या सैन्यांत तोच दुय्यम सेनापति आहे!

**दुसरा अ०**--तें आहे हो ठाऊक! माझी अशीच थट्टा करूं नका. पण सेनापति होण्यापूर्वी तो कोण होता हेंच मला पाहिजे.

**धनाजी०**—इतकेंही तुला कळत नाहीं? अरे, अगदीं लहान होता तेव्हां पाळण्यांत रडणारें पोर होता.

**पहिला अ०**--वाः काय सरळ उत्तर!

**दुसरा अ०**--( तिसऱ्या अधिकाऱ्यास ) त्याच्या मनांत

सांगावयाचेंच नाहीं; मग उगाच कंठशोप कशाला ? ( धनाजीरावास ) बरें घेतों आतां आपली रजा !

धनाजी०—रामराम !

[दुसरा व तिसरा अधिकारी जातात.]

धनाजी०--तुह्मां लोकांना दुसऱ्याच्या गोष्टी बोलून काय करायचें आहे! अलीकडे पहातोंतर ज्याच्या त्याच्या तोंडीं प्रतापसिंगाच्या गोष्टी. असें त्यानें काय तुमचें घोडें मारिलें ?

पाहिला अ०--त्यानें आमचे घोडें मारिलें नाहीं; पण तो कधीं कोणाशीं बोलत नाहीं व आमच्या मंडळींतही येत नाहीं. तो एकसारखा विचारांत निमग्न झालेला असून फार कष्टी दिसतो याचें कारण काय असावें, अशाविषयीं आमचे तर्क चालले होते. जसा शूर तसाच प्रामाणिक असून अधिकारही त्याला गुणाप्रमाणें मिळाला आहे. शिवाय आमच्या मुख्य सेनापतीची तर त्यावर पूर्ण मेहेरबानी आहे. जो तो त्याचीच तारीफ करीत असतो. त्याच्याविषयीं आमच्या मनांत हेवा तर बिलकुल नाहीं. तोच आह्मांला दूर दूर करतो. त्याचा स्नेह संपादण्याला आह्मीं तर एका पायावर तयार आहों. त्याच्या जिवाला कांहीं तरी हृद्रोग आहे खचित.

धनाजी--ज्याअर्थीं तुह्मा त्याची फारच कळकळ आहे असें दिसतें त्याअर्थीं तुला एक गुप्त गोष्ट सांगतों.—हा आपला प्रतापसिंग आपल्या प्रियेला भेटण्यास येथें आला आहे.

पहि० अधि०--काय ह्मणतां ? प्रियेला भेटण्याकरितां ?

धनाजी--हो, तिलाच भेटण्याकरितां; तिचें आपणावरचें प्रेम कायम आहे किंवा नाहीं हें पहाण्याकरितां तो आला आहे. काल येथें येऊन पोंचला मात्र तोंच घोड्यावरून उतरून या गांवांत अमुक गृहस्थ कोठें राहतात असें ज्याला त्याला विचारीत गांवभर फिरत होता.

पाहि॰अधि॰--ईश्वर त्याला यश देवो. धनाजीराव आपला प्रतापसिंग तरी एक रत्न आहे बरें! काय त्याचें तें शौर्य! काय त्याचा एक एक गुण! त्याची स्तुति करावी तेवढी थोडीच! मला वाटतें यानें पुनः लग्न करण्याचें मनांत आणिलें तर मी मी ह्मणणारे मोठमोठाले राजेरजवाडे सुद्धां आपल्या मुली यास देण्यास तयार होतील.

धनाजी--त्यांत काय संशय! पण येथें तसें नाहीं. त्याची बायको व तिचे आईबाप यांच्या अंगीं ताठा पण किती भरला आहे! पण आतां तूं आपल्या कामास जा; प्रतापसिंग जर इतक्यांत तुला कोठें भेटला तर मी तंबूत बसलों आहें असें त्यास सांग, व तिकडे पाठवून दे.

पाहि॰ अधि॰--बरें भेटला तर सांगतों. [ जातो. ]

धनाजी--अगोदर दादासाहेबांकडे जाऊन तेथें कशी काय स्थिति आहे तें पाहूं या, आणि तेथील सर्व वर्तमान प्रतापसिंगास येऊन सांगूं. हा प्रतापसिंग मला फारच आवडतो. याचें सर्वच कांहीं विलक्षण! काय चमत्कार! दोन वर्षांत सेनापति झाला! अरे, पण हा विसाजीराव इकडे कोठें येत आहे? स्वारी रंगांत दिसते; तेव्हां चिन्ह कांहीं नीट दिसत नाहीं. पण मला पहातांच हा असा थबकला कां?

[ विसाजीराव येतो. ]

कसें काय विसाजीराव, इकडे कोणीकडे आज आपली स्वारी? आणि चेहेऱ्यावरून कांहीं लटाचें संधान दिसतें आहे.

विसाजीः--( आपल्याशीं ) धनाजीराव, अरेरे फार वाईट झालें! लूट मिळवून जर हा गबर होऊन आला असला तर मात्र माझी फजिती. माझा कार्यभाग सिद्धीस जाण्याच्या वेळींच हा कदाचित्--कां, धनाजीराव, आपण केव्हां आलां?

**धनाजीः**—मी काल आलों. कायहो, त्या दादासाहेबांकडील प्रकरणाचें कसें काय झालें ? त्यांची तुमची पुनः गोडी-गुलाबी सुरू झालीच असेल. विसाजीराव त्या बागवानाच्या सटल्यांत तुमचें देखील बरेंच अंग होतें; खोटें बोलूं नका.

**विसाजीः**—माझें अंग होतें खरें, पण तुह्मी ह्मणतां इतकें कांहीं नव्हतें. त्याच लुच्चानें मला फसविलें. पण आतां नाहीं मी कोणाची डाळ शिजूं देत. आतां मीच तिला मिळविणार बरें धनाजीराव ! पण कायहो, त्या लुच्चानें काळें तोंड केलें तें केलेंच. आतां त्याची कुठें कांहीं बातमी लागत नाहीं. मला वाटलें होतें कीं त्यानें लष्करांत चाकरी धरली असावी; कारण तुमचा त्याचा बराच स्नेह दिसत होता; पण लष्करांत देखील कोणाला त्याचें नांव माहीत नाहीं.

**धनाजीः**—गेला असेल कोठें तरी काळें तोंड घेऊन; भिकार बागवानाच्या पोराची मला कशाला पंचाईत पाहिजे ? शिवाजी बागवान ! मला देखील आमच्या सैन्यांत हें नांव ऐकल्याचें स्मरत नाहीं.

**विसाजीः**—धनाजीराव, तुमचें लग्न होऊन बरींच वर्षें झालीं असतील ?

**धनाजीः**—माझें लग्न ! माझें लग्न झालें असेल असें तुह्मांस माझ्या तोंडावरून वाटतें काय ?

**विसाजीः**—तें मला कसें कळावें ?

**धनाजीः**—कळत नसेल तर मी सांगतों-माझें लग्न झालें नाहीं व मी लग्न करीत नाहीं. माझा धंदा काय तो तुह्माला माहीत नाहीं ? जे लग्न करितात त्यांना मारून मी त्यांच्या बायकांस विधवा करीत असतों.

**विसाजी**:--पण या लढाईत तुह्मीं बराच हात मारिला असेल? पैसा मिळवून सुंदरीचीच धन करणार कीं नाहीं?

**धनाजी**:--हो, पैसा असेल तर मी तिला देईन; पण मजजवळ मुळींच नसेल तर?

**विसाजी**:--(आपल्याशीं) आतां कांहीं हरकत नाहीं हा आला तरी! (उघड) तुमच्याजवळ पैसा नाहीं. लोक तर असें ह्मणतात कीं **तालीनेर** ह्मणजे दुसरी लंका.

**धनाजी**:—नसेंही असेल. पण मला तर कांहीं लाभ झाला नाहीं. आमच्या प्रतापसिंगानें बरेच पैसे जमविले आहेत; पण त्यावर आमच्या सेनापतीचा किती लोभ! तसा मजवर सुद्धां नाहीं. शिवाय त्याचा खर्च फार थोडा व काटकसर फार. मजसारखा तो उधळ्या असता तर त्यापाशीं एक दमडीसुद्धां शिल्लक पडली नसती.

**विसाजी**:--पण मला कोठें पैशाची उणीव आहे? मला सुंदरी मिळाली ह्मणजे पुरे आहे; पैसा घेऊन काय करायचा? धनाजीराव, तुमची भाची शेवटीं मलाच मिळणार. दादासाहेब व ह्माळसाबाई यांनीं मला वचन दिलें आहे व सुंदरीकडूनही आतां ना नाहीं.

**धनाजी**:--काय, तुह्मांसच देण्याचें वचन दिलें आहे? पण पहिल्या नवऱ्याची काय वाट? तें लग्न तर अजून रद्द झालें नाहीं?

**विसाजी**:—तें खरें. पण तुह्मांला नाहीं का माहीत? तो बागवान ज्या दिवशीं येथून आपलें काळें तोंड घेऊन गेला त्या दिवशीं खुद्द त्यानेंच चारचौघांसमक्ष-झालेलें लग्न खोटें, आपला सुंदरीवर कांहीं हक्क नाहीं, तिनें खुशाल दुसरा नवरा करावा, असें स्पष्ट कबूल केलें. इतकेंच नाहीं, तर तशा अर्थाचें त्यानें स्वदस्तुरचें पत्र दादासाहेबांच्या नांवें पाठविलें

होतें; आणि शिवाय तसें नसलें तरी त्याचा आहे कोठें पत्ता? कोठें तरी लढाईत गेला असावा मरून; आणि जिवंत असला तरी काय फिकीर आहे? येथें परत येण्याची त्याची छाती नाहीं.

**धनाजीः**—हो हो; तें तर खरेंच. पण सुंदरी या गोष्टी-ला कबूल झाली ह्मणतां? (आपल्याशीं) अरेरेरे! आतां त्या प्रतापसिंह शिवाजीला काय जाऊन सांगूं?

**विसाजीः**—अहो, आतां मला बोलायला फुरसत नाहीं. पाहिल्यावर खातरी होईल. (जाऊं लागतो.)

[चिंताग्रस्त **दादासाहेब** येतात.]

**दादाः**—विसाजीराव, तुह्मीं तिकडे येणार होतां ते कां आला नाहीं बरें? असो, पण आतां तरी बरी गांठ पडली. चला तर आतां आमच्या घरीं. अरे, हे धनाजीराव केव्हां आले? बरें तर तुह्मी व्हा पुढें. मी यांच्याशीं कांहीं बोलून येतों. उगीच उशीर नको. (**विसाजी** जातो.) (आपल्याशीं) देवा, काय हा प्रसंग! यापेक्षां मरण बरें!

**धनाजीः**—(दादासाहेबांस) कसें काय दादासाहेब, सर्व खुशरूप?

**दादा॰**—तुह्मीं केव्हां आलां? वाहवा, फार चांगलें झालें. तुह्मीं आलां हें पाहून आमच्या घरीं मोठा आनंद होईल. (आपल्याशीं) याचा कांहीं उपयोग होईल का? पण हे तिचे भाऊ. यांची मदत घेणें ह्मणजे प्राण गेलाच.

**धनाजीः**—पण मी आतांच कांहीं बातमी ऐकिली, ती खरी कीं काय? तुम्ही ह्मणे आपली मुलगी विसाजीरावास देण्याचें वचन दिलें आहे?

**दादाः**—(कचरत) हो, तसा कांहीं विचार आहे खरा.

(आपल्याशीं) सांगूं का यांना सगळें? लपवून ठेवण्यांत तरी काय अर्थ आहे? कुंभाराची सून कधींना कधीं उकीरड्यावर येणारच. झाला तर उपयोग होईल आणि नुकसान कांहीं नाहीं. सांगावेंच. (उघड) विसाजीराव मोठ्या कुलीन घराण्यांतील असून त्यापाशीं पैसाही विपुल आहे, ह्मणून त्यालाच सुंदरी द्यावी असा विचार केला आहे. पूर्वीचे दिवस आतां नाहींत. अलीकडे व्यापारधंदा अगदीं बंद पडला आहे. अशा स्थितींत हेंच स्थळ बरें.

धनाजी:—काय, दादासाहेब, आपणच का बोलतां हें? अहो तिचें त्या बागवानाशीं ना लग्न झालें?

दादा:—कसचें हो लग्न! तो सारा लुटपुटीचा प्रकार! विसाजीरावानें त्याबद्दलची सारी चौकशी केली आहे. कोठला महाराज आणि काय? सारेंच ढोंग! आणि शिवाय त्याचा ना पत्ता ना मागमूस.

धनाजी:—तेंही खरेंच. गरीब बापडा आतां कोठें असेल कोण जाणें?

दादा:—आतां त्या लुच्चाचें नांव सुद्धां मजजवळ काढूं नका. गुलामानें काळें तोंड केलें येवढें मात्र चांगलें केलें; मरून गेला असला तरी एका अर्थानें तें बरेंच.

धनाजी:—असें कां ह्मणतां दादासाहेब? कसेंही झालें तरी तो सुंदरीचा खरा नवरा आहे, आणि हा विसाजीरावही त्या कपटांत सामील असावा. इतकेंच नाहीं तर त्या कृत्यांतील हा मुख्य नाईक होता, असा माझा वहीम आहे. पहा बोवा आपला विचार! पण जर तुमचा निश्चय ठरलाच आहे तर अधिक बोलून तरी काय उपयोग?

दादाः—त्याकरितांच आज दोन प्रहरीं एक वाजतां आमच्या येथें कांहीं मंडळी जमणार आहे. कांहीं संभावित गृहस्थांच्या साक्षीही पाहिजे आहेत. अडचण नसेल तर तुह्मीही या. काय सागूं तुह्मांला? गत गोष्टीबद्दल आतां विचार करायला सवडच राहिली नाहीं. अवश्य या बरें.

धनाजीः—मी येऊन काय उपयोग? आपल्याच्यानें हा प्रकार बघवणार नाहीं. तरी पण—येईन. सुंदरीसाठीं येवढें दुःख सोसायला तयार झालेंच पाहिजे.

दादाः—तेव्हां पुनः भेट होईलच. [दादासाहेब जातात.]

धनाजीः—अरेरे! आतां त्या शिवाजीचें काय होईल? पुरुष स्त्रीलंपट झाला ह्मणजे सरड्याप्रमाणें त्याची स्थिति होते; वायूचें भक्षण! वायु देईल तसतसे त्याचे रंग, वायूच त्याचें जीवित, वायूच्या स्थितीप्रमाणेंच त्याचीही स्थिति! वायूप्रमाणेंच पुष्ट किंवा कृश, तीव्र किंवा मंद, त्याची आशा किंवा निराशा, सुख किंवा दुःख सर्व वायूवर; उत्तर किंवा दक्षिण, पूर्व किंवा पश्चिम, ज्या ज्या दिशेस जसजशी वायूची गति, तसतशी त्याची स्थिति. दिवसभर नुसत्या श्वासोच्छ्वासरूपी वायूशिवाय त्याला कोणाची संगत, कोणता व्यापार, कोणता विचार नकोशीं होतात. स्त्रियांनों, काय हें तुमचें चापल्य, काय हें तुमचें चांचल्य, तुमच्या गुणांनीं पुरुषांची अशी दशा होते; कांहीं थोडासा तरी विचार करा, कांहीं तरी शाश्वती, कांहीं तरी स्थैर्य धरा, पुरुषाची अशी प्रतारणा करणें तुह्मांस योग्य नाहीं, तुमच्या या वर्तनानें त्यास किती दुःख होतें त्याचा तरी कांहीं विचार कराल! या तुमच्याच रुसीनें त्यावर संकटाचे पर्वत कोसळतात, ते अपार दुःखसागरांत बुडून जातात त्याचा तरी कांहीं विचार! अरे पण हा इकडेच येतो आहे. याला ही गोष्ट कशी कळवावी?

[ शिवाजीराव चिंतायुक्त व उतावळ्या मुद्रेनें येतो. ]

शिवाजी, मी आतां तुला काय सांगूं ?

**शिवाजीः**—कां बरें असा प्रश्न ? सचिंत यावरून कांहीं तरी अशुभ वर्तमान असावें. झालाच माझ्या नशीबाचा निकाल तर मग ?

**धनाजीः**—अरे वेड्या, असें नामर्दासारखें काय बोलतोस ! निकाल कसचा त्यांत ? अजून काय झालें आहे ? ती जोंपर्यंत दुसऱ्याची झाली नाहीं तोंपर्यंत आशेला जागा आहेच, आणि ती नाहीं तर तिच्या दुप्पट सुंदर मुली या पृथ्वीच्या पाठीवर थोड्या आहेत कीं काय ?

**शिवाजीः**—असोत किंवा नसोत, माझी सुंदरी तर मला सोडून गेली! आतां या जगांत राहून तरी मला काय करावयाचें? जी माझें त्रिभुवन, माझी सुखाची खाणी, माझ्या प्राणाचा विसावा, तीच मला सोडून गेली ! माझी सुंदरी मला प्राणापेक्षा अधिक प्रिय, तिनेंच माझा त्याग केला, जिचें रात्रंदिवस मी ध्यान करीत असें व माझे सर्व मनोरथ जीवर अवलंबून होते, तीच माझी सुंदरी माझा त्याग करून दुसऱ्या पुरुषास वश झाली काय ? आतां मला कसचें सुख !

**धनाजीः**—अरे, अजून तुला सुख मिळेल. निराश होऊं नकोस.

**शिवाजीः**—नका आतां सुखाचें नाव काढूं. आतां मला शेवटचें सुख–मरण ! जळीं, काष्टीं, पाषाणीं मला माझ्या सुंदरीची मूर्ती दिसत होती, पण आतां ती लुप्त झाली. आतां जिकडे तिकडे मृत्यूवाचून दुसरें कांहींच दिसत नाहीं ! ( विचार करून ) पण हें झालें कसें ? तिला कोणी फसविलें तर नसेल ? मी ज्या वेळीं येथून जायला निघालों त्यावेळची तिची स्थि-

ति डोळ्यांपुढें आली ह्मणजे असें होणें असंभवनीय वाटतें. पण बायका या चंचल असावयाच्याच. त्यावेळचा तो पातिव्रत्याचा उमाळा गेल्यावर माझ्याशीं सारा जन्म दारिद्र्यांत घालवावा लागेल हें आठवून तिचें मन फिरलें असेल. पण माझ्या सुंदरीचें मन फिरेल ? छेः, लोकांच्या सांगण्यावर माझ्यानें नाहीं विश्वास ठेववत. लोकांमध्यें भलतीसलती खोटी बातमी पसरण्यास कांहींच उशीर लागत नाहीं. माझी प्रिया माझा त्याग करील ! छीः छीः ! हें अगदीं खोटें. उगीच उतावीळपणें मी तिला दूषण देत आहें. धनाजीराव ही बातमी आपण कोठें ऐकिली ?

**धनाजीः**—अरे, बातमी कसची ? पुरें ऐकून तर घेशील. हें पहा, विसाजीरावानें दादासाहेबांना नानाप्रकारच्या थापा मारून सुंदरीचें तुझ्याशीं झालेलें लग्न खोटें असें त्यांच्या मनांत भरविलें आहे व तिच्याशीं स्वतः लग्न लावण्याचें बोलणें त्यानें चालविलें आहे. आज दुपारून काय तो निश्चय व्हायचा आहे; तेव्हां इतक्यांतच हातपाय गाळण्याचें कांहीं कारण दिसत नाहीं. तुझा वैरी विसाजीराव व तुझ्या सुंदरीचा बाप दादासाहेब हे दोघेही मला आतांच भेटले व त्यांनींच मला असें सांगितलें.

**शिवाजीः**—पण ती या घाटाला कबूल आहे का ? माझें तिजवर कसें प्रेम आहे हें तिला ठाऊक नसावें काय ? रात्र झाली ह्मणजे मी आपल्या सुंदरीचें चिंतन करीत असें. तीच माझें ब्रह्म, तिच्या चिंतनाच्या ब्रह्मानंदांत मग्न झालों ह्मणजे स्वप्नरूप अंतर्ज्ञान प्राप्त होऊन माझी सुंदरी, माझ्या सुंदरीचें मजवर असलेलें प्रेम हींच मला दिसत होतीं ! अशी सुखाची रात्र आतां पुनः कधींही येणार नाहींना ? आतां दुःख—एकसारखें दुःख !

**धनाजीः**—अरे शिवाजीराव, असें काय वेड्यासारखें करतोस तूं ? पुरुष असून एखाद्या भित्र्या पोरीप्रमाणें रडत बसावें हें तुला योग्य आहे का ? ती या गोष्टीला कबूल आहे कीं नाहीं हें पहायचें आहे. तूं आलेला तिनें पाहिला म्हणजे सगळाच बेत ढासळणार नाहीं कशावरून !

**शिवाजीः**—तिच्या अनुकूलतेशिवाय असा विचार तरी कसा निघाला असेल ?

**धनाजीः**—मला नाहीं तसें वाटत. दादासाहेबांच्या बोलण्यावरून आणि दुःखी चेहेऱ्यावरून हा काहीं खुषीचा सवदा दिसत नाहीं. अरे तीच हतभाग्य ! तुजसारखा नवरा मिळून देखील तो राखण्याचें तिच्या नशिबींच नाहीं !

**शिवाजीः**—धनाजीराव तुम्ही चुकतां. तिच्याकडे काय दोष ? मींच तिचा विश्वासघात केला, व तिला सोडून गेलों ! मग तिनें तरी मजवर असें प्रेम कां करावें बरें ! तथापि तिनें इतके दिवस तरी लोटले; अजून देखील मी तिला भेटलों नाहीं; मग मजवर तिचा विश्वास कसा असावा बरें ? हाय हाय ! मी आपल्या सुंदरीला आज भेटेन, उद्यां भेटेन असें, करितां करितां अडीच वर्षें गेलीं. शेवटीं तिला भेटण्याकरितां म्हणून मी येथें आलों तोंच हा प्रसंग ! धनाजीराव, माझी प्रिया मला एकवार तरी भेटेल काय ? एकदांच जरी तिचें दर्शन झालें, तरी मला मोठें सुख होईल ! पाहिजे तर गुप्त वेषानें मी तिचें दर्शन घेईन, परंतु एकदां तरी ती मला दिसती तर बरें झालें असतें. माझ्या प्रियेचें तें मधुर भाषण मी एकदां तरी ऐकेन काय ? माझ्या सुंदरीचें तें चंद्रास लाजविणारें मुख, तें रतीस लाजविणारें रूप मी एकदां तरी पाहीन काय !

**धनाजीः**—हें मात्र ठीक विचारलेंस. मी तुला सांगतों, अ-

काय होणार? चला, मी तिकडे येण्यास तयार आहें. नशिबीं असेल तसें होईल; माझी ईश्वरास काळजी, त्यावरच माझा सर्व भार.

धनाजीः—काळजीनें याची सर्व चर्या फिरून गेली! चितेपेक्षां चिन्ता अधिक असह्य ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. चल, शिवाजीराव, धर आणखी थोडेंसें धैर्य. कर आणखी एक वेळ प्रयत्न; घे आणखी एक वेळ तिची भेट. पुढचें पुढें!

शिवाजीः—आतां ही शेवटचीच भेट! तिला पाहून माझी काय स्थिति होईल तें सांगतां येत नाहीं.

धनाजीः—होणार काय? जाऊं दे, त्याचा विचारच नको. माझ्या होऱ्यांत येतें आहे कीं तुझी तपश्चर्या सुफळ होणार. येवढ्या दुःखाचा शेवट सुखकारकच होणार. आज तिकडे जातांना बरोबर बिसाजीरावाचा सोबती गुणाजीराव याला नेलाच पाहिजे. तसेंच बिसाजीचें तुला अगदीं आरंभीं आलेलें पत्रही बरोबर असूं दे. तें नीट ठेविलें आहे असें तूं मजजवळ बोलला होतास.

शिवाजीः—खरेंच, तुह्मी ह्मणतां अशा तयारीनें गेलें पाहिजे खरें. सुंदरीनें त्याला पतकरिलें तरी तो किती किमतीचा मनुष्य आहे हें तिला कळविलेंच पाहिजे. देवा, पहा तुला या दीनाची करुणा आली तर!

[ जातात. ]

---

## प्रवेश २ रा.

### स्थळ—दादासाहेबांच्या घरांतील दिवाणखाना.

( सुंदरी चिंताक्रांत बसलेली आहे. )

सुंदरीः—तर मग आतां मजवर अशाच प्रसंग येणार! आ-

खेरपर्यंत प्रयत्न ह्मणून सोडूं नये. ती जोंपर्यंत त्याची झाली नाहीं तोंपर्यंत प्रयत्न करून पाहण्यास अवकाश आहेच. तूं मजबरोबर तेथपर्यंत चल. तुला कोणी ओळखणार नाहीं. हा लष्करी पोषाख, हे तुझे कल्ले, ही तुझी दाढी, हा सूर्याच्या तापानें व श्रमानें आलेला तोंडावरील काळवट वर्ण, दुःखानें हे खोल गेलेले पण मर्दुमकीच्या कृत्यांनीं कठोर झालेले डोळे, यामुळें कोणाला कांहींही संशय येणार नाहीं. शिवाय तुझें नांवही बदललेलें आहे, व तूं येथें नाहींस अशीच सर्वांची खात्री आहे; ह्मणून जरी तूं तेथें आलास तरी कोणासही संशय येणार नाहीं. खरेंच तूंच मजबरोबर तिकडे आलास तर फार चांगलें होईल. अजून देखील कांहीं आशा असण्याचा संभव आहे; अजून देखील तुझी सुंदरी तुला मिळेल; ती लहान आहे यामुळें तिच्या आईबापांनीं तिला दुसऱ्यास देण्याचा निश्चय करून, मारूनमुटकून तिला कबूल केलें असलें तर ती तरी काय करणार? ह्मणून ह्मणतों तूंच तेथें आलास तर फार चांगलें होईल.

शिवाजीः—तेथें जाऊन तिनें दुसऱ्याला आपलें शरीर अर्पण करतांना पाहिलें ह्मणजे माझी छाती अगदीं खचून जाईल; माझ्यानें तें सहन होणार नाहीं. हे पहा, त्याची आठवण झाली कीं डोळे भरून येतात.

धनाजीः—शिवाजीराव, तुजसारख्या शूर शिपायानें असें रडत बसावें, हें अगदीं लाजिरवाणें! आजपर्यंत तूं लढाईत किती लोकांचे जीव घेतले आहेस! त्या लोकांना आपल्या प्रियांस सोडून जाण्याचें किती दुःख झालें असेल त्याची तरी कांहीं कल्पना कर.

शिवाजीः—झालें तें झालेंच. आतां त्याचा विचार करून

ईबाप पाहिजे असतील तर ज्यांना मीं आपलें सर्वस्व अर्पण केलें, त्यांची आशा सोडावी किंवा तेच मला पाहिजे असतील तर आईबापांची आशा सोडावी. हाय ! हाय ! देवा माझे पती यावेळेस कोठें असतील ? माझे प्रियकर, माझे प्राणनाथ, ज्यांचें मी रात्रंदिवस चिंतन करीत असतें ते अशा प्रसंगीं जवळ असूं नयेत काय ? प्रियकरा, पूर्वी जेव्हां भयंकर प्रसंग मजवर आला त्यावेळीं तुमचें नांव घेतांच माझें रक्षण करण्यास तुह्मीं एकाएकीं तयार झालां, पण आतां माझी दया येत नाहींना ? इतके दिवस आपलें भजन एकाभावानें करीत असून आज मला आपल्या व्रताचा भंग करण्याचा प्रसंग यावा व मजपेक्षां अधिक प्रेम करणारी स्त्री आपल्याला मि-ळावी अशीच मी निरंतर ईश्वराची प्रार्थना करीत बसावें अ-सेंच माझ्या कपाळीं लिहिलें आहे काय ? तरी मी त्याच वेळेस विनंति केली कीं मला सोडून जाऊं नका. मी आपली बटीक होऊन राहीन. पण आपण उग्र पश्चात्तापाच्या तावडींत सा-पडलां होतां, आपणच मला यांचाकडे ढकललें.

( दादासाहेब येतात. )

दादा०—सुंदरे तुजमुळेंच आज माझा बचाव होणार; पैशाची गोष्ट असो पण अब्रू ! इतकीं वर्षे एवढी मोठी पेढी चालवून जें नांव मिळविलें तें गमविण्याची आज वेळ आली असती, पण तूं आहेस ह्मणून आतां माझा टिकाव लागणार !

सुंदरीः—पण बाबा हा शेवटचाच का उपाय ? यावांचून दुसरा कांहींच मार्ग नाहीं काय ?

दादाः—यावांचून दुसरा मार्ग आतां राहिला नाहीं. मीं आपली शिकस्त केली पण काय करूं ? तुजबद्दल विसाजीराव जी रक्कम देण्यास कबूल आहे, तेवढी रक्कम जर आज सूर्या-स्तापूर्वीं मीं तयार करून ठेविली नाहीं, तर उद्यां सकाळीं

ते लोक मला तुरुंगांत ओढून नेतील, सूर्योदयाची देखील वाट पहाणार नाहींत. पेढीचें दिवाळें वाजलें ह्मणजे मला येथेंच नरकयातना भोगाव्या लागतील. हजारों लोक टार बुडतील; व त्यांचा तळतळाट मला घ्यावा लागेल. मग जे लोक आपल्या घरीं येऊन चैन मारीत असत, तेच लोक मला शाप देत सुटतील; जो तो माझ्या नांवानें दगड फोडील;–अशी माझी दशा होईल. पण एवढें संकट टळण्याचा उपाय तुझ्या हातीं आहे. तूं ही गोष्ट मान्य केलीस तरच आज मला तोंड दाखवायाला जागा होईल.

सुंदरीः—बाबा, पण मला ती देखील नाहींशी होणार ना ?

दादाः—असें कां ह्मणतेस? विसाजीराव तुला ममतेनें वागवील.

सुंदरीः—आग लावा त्याच्या ममतेला ! मेला आरंभापासून हाच माझ्या मागें साडेसातीसारखा लागला आहे. खाटकाला सुद्धां याच्यापेक्षां अधिक दया माया असेल. हें पहा बाबा, जें व्हायचें असेल तें होईल, पण त्याच्या ममतेचें नांव काढून नका माझ्या दुःखावर डाग देऊं.

दादाः—वेडे, तो असा वाईट मनुष्य नाहीं. त्याचें तुजवर अतिशय प्रेम असल्यामुळें हरप्रयत्न करून तुला आपली करावी हीच त्याची इच्छा.

सुंदरीः--बाबा, तुह्मी भोळे आहां. तुह्मीं त्या राक्षसाला अजून चांगलें ओळखलें नाहीं. लग्न झाल्यानंतर त्या दिवशीं तो माझ्याकडे आला आणि भलभलतें बोलला तें अगदीं माझ्या डोळ्यांपुढें आहे. त्यावेळीं जर अगदीं वेळेवर तिकडचें येणें न होतें तर या सुंदरीला आपण व सुंदरी आपल्या जीविताला व अब्रूला तेव्हांच मुकली असती. कोठें कोठें हो गेले ते अशा या बिकट

प्रसंगीं? माझें संरक्षण करण्याची त्यांनीं शपथना घेतली होती? ते सत्यप्रिय, सत्त्वनिष्ठना ? मग कसे नाहीं येत माझें या अधमापासून रक्षण करायला? हाय हाय! हे खडतर नशीबा, कसें रे मला चोहींकडून नाडूं पहातेस? त्यांच्याशीं लग्न झालें त्यावेळीं माझें डोकें फिरवून टाकलें होतेस. ते गेल्यावर माझ्या डोळ्यांवरचा धूर जाऊन त्यांची खरी योग्यता कळूं लागली. मग मीं मनाचा निश्चय केला कीं ते नाहीं आले तरी त्यांच्या नांवाचा निरंतर जप व त्यांचेंच निरंतर ध्यान करीत दिवस कंठावयाचे. कदाचित् या तपश्चर्येचें फळ ते येऊन मला देतील ही आशा होतीच. पण या नष्ट दैवाला तें देखील कोठें खपतें आहे? देवा, किती वेरें तूं माझा छळ करणार? माझा तो पूर्वींचा ताठा गेला, पार नाहींसा झाला. त्याबद्दलच का इतकी ही शिक्षा!

दादा०—असेंच जर तुला वाटत असेल तर त्याला मी कबूल नाहीं असें साफ सांग; उगीच संकोच करून दुःख भोगूं नको. तुला दुःखांत लोटून द्यावें असा माझा मुळींच हेतु नाहीं. तुला दुःख होण्यापेक्षां माझ्या एकट्याच्याच नांवाला डाग लागलेला अधिक बरा. अब्रू कांचेच्या भांड्याप्रमाणें असते. कांचेचें भांडें एकदां फुटलें ह्मणजे तें जसें पुनः नीट जोडतां येत नाहीं, तशीच अब्रू एकदां गेली ह्मणजे ती पुनः मिळवितां येत नाहीं. तरी देखील माझी अब्रू गेलेली चालेल, त्यामुळें अतःपर मला लोकांत तोंड दाखवायला जागा नाहीं असें होईल तरी ती लाज मला पुरवली; पण तुला दुःख झालें तर तें माझ्यानें बघवणार नाहीं. हा पहा मी आतां विसाजीरावाकडे जातों व त्याचें ह्मणणें मला मान्य नाहीं असें साफ सांगतों. उद्यां ते मला तुरुंगांत नेतील. नेलें तर नेलें; ह्यातांच्यास तुरुंगांत नेऊन त्यांना काय मिळणार किंवा मला तरी

कितीसें दुःख होणार ! आयुष्याचे बहुतेक दिवस गेलेच; नाव गेल्यावर मग वांचून तरी काय करायचें ? आह्मांला सुख नाहीं तर नाहीं, पण तुला तरी होवो ह्मणजे झालें. आपल्या आईबापांपेक्षां त्या भिकारड्या बागवानाच्या पोराची तुला अधिक आवड, तोच तुला आतां अधिक संपत्ति देईल व तुला आपली राणी करील, तेव्हां तरी तूं लोकलज्जेस्तव आपल्या ह्मातान्या बापाला तुरुंगांतून सोडविशील ! तेवढेंच तरी कर ह्मणजे तूं आपल्या आईबापांवर मोठे उपकार केलेस असें लोक ह्मणतील.

**सुंदरी**—नका, बाबा, अधिक बोलूं नका; तुमच्या पायां पडतें. मला क्षमा करा; तुह्मीं मला जन्म दिलें, तुह्मींच माझें जन्मापासून पालनपोषण केलें, माझे पाहिजे तसे लाड केले असें असून या वेळीं जर मी उपयोगीं पडलें नाहीं तर मग माझा काय उपयोग ? परंतु बाबा, मी कशी झालें तरी स्त्री, त्यांतून लग्न झालेली. मी माझी मालकीण नाहीं. या देहाचे देवाब्राह्मणांसमक्ष जे मालक झाले त्यांच्या परवानगीवांचून हा देह मी दुसऱ्याला देणार कोण व कशी ! जय आई जगदंबे, माझी लाज राखणें आतां तुझ्याकडे आहे. जर मी आजपर्यंत खऱ्या पतिव्रताधर्मानें वागलें असेन, जर मीं तुझी खरी सेवा केली असेल, तर या वेळीं तूं माझें साहाय्य कर, ते जेथें जसे असतील तेथून तसेच त्यांना येथें वेळीं घेऊन ये, ते जर वेळेवर तेथें नसले तर तुझीच इच्छा मीं असें पाप करावें अशी आहे असें मानून मी रुकार देईन.

**दादा०**—सुंदरे, तूं इतकी वेडी असशील असें नव्हतें मला वाटलें ! अग तो कसचा आतां येतो ! तुला वाईट वाटतें खरें, पण तें केवळ एक क्षण. एक क्षणभर मन आवरून धरिलेंस कीं, तुझी सर्व खुटपुट नाहींशी होईल. भिसाजीराव

त्या गचाळ पोरासारखा असता तर वाईट वाटलें असतें; पण तो वयानें पोक्त आहे. स्त्रियांशीं कसें वागावें हें तो चांगलें जाणतो. तो भरज्वानींतल्या तरुणांप्रमाणें आडदांड नाहीं. शिवाय त्याच्या घरीं संपत्ति किती आहे हें तूंच पहातेस; तुजबद्दल आतांच्या आतांच जो दोन लक्ष रुपये ओतावयास तयार त्याच्याजवळ किती पैसा असेल याचें अनुमान तरी करतां येतें काय? असा नवरा मिळाल्यावर आणखी काय पाहिजे? तुमचें लग्न झाल्यावर या सर्व शहरांत दुसरी भाग्यवान् बायको मिळावयाची नाहीं. आणखी असें पहा—तो पोरटा पळून गेला, पण मी होतों ह्मणून तुला येथें घेऊन आलों, आतां मीच मरून गेलों ह्मणजे तुला कोण बरें थारा देणार? ह्मणून ह्मणतों तूं असा वेडेपणाचा हट्ट धरूं नको; विसाजीरावासारखा नवरा मिळाला तर पुढें तुला सुख होईल.

**सुंदरी**—बाबा, नका नका असले शब्द उच्चारून माझे कान विटाळूं.

**दादासाहेब**—( बाहेर येऊन आपल्याशीं ) कोण मी चांडाळ बाप! केवळ स्वतःच्या अब्रूबचावाकरितां मी आपल्या पोटच्या गोळ्याला पापकर्म करायला लावीत आहें! कोठें या पापाचे घडे भरूं? आणि असें करूं नको तर करूं तरी काय? कोणता मार्ग उरला आहे? पोरीचें गाऱ्हाणें जर त्या जगदंबेनें ऐकलें व मला व तिला दोघांनाही या संकटांतून सोडविलें तर हे आई मातुःश्री तुझें देवालय बांधीन.

[ जातो. ]

---

## प्रवेश ३ रा.

स्थळ.--दादासाहेबांचें घर.

[ दादासाहेब, म्हाळसाबाई, सुंदरी, विसाजीराव आणि गुणाजीराव बसले आहेत. ]

**म्हाळसा**:—सुंदरे, तुला घाई होतें तरी काय? अशी ग काय रात्रंदिवस मुळुमुळु रडत बसतेस? असें काय रडावें तें? उठ बै इकडे–( तिला उठवून जवळ घेते. ) पूर्वींच्या गोष्टींची आतां आठवण करून काय होणार? त्यावेळीं आमची स्थितिही चांगली होती. ( दुसऱ्या लोकांस ) मलाही वाटत होतें कीं सुंदरीला राजेरजवाड्यांच्याच घरांत द्यावें. पण आतां त्या गोष्टी बोलून उपयोग काय? पण राजाच जरी मिळाला नाहीं तरी विसाजीराव कांहीं कमी नाहींत. घरदार, ऐषआराम, सर्व कांहीं राजाच्याच बरोबरीचें आहे; त्यांच्यासारखा दुसरा सावकार नाहीं; यापेक्षां अधिक चांगलें स्थळ मिळणार तरी कुठचें? मी म्हणतें, लग्नाच्या कामांत आईबापांनीं व मुलींनीं मुख्य दोन गोष्टींचा विचार केला पाहिजे. पहिली गोष्ट–त्याचें कुळ कसें काय आहे, त्याची चौकशी करावी; व दुसरी गोष्ट—कांहीं बरा वाईट प्रसंग आला असतां मागें स्थिति कशी काय राहील याचा विचार.

**विसाजी**:--( सुंदरीजवळ येऊन व म्हाळसाबाईंस दूर जाण्यास हातानें खुणा करून ) कसें काय, सुंदरी; आतां तरी समजूत झाली कीं नाहीं? माझी सुखाची वेळ जवळ आली; आतां तूं माझीच होणार.

**सुंदरी**:—दुर्दैव ज्याचे हातीं मला देईल त्याच्या हातीं गेलेंच पाहिजे.

विसाजीः--सुंदरी, प्रिये, दुर्दैव असें कां ह्मणतेस ?

सुंदरीः--(आपल्याशीं) याच्या मनांत कांहीं तरी दया असेल का ? मला वाटतें कीं याचें हृदय अगदींच पाषाणासारखें नसेल. (उघड) विसाजीराव, यावेळीं तरी थोडी दया करा, माझ्या बापावर कसा प्रसंग आला आहे त्याचा तरी कांहीं विचार करा. तुह्मी समर्थ आहां, मनांत आलें तर यावेळीं त्यांच्या अब्रूचें संरक्षण करणें तुमच्या स्वाधीन आहे. त्यावेळचा ताठा सारा गेला. मी अगदीं मूर्ख होतें. तुह्मीं सूड घेस- ला इतका आतां पुरे नाहीं का झाला ? त्यांचा यावेळीं बचाव करा, व या गरीब बिचारीला या संकटांत घालूं नका. (विसाजीरावाचे पाय धरिते.)

विसाजी--(आपल्याशीं) वाहवा, आज मी धन्य झालों. काय या वेळीं मला सुख होतें आहे ! मी हिचा सूड घेईन ह्मणून प्रतिज्ञा केली होती ती आतां सिद्धीस गेली; पण इत- क्यानेंच काय झालें आहे ! आतां लवकर मी तिळा आपली बटीक करून ठेवणार. (उघड) सुंदरी, तूं माझे पाय धरलेस तरी तुझें मागणें माझ्यानें कबूल करवत नाहीं. तुझा नवरा शिवाजी बागवान मारीच उदार होता खरा, पण सगळेच कसे त्याच्यासारखे उदार असतील ? निदान माझ्यामध्यें तरी असलें औदार्य नाहीं इतके दिवस जी आशा करीत होतों ती आतां सिद्धीस जाण्याची वेळ आली असतां तीच आ- शा तूं मला सोडून द्यायला सांगतेस हें कसें बरें कबूल करीन ? तूं आतां कितीही माझीं आर्जवें केलींस तरी त्यांचा कांहींच उपयोग नाहीं. मी सांगितल्याप्रमाणें वागणार. तूं पाहिजे तसें कर. बाप पाहिजे असेल तर तूं माझ्या स्वाधीन हो. आपलीच मर्जी राखावयाची असेल तर बाप तुरुंगांत गेलाच असें समज.

सुंदरी—पुरे महाराज, समजलें! आतां निकालच झाला!

[ धनाजीराव व शिवाजीराव प्रवेश करितात. ]

धनाजी:—कसें काय दादासाहेब, सर्व तयारी आहे वाटतें? या गृहस्थांशीं आपला परिचय नसेलच. हे आमचे दुय्यम सेनापति प्रतापसिंग.

दादा:—वाहवा, फारच मोठा अनुग्रह ह्मटला पाहिजे. अशा मोठ्या लोकांचे आह्मांसारख्या गरीबांच्या घराला पाय लागणें ह्मणजे साधारण गोष्ट नव्हे. या प्रतापसिंगजी. इकडे बसा.

प्रतापसिंग:—नको मी येथेंच बसतों. [ असें ह्मणून मंडळीपासून जरा दूर बसतो. ]

दादा:—धनाजीराव, आज मी सकाळीं आपल्याजवळ बोललों होतों त्याकरितांच विसाजीराव आले आहेत.

धनाजी:—दादासाहेब, आपल्याला ही गोष्ट बिलकुल पसंत नाहीं. पण सुंदरीचा रुकार पडला का?

दादा:—सुंदरीसारखी समजूतदार मुलगी मिळायची नाहीं. माझ्या वचनाच्या बाहेर पाऊलभरही ती जाणार नाहीं.

धनाजी:—( सुंदरीजवळ जाऊन ) कसें काय सुंदरे, आज तूं आपल्याच तोऱ्यांत असशील; आजचा तुझा आनंदाचा दिवस, आज तूं मजजवळ बोलावयाची सुद्धां नाहींस. अग पण तूं अजून हंसली नाहींस! हं लाजतही नाहींस! त्या भिकारड्या वागवामाला सोडून आज तूं नवा श्रीमान् नवरा करणार असें असून आज तूं हंसत नाहींस, मुरके मारीत नाहींस हें काय? अरे खरेंच. तुझा चेहरा अगदीं म्लान सुकलेला का!

सुंदरी:—खरेंच बाई, आज माझा सुखाचा दिवस! मामा,

तूं येऊन मला हें सांगावेंस येवढेंच काय तें माझ्या सुखांत कमी होतें. ( रडूं लागते. )

धनाजीः--अग, पण वेडे रडतेस कां? हं रडें आवर. ( आपल्याशीं ) गरीब बिचारी मुलगी! काय या बापाला करावें? ( सुंदरीस ) सुंदरे, मजवर तुझा विश्वास आहे कीं नाहीं? जर असेल तर तुला दुःख होण्याचें काय कारण तें सांग. तुला जुलमानें लग्नास उभी केली आहे कीं काय?

सुंदरीः—असें कध्धीं या तोंडांतून यायचें नाहीं.

धनाजीः--मग तर तूं लग्नास कबूल आहेस?

सुंदरीः—कबूल! [ हुंदका गिळून ] होय, मी कबूल आहें!

धनाजीः--तर मग तूं फारच—नाहीं पण मला बोलण्याची जरूर नाहीं.

सुंदरीः—[ एकदम रडें थांबवून ] खरेंच तुला तरी एकदां सांगून पहावें. तूं मामा आहेस. मनांत आणिलेंस तर अजून देखील तूं कांहीं युक्ति साधशील. इतकीं वर्षें माझ्या बापाची पेढी बऱ्याच नांवालौकिकानें चालली, पण अलीकडे त्यांचें पुष्कळ नुकसान झालें, पुष्कळ कुळें नादार लागलीं त्यामुळें आतां दिवाळें निघण्याची वेळ येऊन ठेपली आहे; जो तो आपले पैसे परत मागूं लागला. आज संध्याकाळपर्यंतचा वायदा आहे. तोंपर्यंत जर दोन लक्ष रुपये जमा केले नाहींत तर त्यांना उद्यां तुरुंगांत ओढून नेतील. विसाजीराव रुपये द्यावयास कबूल आहे; पण तो मजबद्दल रुपये देणार; मीं त्याची बायको व्हावें ह्मणजे तो बाबांचें कर्ज फेडणार-अशी पंचाईत आली. आतां ह्यांतून मी सुटणार कशी? कसें तरी करून या वेळीं तूं माझें रक्षण कर. ते कोठें निघून गेले आहेत तें मला माहीत नाहीं. ते असते तर मला

प्रसंग कधीं न येता; पण आतां बोलून काय उपयोग ? मी खरी कपाळकरंटी!

**धनाजी**—( आपल्याशीं ) बायका अगदीं मूर्ख, अविचारी, अविश्वसनीय आणि लटक्या असतात असें हा वेळपर्यंत मला वाटत होतें; परंतु हें माझें मत चुकीचें आहे अशी आतां माझी खात्री झाली. निदान कांहीं बायका इतक्या वाईट नसतात. ( उघड ) सुंदरे, तूं ह्मणतेस खरें; पण एवढी रकम मजजवळ कोठून असेल ? दोन लक्ष ! मला तर इतके रुपये देण्याचें सामर्थ्य नाहीं. काय करूं ! माझा नाइलाज आहे.

**सुंदरी**—आतां मात्र मला कोणाचाही आधार नाहींसा झाला ! आतां मात्र माझ्या दुर्दैवाची पराकाष्ठा झाली खरी ! ( रडूं लागते.)

**धनाजी**—थांब रडूं नको; शिवाजीरावाविषयीं आमच्या प्रतापसिंगास चांगली माहिती आहे. त्या दोघांचें फार सख्य आहे. शरीरें दोन पण प्राण एकच, अशा प्रकारचें त्यांचें एकमेकांवर प्रेम आहे असें ते ह्मणत होते. त्याची कच्ची हकीकत मला कांहीं माहीत नाहीं; पण तूं त्यांना विचार. तुझ्या नवऱ्याला कांहीं निरोप सांगावयाचा असला तर त्या प्रतापसिंगास सांग ह्मणजे ते त्यास लागलाच कळवितील. [ धनाजीराव शिवाजीरावाजवळ येऊन त्याच्या कानांत कांहीं सांगतो व शिवाजीराव सुंदरीकडे जातो. धनाजीराव बैठकीवर येऊन बसतो. ]

**दादा**—हं ! हे कोणीकडे चालले !

**धनाजी**—आहे त्याचें असेंच कांहीं कारण. दादासाहेब, त्यांना जाऊंद्या सुंदरीजवळ बोलायला. तुमच्या हिताची

गोष्ट मी सांगतों आहें. ही गोष्ट आपण आरंभिली आहे ही आपल्या कुळाला बट्टा लावील याचा कांहीं विचार!

दादा०—विचार कसचाहो? प्रसंगापुढें मी तरी काय करूं?

[ सुंदरी व शिवाजीराव एका बाजूला होतात. ]

सुंदरी—यांना माझ्या प्रियपतींची चांगली माहिती आहे, तर यांच्यापाशींच आतां शेवटचा निरोप सांगावा. ( शिवाजीरावाजवळ जाते. ) पण हे माझा निरोप माझ्या प्रियकरास कळवितील असें तरी कशावरून? यांची मुद्रा फार उग्र दिसते. देवा, हे मजकडे पहात सुद्धां नाहींत, यांच्या देखील मनांत मजविषयीं तिरस्कार उत्पन्न व्हावाना? ( उघड ) महाराज, आपणांस मी हात जोडतें—कृपा करून—( स्फुंदूं लागते. )

शिवाजी—( आपणाशीं ) हा, हाच माझ्या प्रियेचा स्वर! हिचें भाषण ऐकून पूर्वींची सर्व स्थिति माझ्या डोळ्यांपुढें उभी राहते.

धनाजीः—( म्हाळसाबाईस ) अग ताई, तूं नको तिकडे जाऊं. तो तिला त्या बागवानाच्या पोराचें—शिवाजीचें काय झालें तें सांगत आहे.

म्हाळसाः—वाहवा! तिचें मन वळवायला ही तर फार चांगली खुबी तूं शोधून काढिलीस! [ धनाजीराव दादासाहेबांच्या कानांत बोलतो व दोघे संज्ञा करितात. ]

सुंदरीः—( आपल्याशीं ) यांना माहिती विचारावी म्हणून मी पुनः पुनः बोलण्याचा विचार करितें, पण तोंडातून शब्द काढायचा मला धीरच होत नाहीं. ( उघड ) महाराज, खरंच का आपला व माझ्या—तिकडच्या इतका स्नेह आहे?

शिवाजीः—शिवाजीराव व मी दोन नाहीं बरें. काय सांगूं

तुला ! तुझा शिवाजीराव एकसारखा चिंता करीत असतो. सारखें तुझें चिंतन !

**सुंदरीः**—बरें ! तर कृपाकरून त्यांना आपण माझा एवढा निरोप सांगा; त्यांचा व माझा शेवटचा वियोग होण्याची ही वेळ आली आहे. आपण कृपा करून माझें बोलणें त्यांस अक्षरशः सांगाल काय ?

**शिवाजीः**—पण तुला दुसऱ्यानें लग्न करण्यास पूर्ण मोकळीक आहे. तोच मजजवळ बोलला होता कीं सुंदरीला मीं फसविलें हो फार वाईट गोष्ट केली. तिनें मजपेक्षां अधिक चांगला नवरा मिळाल्यास पुनः लग्न करावें. मी तिला मुळींच अडथळा करणार नाहीं. उलट तिला अधिक चांगला नवरा मिळालेला पाहून मला समाधान होईल. मग तुझें काय ह्मणणें !

**सुंदरीः**—त्यांना एवढाच निरोप सांगा:—आपण जरी मला फसविलें तरी आपला वियोग झाल्यापासून हा वेळपर्यंत मी रात्रंदिवस आपलेंच ध्यान करीत होतें. फार काय सांगूं ! हा वेळपर्यंत आपल्यावांचून माझ्या मनांत दुसरी कल्पनाच आली नाहीं. ईश्वरानें आपणांस मागची वाट दाखवावी ह्मणून रात्रंदिवस त्याचा धांवा करीत असतें. आणखी असेंही सांगावें कीं, जरी आपण गरीब असलां तरी आपल्या सुखदुःखाचा वांटा घेण्यास मी कबूल होतें, आपल्या पायांपाशींच मी नेहेमीं राहिलें असतें, जेथें आपण तेथें मीही; आपला मार्ग तोच माझा मार्ग ; द्वारोद्वार भिक्षा मागण्याचा प्रसंग आला असता तरी मीही आपल्याबरोबर आपला हात धरून फिरलें असतें; एवढेंच नाहीं तर आपली सेवा करीत असतां जरी आपण मजकडे पाहून ममतेनें एक वेळ हास्य केलें असतें तरी तेवढ्यानेंच अगदीं दंग होऊन मी चिरकाळ सुखानें सेवा केली असती.

शिवाजी—(आपल्याशीं) अहाहा! किती गोड हे शब्द! हें आपण मी स्वप्नांत तर ऐकत नसेन? किंवा माझ्या बुद्धीला भ्रम झाला ह्मणावा? असे मधुर शब्द माझ्या कानीं पडावे इतकें कोठचें माझें भाग्य? (उघड) तूं शिवाजीरावावर इतकें प्रेम करितेस, मग आतां त्याला सोडायला कशी तयार झालीस!

सुंदरीः--त्यांस आपण एवढेंच सांगाः—ईश्वरानें आपणांस जर अंतर्ज्ञान दिलें असतें, व माझ्या अंतर्यामीं प्रवेश करून आतां माझी कशी दशा आहे त्याचा विचार केला असता तर आपणही मला या प्रसंगीं क्षमाच केली असती. महाराज, आपणच विचार करा. हे माझे वडील—यांची कशी दशा झाली आहे ती आपणच पहा! बापड्यानें दुःख तरी किती सोसावें? त्यांजवर आज असा बिनतोड प्रसंग आला आहे कीं तो सांगतां येत नाहीं. बरें, माझें नशीब तरी मेलें कसें प्रतिकूल ह्मणून सांगूं? मीच आपल्या जिवाचा बळी देईन तरच त्यांचा बचाव, नाहीं तर होत नाहीं! ज्यांनीं मला जन्म दिलें, त्यांचें जर मीं अशावेळीं रक्षण केलें नाहीं, तर मी जन्मास येऊन तरी काय उपयोग? ज्यांनीं जन्म दिलें त्याकरितांच जर हा जीव खर्चीं घातला तर आपल्या कर्तव्यांपैकीं एक तरी मीं केलें एवढें तरी मला समाधान होईल. पण मी इतकें निक्षून सांगतें कीं वडिलांनीं जरी बिसाजीरावांशीं लग्न लाविलें तरी या देहाला कांहीं त्या चांडाळाचा स्पर्श होऊं देणार नाहीं. लग्न झालें आणि बाबा या पेंचांतून मुक्त झाले कीं सुंदरी जगांतून नाहींशी झालीच समजा. त्या मेल्याचे असेच दांत पाडले पाहिजेत. आपण त्यांस असें ह्मणावें कीं या लोकीं जरी आपली माझी भेट झाली नाहीं तरी देवलोकीं तरी खासच होईल; तेव्हांच मी आपली

सेवा करीन; तेथें तर वियोगाचें नांव सुद्धां ऐकूं येणार नाहीं!

शिवाजीः—मी–मीच–[ चपापून ] पण तुझ्या या बोलण्याचा अर्थ काय ? तुझ्या जिवाचा बळी ? आणि तो देणार कोण ?

सुंदरीः—[ धनाजीरावाकडे बोट करून ] तेच आपणांस सांगतील. [ ती जाऊं लागते. ]

शिवाजीः—अग थांब, जाऊं नको, आतां मला एवढेंच सांग–जर कदाचित् हें तुझ्या बापावरचें संकट टळलें व तुला आपला जीव बळी देण्याचा प्रसंग आला नाहीं तर तूं त्या नीच व गरीब बागवानाजवळ राहण्यास कबूल आहेस ? त्याच्या भिकार झोंपड्यांत राहून तूं रात्रंदिवस कष्ट सोसशील ?

सुंदरीः—अजून देखील का शंका त्याची ? महाराज, एखाद्या मनुष्यास तोफेच्या तोंडीं द्यावयाचें असलें ह्मणजे त्याच्या गळ्यांत फुलांच्या माळा घालतात, त्यांनीं जसें त्याला ऐश्वर्य येतें तसेंच आतां माझें हें ऐश्वर्य ! अशा ऐश्वर्यापेक्षां ज्यांना मीं आपलें जीवित अर्पण केलें त्यांच्या पायांशीं जरी मला मरण आलें तरी फार चांगलें !

शिवाजीः—सुंदरे, भिऊं नकोस. ईश्वरावरचा भरंवसा दृढ ठेव. तुझा शिवाजी बेइमानी नाहीं बरें ! मागें त्यानेंच ना तुला या विसाजीच्या तडाक्यांतून सोडविलें ? मग तो तुला या वेळीं कसा विसंबेल ?

सुंदरीः—अग बाई ! हा स्वर ओळखीचा दिसतो ! देवा काय रे तुझ्या मनांत आहे ?

शिवाजीः—अग वेडे, अशी गोंधळांत काय पडलीस तूं ? वर पहा. देवाच्या घरचा न्याय इतक्यांतच नाहींसा झाला नाहीं.

सुंदरी—वर पाहूं ?–पण नको बाई ! कोणी भलतेंच अ-

सलें तर? मीं परपुरुषाकडे उत्सुकतेनें पाहिलें हे त्यांनीं ऐकिलें तर ते काय ह्मणतील ?

शिवाजी:—अग कांहीं ह्मणायचे नाहींत. शिवाजीच्या आणि माझ्यामध्यें परकीभाव मुळींच नाहीं. बायकांचें मन जितकें भोळें,पाहिजे त्यावर विश्वसणारें तितकेंच संशयखोर असतें.आतां हिची खात्री करावी कशी ? आपल्याच्यानें कांहीं धीर धरवत नाहीं. केव्हां जाऊन आलिंगन देईन असें झालें आहे. बरें, सुंदरे, ऐक-लग्नापूर्वीं तुझें आणि शिवाजीचें एकदां बोलणें चाललें होतें. विषय हा कीं गुण श्रेष्ठ का धन श्रेष्ठ. तुला त्यानें त्याबद्दल विचारल्यावर तूं ह्मणालीस "हें काय, हें कोणीही सांगेल. धनापेक्षां गुण श्रेष्ठ." पण लगेच ह्मणालीस कीं "उगीच आपली कांहीं परीक्षा पहायची झालें. असें कोठें धन जातें आहे का ?" तुझा शिवाजी त्यावेळेला महाराज होता. आहे का याची कांहीं आठवण ?

सुंदरी:—खचित खचित तेच ! ( वरतीं त्यांच्या तोंडाकडे पाहून धांवत त्याच्याकडे जाते व घट्ट मिठी मारून ) मिळा-लाग बाई माझा प्राण मला ! आतां पुनः कध्धीं कध्धीं नाहीं ताटातूट होऊं देणार. कापून काढल्याशिवाय मी ही मिठी ह्मणन सोडणार नाहीं. आई अंबाबाई ! पावलीस माझ्या नवसाला ! पण हें कसें बाई अगदीं वेळेवर येणें केलें ?

शिवाजी:—सांगेन सारी हकीकत फुरसतीनुसार ! तूर्त आधीं ही विसाजीरावाची धिंडका बाहेर जाऊं द्या. तो पहा कसा टवकारून बघायाला लागला आहे ! जसा कांहीं आतां फाडून खातो कीं काय ! ऊं: ! येऊं द्या त्याला. आतां मी कशाला डरत नाहीं. आज सकाळींच माझी कोण विचित्र स्थिति झाली होती ! तोच मी आतां अगदीं आनंदाच्या शिखरावर

घडली आहे. हं, हं, हात आटोपा. विसाजीराव, दुरून बोला. का इतके चवताळूनसे आलां?

(विसाजीराव रागानें लाल झालेला येतो.)

**विसाजी**—अरे हरामखोरा, दिवसा दरवडा घालून वरती साबाची ऐट! चवताळून का आलां? सांगतों बरें. तुझी चामडी लोळवायला, तुझ्या नरडीचा घोट घ्यावयाला आलों आहे समजलास! पण सोड सोड तिला अगोदर. निर्लज्जा! दुसऱ्याच्या स्त्रीला हात लावायला कांहीं भीति वाटत नाहीं तुला?

**शिवाजी**—दुसऱ्याची स्त्री? दुसऱ्याची ह्मणजे कोणाची? आपली कीं काय? मी ह्मणत होतों ही त्या शिऊ बागवानाची बायको ह्मणून!

**विसाजी**—ती स्त्री कोणाची का असेना; पण चोरा, तिला अगोदर सोड, नाहीं तर बघ आतां तमाशा! (असें ह्मणून त्याच्या अंगावर जातो, तो त्याला लाथ मारून खालीं पाडतो) अरेरेरे! काय करूं! अहो, दरोडा हो दरोडा! धांवा धांवा! चोर चोर! मेलों–मेलों–खून–धांवा!

**शिवाजी**—प्रिये, सुंदरी, आतां लाजूं नको. मान वर कर. मीं तुला पाहिलें ह्मणून आतां तुला वाईट वाटण्याचें कारण नाहीं. आतां तूं मजकडे पाहिलेंस तरी मलाही लाज वाटत नाहीं. माझ्या नांवास लागलेला कलंक मी धुवून टाकून आलों आहे. आतां कोणाच्यानेंही मला दूषण देववणार नाहीं. तुला फसविल्याबद्दल आतां या देशांतील प्रत्येक मनुष्य मला क्षमा करील एवढें नांव मिळवून आलों आहे. आतां मला आनंद, अत्यानंद झाला. काय हें मला सुख! प्रिये, रणांत मी सर्व रात्र जागत बसें, तेव्हां अशीच तुझी मूर्ति मजपुढें उभी असे व तुझी माझी पुनः अशाच रीतीनें भेट

होईल असा मला क्षणोक्षणीं भास होत असे. तुंचळ युद्धांमध्यें सैन्याच्या अग्रभागीं मिकारानें लढत असतां देखील मला वाटे कीं तूं अशीच दृढालिंगन देऊन माझ्याशीं एकरूप होऊन राहिली आहेस; व या विचारानें माझ्या अंगांत जें कांहीं स्फुरण चढत असे! अरे, पण हीं पहा सारी मंडळी इकडेच आली!

( सर्व मंडळी धांवत येते )

**विसाजी**—अहो पाहतां काय? करा त्या दोघांना दूर. बांधा त्या हरामखोराच्या मुसक्या.

**दादा०**—प्रतापसिंग, आपल्याला मी संभावित समजत होतों, आणि हें काय? धनाजीराव, आपलेच का हे मित्र! फारच थोर! सुंदरे, चल नीघ येथून. कारटे कुळाला बट्टा लावलास! अशी कशी आपलें कुळशीळ अगदींच विसरलीस!

**म्हाळसा**—पोरी सोड त्यांना! चल इकडे ये भजपाशीं. छे बाई, खचित या पोरीला वेड लागलें!

(सुंदरी मिठी सोडायची खटपट करते. **शिवाजी** तिला सोडीत नाहीं.)

**धनाजी०**—हं! प्रतापसिंगजी, तिला सोडूं नका. तुम्हीच कायतो तिला आतां आधार राहिलां आहां.

**विसाजी**--अरे कंचग्नी! खचित हें सारें कपट आहे. हा घाट हे ठरवून आले असावे. दादासाहेब असे स्वस्थ काय बसलां!

**दादा०**--काय करूं! माझी कांहीं अक्कल चालत नाहीं. म्हातारपणीं हें पहायला मी जगलों नसतों तर बरें होतें. कारटे, तूं मेली का नाहींस?

**धनाजी०**--दादासाहेब, हें काय? आपण अगदींच चुकतां.

एकदां नीट प्रतापसिंगाकडे न्याहाळून तरी पहा. त्याच्या स्वराची ओळख पटते का नाहीं? कांहीं आठवण करा.

दादा०--ओळख! (प्रतापसिंगाच्या चेहेऱ्याकडे पाहून) कांहीं पटते खरी. हा शिवाजी बागवान तर नाहीं!

शिवाजी०--महाराज, तोच मी अभागी! पण आतां मात्र पूर्ण धन्य! (पायां पडतो.)

विसाजी०--मामासाहेब, हें सारें खोटें आहे. हा तोतया आहे. या तुमच्या कारटीनें आणि या तिच्या मामानें हें थोतांड तयार केलें आहे. हं, चला, आटपा लवकर. सुंदरी देतां का तुरुंग पाहिजे!

दादा०--हाय हाय! आतां माझें कसें होणार!

शिवाजी०--दादासाहेब! आपण कांहीं काळजी करूं नका. मी गेलीं दोन वर्षे कांहीं स्वस्थ बसलों नव्हतों. हें घ्या तुमच्या सुंदरीचें स्त्रीधन. (त्याच्या हातांत हुंड्यांचें पुडकें टाकतो.)

विसाजी०--इतकी तयारी आहे का! मग आतां आपण येथून चंबूगबाळें आटारावें हें बरें. कसा घात झाला पहा! अगदीं तोंडाशीं पेला नेला होता तोंच यानें तो खालीं पाडला. कांहीं नाहीं, याचा सूड घेतला पाहिजे. तुमच्या सुखाची माती माती होईल.

धनाजी—तूं सूड घेणार काय? जा मूर्खा! तूं आतां असेच शाप देत बस! तुझे शाप तुलाच बाधतील. 'यावें तसें घ्यावें' ही म्हण तुला कान धरून शिकविली पाहिजे वाटतें!

विसाजी—यांचें सुख पाहून माझ्या अंगाची लाही होते! पण आतां याचा सूड घेण्याचें सामर्थ्य मला राहिलें नाहीं! मी अगदीं निरुपाय झालों! आतां तुम्हांला सुखच! मोठें उत्तम

जोडपें, राजाराणी, बागवान राजा-सुंदराबाई राणीसाहेब! ठीक!

धनाजी--कां गुणाजीराव, तुमचे मित्र जीभ फार लांब करून बोलतात! त्यांना ह्मणावें ती आवरून धरा. राजाराणी-बद्दल गोष्ट काढाल तर ह्मणावें आपल्या सहीचें एक पत्र शिवाजीरावाला गेलें त्याची याद करा. आपणही त्या कामांत होतांच; तेव्हां त्यांना नीट समजून सांगा-सरकारदुरबारांत ही गोष्ट गेली तर उगीच-

गुणाजी--आपला हुकूम अमान्य करायचा कीं काय?

( गुणाजी विसाजीच्या कानांत कांहीं सांगतो. ते दोघे निघून जातात. )

सुंदरी--बाबा, आतां तरी तुमच्या अब्रूचा बचाव झाला? शेवटीं इकडचेच हे आपणांवर उपकारना? आणि यांनाच ना आपण सोडायला मला सांगत होतां?

शिवाजीः—पण प्रिये, अजून तूं रडत आहेस त्याचें कारण?

सुंदरीः—अत्यानंदाचे पूरही नेत्रांतूनच वाहतात.

दादाः—शिवाजीराव, माझ्या सुंदरीला सोडून जातांना जसा आपण थोरपणा दाखविला, तसाच आतां आपण मोठी कीर्ति संपादन करून आलां असतांही तिला पुनः आपल्या पदरांत घेण्यांतही आपण दाखविला! माझी सुंदरी आपणासच योग्य आहे. आपण कृपा करून तिचा स्वीकार करावा; ईश्वर तुह्मां दोघांस चिरकाल सुखांत ठेवो. झाल्या गोष्टी उभय पक्षांनींही विसरून जाव्या.

म्हाळसाः—मला तर आतां कांहींच कळत नाहीं! हा चमत्कार आहे तरी काय? मग प्रतापसिंग ह्मणून ह्मणतात ते कोण?

धनाजीः—जे तुझ्यापुढें उभे आहेत तेच.

शिवाजीः—मी आतां प्रतापसिंग नाहीं. आतां मी शिवाजी. मूर्खपणा केल्यामुळें मला तें नांव योग्य नव्हतें, ह्मणून तें सोडून मीं दुसरें घेतलें; पण आतां माझ्या नांवास लागलेला कलंक मीं धुवून टाकिला, तेव्हां मी पुनः तें नांव घेतों. लष्करांत नोकरी धरल्यावर जसजशी माझी बढती होत गेली तसतशी ईश्वरानें माझी कीर्तीही पसरिली. याप्रमाणें माझें पातक धुवून गेलें. प्रिये, आतां तरी या शिवाजीबद्दल तुला लाज वाटायची नाहींना ?

सुंदरी—इश्श मेलें! हें काय विचारणें! मीं का नांवें ठेविलीं होतीं ! आणि तें असलें तरी आतां बाबांनींच सांगितलें ना मागचें सारें विसरायचें ह्मणून !

शिवाजी—मग तें मीं सारें विसरलों बरें. उगीच विनोद केला मो. देवा, काय हें सुख ! तुझ्या कृपेचें फळ !

५ वा अंक समाप्त.

# विक्रीस तयार.

हीं सर्व पुस्तकें पुणें येथें 'आर्यभूषण' छापखान्यांत विकत मिळतील.

**केसरींतील निवडक निबंध**—भाग १ व २. केसरी वर्तमानपत्र ज्यास माहीत नाहीं असा महाराष्ट्र भाषा जाणणाऱ्या वाचकांत एक तरी सांपडेल किंवा नाहीं याची आम्हांस शंका आहे. या पत्रांत राजकीय व सामाजिक अनेक प्रश्नांवर मुद्देसूद व सुविचारयुक्त असे निबंध विद्वान् लोकांनीं लिहिलेले येऊन गेले आहेत. कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर, रा० रा० बाळगंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर व त्यांचे सन्माननीय व विद्वान् उपपदधारी मित्र ( ज्यांचीं नांवें येथें घालतां येत नाहींत ) अशांनीं आपले उदात्त व सुसंस्कृत विचार ज्यांत गोंवले आहेत अशा बहुमोल निबंधांचा या दोन भागांत संग्रह केला आहे. सामाजिक व राजकीय विषयांसंबंधानें लोकमत जागृत करून त्यास चांगलें वळण ज्या निबंधांच्या योगें लावलें गेलें त्यांची योग्यता सहज ध्यानांत येण्याजोगी आहे. प्रत्येक भागाची किंमत १ रुपया. ट० हं० ३ आणे.

**डिमास्थेनीस याचें चरित्र**—हें लहानसें चरित्र प्रो० चिंतामण गंगाधर भानू बी. ए. "रिचर्ड कान्डेन यांचें चरित्र" व "नीतिमीमांसा" या पुस्तकांचे कर्ते यांनीं लिहिलें आहे. डिमास्थेनीस हा अथेन्स शहरच्या आणि ग्रीस देशाच्या इतिहासांत वर्णनीय पुरुष होऊन गेला. याच्या अंगीं मुख्य गुण वक्तृत्व. मुत्सद्दीपणांतहीं तो कमी होता असें नाहीं. यानें आपल्या हातून आपल्या देशाचें वैभव वाढविण्याविषयीं निदान राखण्याविषयीं काय काय केलें, देशाभिमान त्याच्या अंगीं कसा जाज्वल्य रीतीनें वास करीत होता, स्वातंत्र्य राखण्याविषयीं त्याचें मन कसें स्फुरत होतें इत्यादि गोष्टी आमच्या महाराष्ट्रवाचकांनीं या चरित्रापासून घेण्यासारख्या आहेत. पुस्तक बारीक पण रुंद व जाड्या अक्षरांनीं छापलें आहे. किंमत ४॥ आणे. ट० हं० ०॥.

**रिचर्ड काब्डेन यांचें चरित्र**—चिंतामण गंगाधर भानू बी. ए. प्रोफेसर, फर्ग्यूसन कालेज पुणें. यांनीं लिहिलें.

रिचर्ड काब्डेन, ब्राइट साहेबांचा साथीदार, यांनीं इंग्लंडच्या इतिहासांत लोककार्यदक्षतेविषयीं व परहिततत्परतेविषयीं अमर कीर्ति मिळविली आहे. इंग्लंडच्या व्यापाराची वाढ अनेक प्रतिबंधक कायद्यांनीं खुटविली होती, ती यांनीं जिवापाड मेहनत घेऊन लोकांचे व राजकर्त्यांचे भ्रम दूर करून मोकळी केली. राष्ट्रीय हिताची कळकळ बाळगणारांनीं स्वकार्यसिद्धीसाठीं देशसेवेला कसें तनमनधन अर्पण केलें पाहिजे, अश्रांत देह झिजविला पाहिजे, ममत्व टाकलें पाहिजे हें या चरित्रवाचनापासून चांगलें कळेल. किंमत १० आणे. ट० हं० एक आणा.

**सद्गुणमंजरी**—(एका हतभाग्य स्त्रीचें चरित्र). बांधणी कापडी पुठ्ठ्याची, सुरेख, मजबूत, वर नांव सोनेरी अक्षरांचें. गणेश जनार्दन आगाशे बी. ए. कृत रा० ब० विष्णु मोरेश्वर भिडे यांची सभर्तृका कन्या आवडाबाई इचें हें चरित्र अनेक कारणांनीं वाचण्यासारखें झालें आहे. लहानपणींच वैधव्यरूपी दारुण प्रसंग आल्यामुळें तिचें मन गंभीर झालें होतें. विविध जनांच्या नानाप्रकारच्या अनुकूल प्रतिकूल टीकेला पात्र झाली असतांही तिनें आपल्या मनाची समता व शांतता वाढत तशी कायम राखून उलट आपल्या आप्तस्वकीयांचें सांत्वन करावें, शिक्षणाच्या योगें जिच्या मनावर कोणत्याही प्रकारचा विपरीत परिणाम न होतां उलट जिनें आपल्या प्रगल्भ व गंभीर विचारांनीं पोक्त लोकांसही थक्क करून सोडावें—अशा केवळ दुःखाचा भार वाहण्याकरितांच या जगांत जन्मलेल्या तथापि आपला दुःखभार निमूटपणें वाहून दुसऱ्याची सुटका करणाऱ्या अल्पकाल या जगांत राहूनही पुष्कळांस चटका लावून टाकणाऱ्या एका स्त्रीचा जीवनवृत्तांत सुहृदय वाचकांनीं अवश्य वाचण्यासारखा आहे.

यांत चरित्रनायिकेनीं लिहिलेल्या रोजनिशींतील व तिनें प्रिय मैत्रिणींस धाडलेल्या पत्रांतील उतारे दिले आहेत; यावरून तिचें अंतःकरण किती कोमल, किती पापभीरु, किती विवेकी, किती शांत व किती न्यायी होतें हें स्पष्ट दिसेल. किंमत आणे ट० हं० १ आणा.